म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र. १५९१९

IRBK-0116919

IRBK-0116919

७६९७९
बा. वा
वाचनालय

# नसता उपद्व्याप

३००२६
२९८८
३-४-५

लेखक

**बाळ सामंत**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ७६९७९ नों दि ...........
वि. बा. वा. ... ...................

किंमत तीन रुपये

IRBK-0116919
IRBK-0116919

मुरली पब्लिशिंग कंपनी, ... मुंबई.

प्रकाशक
अनिलकुमार हजारे
मुरली पब्लिशिंग कंपनी,
रानडे रोड, दादर, यांजकरितां

: चित्रकार :
दिनानाथ दलाल

नसता उपद्व्याप
आवृत्ति पहिली
एप्रिल १९६०

मुद्रक
पांडुरंग लक्ष्मण सावंत,
मुरली प्रिंटिंग प्रेस,
रानडे रोड, दादर, मुंबई २८.

विनोदी लेखांचा हा माझा दुसरा संग्रह, मुरली प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होत आहे. या संग्रहांत हंस, मोहिनी, दीपावली आदि मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांचा समावेश झाला आहे. या संग्रहांत ते प्रसिद्ध करण्यांची परवानगी दिल्याबद्दल मी त्या त्या मासिकांच्या संपादकांचा आभारी आहे. माझे मित्र श्री. दीनानाथ दलाल यानीं अल्पावधींत सुरेख चित्र काढून दिले, यां बद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

बाळ सामंत

१ माझें औट घटकेचें ब्रह्मचर्य

२ मी रेडियो घेतां

३ नोकरी पहावी मिळवून

४ सार्वत्रिक चहाबंदी

५ मी विद्वान् कसा झालों ?

६ स्त्रिया आणि सिनेमा

७ जंगली साहित्य–संमेलन

८ कौटुंबिक आरिष्टें आणि आसवें

९ स्त्रिया आणि वाचन

१० घरगुती अर्थशास्त्र

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १६७९८ नों. दि.
वि.

माझे मित्र

श्री. भालचंद्र चित्रे

श्री. मधुकर कर्णिक

आणि

श्री. वसंत चिटणीस

यांना प्रेमपूर्वक —

# माझें आठ घटकेचें ब्रह्मचर्य !

बायकोचं माहेर ही एक अजब चीज आहे;— नव्हे, आजकाल प्रत्येक संसारी तरुणाचं तें 'पानिपत' आहे. या 'कुरुक्षेत्रीं' आपण सारे नवजवान चारी मुंडे चीत होतों. या कुरुक्षेत्राचं नांव काढतांच त्या धनुर्धर अर्जुना-प्रमाणें आपण गलितगात्र होतों. कारण आपली बायको पानिपतीं निघण्यापूर्वी घरालाच रणमैदानाचं स्वरूप प्राप्त झालेलं असतं. ईश्वरानं आपल्याला नवऱ्याच्या जन्माला घालण्याचा मूर्खपणा केल्यामुळं अपराध फक्त आपल्याच हातून घडतात आणि घडले पाहिजेत. बरं, तसं पाहिलं तर हे अपराध अति-क्षुद्र असतात. ऑफिसांतून घरीं यायला उशीर झाला, किंवा शनिवारीं 'रमी'चा डाव प्रमाणाबाहेर लांबला, तर आपल्या घरांत रविवारपासूनच धर्मयुद्धाला तोंड लागतं. सकाळींच रेडियोऐवजीं आपल्या बायकोचं 'नवरा-स्तोत्र' सुरू होतं. चहा उशिरां मिळतो. भांड्यांची आदळआपट, कपबश्यांचा चक्काचूर, पोरांना धपाटे,—लढाईचीं हीं रणवाद्यं माझ्या पूर्ण परिचयाचीं असल्यामुळं, आपण संत तुकारामाच्या आवेशांत आणि आविर्भावांत 'रविवारचा सकाळ'—विशेषतः 'उषा वहिनींचा सल्ला' किंवा 'तुमचें चुकतें कुठें ?' वाचण्यांत गर्क आहोंत असं दाखवितों. पण मनांतल्या मनांत माझी पांचांवर धारण बसलेली असते. अक्षरशः गाळण उडालेली असते म्हणा ना ! कारण रविवारींच 'ब्रिजचा डाव मांडू या' म्हणून समोरचे आरस किंवा परुळेकर आत्तां येतील आणि त्यांच्यासमोर 'वहिनी' चा रुद्रावतार महाभयंकर होणार, या भीतीनं मी अगदीं 'खलास' झालेला असतों. अशा वेळीं 'जरा चहा टाकतेस का' असं भीत भीत म्हणायचीहि सोय नाहीं. कारण अर्धा मण साखर जरी घरांत असली तरी चक्क माझी अब्रू काढायसाठीं 'साखर संपलीय्' असा पुकारा येणार याची मला खात्री असते.

त्यामुळं समोरून आरस आणि परुळेकर यांची दुक्कल आमच्या रोखानं येते आहे हें पाहून मी 'रविवार सकाळ' चा ढालीसारखा उपयोग करून त्यांना खूण करतों कीं, 'वातावरण तंग आहे.— उगाच शिव्या खायला येऊं नका.' कारण आरस आणि परुळेकर हे माझे दोस्त असले तरी—किंवा दोस्त आहेत म्हणूनच—सात्त्विक संतापानं आमची धर्मपत्नी त्या गरीब बिचाऱ्या सत्पुरुषांचा सणसणीत उद्धार केल्याशिवाय रहात नाहीं. त्यामुळं माझी खूण पहातांच आरस पिशवी घेऊन बाजारांत पळतात आणि परुळेकर चक्क स्वयंपाकघरांत मटाराच्या शेंगा सोलीत बसतात.

पण एवढ्यानं माझं दुर्दैव संपत नाहीं. धपाट्यांची तीव्रता वाढल्यामुळें पोरांचे 'रेडियो' सुरू होतात. आमच्या चाळींत रडण्याच्या बाबतींत आमचीं मुलं जागतिक रेकॉर्ड मोडतील असा सर्वांचाच विश्वास आहे. अखंड पदयात्रा, अखंड नामसप्ताह, याच मालिकेंत आमच्या मुलांचा अखंड 'रुदन–सप्ताह' ठेवल्यास चालण्यासारखा आहे. आमच्या चाळींतील यच्च यावत् पोरं रडायच्या कलेंत अगदीं पटाईत आहेत. पण त्यांतल्या त्यांत आमचीं मुलं जरा सरस—पहिल्या क्रमांकाचीं आहेत. (अर्थात् माझ्या बायकोच्या मतें, आपल्या घरच्या वळणावर गेलींत मारीं!) त्यामुळं सिलोन रेडियोपेक्षां अत्यंत पॉवरफुल असा हा रेडियो लागला, (या रेडियोंत एकाच वेळीं अनेक स्टेशनें लागतात,) कीं मला पेपर टाकून घरांत जावंच लागतं.

मी भीतभीतच आंत जातों. कारण परिस्थिति काय असेल याची कल्पनाच करवत नाहीं मला. सिलोननंतर 'विविध भारती' चा 'पंचरंगी' कार्यक्रम लागायचाच असं ठरलेलंच आहे. मी आंत जातांच "त्या मेल्या पेपरांत तोंड खुपसून काय बसायचं सबंध दिवस!— या पोरांनीं जीव खाल्लाय् माझा! माणसानं जरा तरी संसारांत लक्ष हवं —" इत्यादि सुभाषितं बाहेर पडूं लागतात. या सुभाषितांच्या मागोमाग माझ्या सर्व अपराधांचा आणि गतपातकांचा पाढा वाचला जातो. अशा वेळीं शहाण्या नवऱ्यानं तोंडांत मारल्यासारखा चेहेरा करायचा असतो हा आधुनिक संसारशास्त्रांतील महत्त्वाचा सिद्धांत मला पाठ असल्यामुळं मी अगदीं दीन-वाणा ओशाळलेला चेहेरा करून बसतों. माझ्या या 'ट्रिक' चा फार उत्तम परिणाम होऊन मला बाहेर पेपर वाचत बसायची परवानगी मिळते आणि

लागलीच चहाचा कप घेऊन सौभाग्यवती बाहेर येते. पण नुसता चहा नव्हे बरं, बरोबर खोबऱ्याच्या वड्या आणि चकल्याहि असतात.

चहाबरोबर चकल्या, थालीपीठ, साबुदाण्याचा वडा, बटाटे-पोहे, इत्यादि वस्तूंपैकीं एखादी चुरचुरीत वस्तु आली (एखादा मित्र चहाला आलेला असतानांहि ) कीं नक्की समजावं,—यांत कांहींतरी धोका आहे ! कारण अनेक वेळां मला एक थालीपीठ पंधरा रुपयांनीं महाग पडलंय्. एका खोबऱ्याची वडी पांच रुपये बारा आण्यांना पडलीय्. कारण थालीपिठाच्या मागोमाग—"मेलं किती दिवस घेईन-घेईन म्हणून म्हणतेय्, आज एक साधं पातळ घ्यायला जाऊं या " [ यांतील शेवटचा 'गडे' हा गोड शब्द मीं गाळला आहे. कारण कादंबऱ्यांतून नेहमीं आढळणारा हा गुदगुल्या करणारा 'गडे' गेल्या पंधरा वर्षांच्या संसारांत मला एकदांहि ऐकायला मिळालेला नाहीं. मराठी कादंबरीकार किती थापेबाज आहेत याचा हा धडधडीत पुरावा पहा ! ] आतां साधं रोजचं नेसण्याचं पातळ—वायल किंवा प्रिंटेड—अशी भाषा वापरून बायको आपल्याला चक्क बनवते, आणि पंधरा सोळा रुपयांना गंडा घालते. या नेहमींच्या अनुभवामुळं चकल्या आणि खोबऱ्याच्या वड्या यांची संयुक्त आघाडी पाहून मी मनांतल्या मनांत चरकतोंच !

टेबलावर या दोन्ही वस्तू असलेली बशी अलगदपणें [ 'अलगदपणें' या क्रियेला संसारांत फार महत्त्व आहे. हीच बशी केव्हां केव्हां 'आदळली' जाते. कां ? ] ठेवली जाते आणि "आईनं आग्रह करून बोलावलंय्. मी दोन दिवस माहेरीं जाऊन येतें." असं धूर्त सुतोऽवाच केलं जातं. या सूतोऽवाचांतील 'आईनं आग्रह करून बोलावलंय्' या वाक्याला फार महत्त्व आहे. आजकाल संसारांत 'सासरा' नामक गोरगरिबाला कुणीच विचारीत नाहीं. त्याचा तो पूर्वींचा दरारा आणि प्रतिष्ठा आतां साफ लोपली असून ती प्रतिष्ठा सासूबाईनीं पटकावली आहे. पूर्वींच्या सास्वा जांवयाला लाजत, त्याच्याशीं बोलतांना दाराआडून बोलत, त्याच्या वाऱ्यालाहि उभ्या राहात नसत; तर आतां वेगळाच जमाना आलाय्. आतां बिचारे जांवईच सास्वांना लाजूं लागले आहेत. सासू आपल्या बायकोब-

रोबर स्वैंपाकघरांत बोलत बसलेली असली, तर कुणा जांवयाची प्राज्ञा आहे आंत जाण्याची ? त्यामुळं आज काल नवरा जास्त गडबड करायला लागला कीं बायको ' आईला सांगेन ' असा धाक घालते, आणि आम् नवरे-मंडळी चुपचाप मुतासारखी सरळ येते. त्यामुळं ' आईनं आग्रह करून बोलावलंय् ' या महामंत्राचा माझ्यावर नक्कीच परिणाम होणार याची बायकोला खात्री असते. पण आपण* सासुबाईंना घाबरतों असं उघड उघड दाखवलं तर आपण धूर्त नवरे कसले, या न्यायानं मी उगाचच्च उसना आव आणून गरजतों,–

"आईनं बोलावलंय् म्हणून काय झालं? परवांच तर माहेरीं जाऊन आलीस !"

"तें काय जाणं झालं? नुसती उभ्याउभ्या जाऊन आलें. पांच मिनिटं बसायलादिखील मिळालं नाहीं."

"अग, पण आजच्च काय अडलंय् ?––" मी जरा जोरांत विचारतों.

"अडलंय् नाहीं कसं ? — परवां भाईच्या दिलीपचा वाढदिवस आहे."

भाईच्या दिलीपचा वाढदिवस आहे, ही बातमी ऐकूनच माझ्या पोटांत गोळा येतो. आजकाल आमच्या संसारांतील हे वाढदिवस (आपल्या मुलांचे नव्हे, नातेवाइकांच्या मुलांचे !) म्हणजे एक नसता उपद्व्याप झालाय्. विशेषतः आपल्या भावांच्या मुलांच्या वाढदिवसाला आपण गेलंच्च पाहिजे— नुसतं नव्हे, तर चांगली घसघशीत भेट घेऊन,— असा आमच्या बायकोचा पण असल्यामुळं माझं बोलणंच खुंटतं. विशेषतः या भाईमंडळीबद्दल सर्वच बायकांना आदर असतो. हे भाईलोक आपल्या बायकोपेक्षां वयानं वडील असल्यामुळं बायकांचं म्हणणं असं कीं आपणहि त्यांना जोरदार मान द्यावा. पण हे सर्व भाईलोक एकजात चक्रम् असल्याचं आपलं प्रामाणिक मत असल्यामुळ आपण त्यांच्याशीं चक्रम्पणानं वागतो. त्यावर––"नाहींतरी यांचा स्वभावच चक्रम्! तरी बरं, तीं आपलीं माणसं (म्हणजे माझ्या सासरचीं) आहेत, म्हणून संभाळून

घेतात ! " असा बायकोचा शेरा आपल्याला वारंवार ऐकावा लागतो आतां मीच चक्रम ठरल्यामुळं अशा वाढदिवसाला जाऊं नकोस असं म्हणणं म्हणजे माझ्या दुर्लौकिकांत भरच पडणार, म्हणून मी उदार अंतःकरणानं बायकोला माहेरीं जायची परवानगी देतों. ( मनांत मात्र चार दिवस ही ब्याद जाईल तर सुटेन ही भावना असते. )

माहेरीं जायचं खरं; पण अशा ' भंगड ' माणसाकडे हें घर सोपवून जायचं म्हणजे काळजीच; त्यामुळं बायकोचं मन हेलकावे खातं. मधूनच ती म्हणते, " पण कशाला ? तुमचे जेवणाचे हाल होतील ! " खरं पाहिलं तर ' जेवणाचे हाल होतील ' हें वाक्य म्हणजे तिची एक ' ट्रिक ' असते आपण त्या ट्रिकला फसतों आणि म्हणतों, " छेः छेः ! जेवणाचे कसले हाल होणार ? तूं कांहीं काळजी करूं नकोस. " – आपण असं म्हटल्यावर ती चवताळते. " म्हणजे मी जायचीच वाट पहाताय् कीं काय ? असं असलं तर मी जातच नाहीं कशी ! "

या वेळचा बायकोचा अभिनय वास्तवपूर्ण असल्यामुळं ती जाण्याचा बेत रद्द करते कीं काय, अशा नाहीं–नाहीं त्या शंका आपल्या मनांत येऊं लागतात. आतां हिला बनवावं कसं, आणि ही ब्याद चार दिवस माहेरी पाठवावी कशी, याची युक्ति आपण शोधूं लागतों. अशा वेळीं एक हम खास उपयोगी पडणारी युक्ति म्हणजे बायकोचा प्रेमानं गालगुच्चा घेणं ' [ चुंबन नव्हे बरं का ? सिनेमांतल्या स्टाईलमधलं चुंबन दिवसाढवळ्या घेतलं तर आपल्या पतिव्रता भडकतात; तेव्हां हा प्रयोग करूं नका ! ] हा गालाचा चिमटा म्हणजे अत्यंत निरुपद्रवी; पण पोरांचं आपल्याकडे लक्ष नाहीं असं पाहूनच तो घ्यायचा असतो. त्यामुळं बायको भयंकर खूप होते. " इश्श ! हा काय चावटपणा ! चार पोरं झालीं... ' असं ती लाडांत येऊन म्हणते. त्यावेळीं आपण आणखी एक गालगुच्चा घ्यायचा, म्हणजे किल्ला सर ! लागलीच आपल्या दुष्ट हेतूबद्दलचे सारे संशय फिटतात !— नवऱ्याचं आपल्यावर विलक्षण प्रेम असून आपण जर चार दिवस माहेरीं गेलं तर त्याला वेड लागेल, तो वाळून अगदीं जरत्कारु होईल, अशी बायकोची बालंबाल खात्री होते. तरीपण या माणसाला असं मोकळं सोडलं तर ' केस ' हाताबाहेर जाईल, म्हणून

ती माहेरीं जायचा आपला बेत रद्द करण्याऐवजीं पक्का ठरविते. मात्र जाण्यापूर्वी ती आपल्याला खालील अटी घालते :—

३००२६
प्रा. ना.
२१९६
३-२-६१

१ जागरणं करायचीं नाहींत.

२ सिगारेटी जास्त ओढायच्या नाहींत.

३ वेळच्या वेळीं जेवायचं.

४ बाहेर जातांना कड्याकुलपं नीट लावायचीं.

५ झोंपतांना रेडियो बंद करायचा.

६ घड्याळाला किल्ली द्यायची.

७ लाँड्रीच्या रिसीटी हरवायच्या नाहींत.

८ दोन दिवसांनीं खुशालीचं पत्र टाकायचं.

या सर्व अटींना मुकाट मान्यता देण्याखेरीज आपल्याला गत्यंतर नसतं. यांतली एकहि आपल्या हातून कितपत पाळली जाईल याची आपली आपल्याला शंका असल्यामुळं, आपण विनतक्रार शरणचिठ्ठी लिहून देतों. हें सर्व आटोपल्यावर मग बायकोची बांधाबांध सुरू होते.

मला वाटतं, माहेरीं जाणाऱ्या बायकोच्या तयारीइतकी 'मोस्ट कॉम्प्लिकेटेड' केस कोणतीच नसावी. आईकडे जायचंयं म्हणजे बायकांना हजार हत्तींचं बळ येतं. जायचं तर रिकाम्या हातानं कसं जायचं? म्हणून चकल्या आणि शंकरपाळे तयार केले जातात. त्यानंतर बेडिंगबांधाबांध. यांत जुन्या फाटक्या कपड्यांचा एक गठ्ठाहि बांधावा लागतो. या जुन्या कपड्यांवर चांगलं जाडसं पितळेचं पातेलं वसूल करण्यांत आपली आई पटाईत आहे याबद्दल माझ्या बायकोची खात्री असल्यामुळं ती चार महिन्यांचा स्टॉक माहेरीं घेऊन जाते. त्यानंतर पोरांचे कपड्यांचे पांच पांच सेट्स्, विजयचा रिकाम्या सिगारेटच्या पाकिटांचा जुडगा, अभ्यासाचीं पुस्तकं [ विनाकारण, ] गाडींत आणि तिकडे वाचायला मासिकांचा गठ्ठा, बँकेचं चेकबुक (कारण माझ्यावर भरंवसा नाहीं!) सकाळचं ओलं पातळ आणि ओला परकर, इत्यादि चित्रविचित्र वस्तू बेडिंगमध्यें कोंबल्या-

जातात. याशिवाय गाडींत खाण्यासाठीं डबा, केळीं, बिस्किटें, गोळ्या यांचा स्वतंत्र भरणा असतोच.

आतां हें बेडिंग बांधायचं म्हणजे कठिण कर्म! आणि तें बांधल्यावर त्यांत एक अख्खा संसार कोंबलेला असल्यामुळं मलाच काय, पण माझ्या बापालाहि उचलणार नाहीं इतकं तें जड होतं. याशिवाय दोन ट्रंका असतातच. गाडीची वेळ जवळ आलेली असते. मी शेजारच्या रमेशला टॅक्सी आणायला पाठवतों, पण बायकोला आपल्या चपलाच गवसत नाहींत. त्या कपाटाखालीं कुठंतरी धूळ खात पडलेल्या असतात. शेवटीं आपल्याला ओणवं होऊन धुण्याच्या काठीच्या सहाय्यानं त्या चपला बाहेर काढाव्या लागतात.

चपला मिळाल्यावर सर्व कडीकोयंड्यांची तपासणी होते. आमच्या घर-मालकानं कडीकोयंड्यांच्या बाबतींत जास्त चिक्कूपणा दाखवलेला असल्या-मुळं, ऐन निघण्याच्या वेळीं मालकांचा यथास्थित उद्धार होतो. विशेषत: खिडक्यांचीं तावदानं एखाद्या हट्टी पोराप्रमाणं मुळींच लागत नसल्यामुळं त्यांच्याशीं बराच वेळ झटापट करावी लागते. बाहेर टॅक्सीवाला शंख करी-तच असतो. पण जाण्यापूर्वी आरसबाई आणि परुळेकरबाई यांना घरावर (म्हणजे माझ्या हालचालीवर) जरा लक्ष ठेवायची हक्काची विनंती करण्यांत येते. आमची ही वरात पहायला चाळींतले सर्वजण गॅलरींत जमा झालेले असतात.

"नाहीं तरी मेल्यांना संवयच! कुणी निघालं, कीं आले कामं टाकून बाहेर!" असं पुटपुटत 'मंडळीं' टॅक्सीजवळ पोचतात. आणि परत एकदां अभिमानानं चाळीकडे पहात कुऱ्यींत टॅक्सींत बसतात.

स्टेशनवर आपल्यासारखे अनेक पीडित नवरे आपापल्या बायकांना पोंचवायला आलेले असतात. आमच्या बायकोला स्टेशनवर आल्यावर हमालाशीं हुज्जत घालायची फार वाईट संवय आहे. एकंदरींत मला हमाल लोकांचा चांगला अनुभव आत्तांपर्यंत आलेला नसल्यामुळं, हमाल जो दर मागेल त्या दराला मी कबूल होतों. पण हमाल आणि टांगेवाला आगाऊ दर सांगतील तर शपथ! "साहेब, काय तरी समजून द्या. तुम्ही काय

रोजचेच, नेहमीं देतां तें द्या." अशी भाषा करून ते आपल्या गळीं पडतात. आपल्याबरोबर बायको असली कीं हमाल जरा नरम येतो. त्याला माहीत असतं कीं, बाई कांहीं आपला निभाव लागूं देणार नाहीं. शेवटीं योग्य त्या दरानं तो सामान उचलतो, आणि पाळीव कुत्र्याप्रमाणं आपल्या मागोमाग यायला लागतो.

कुणाहि माणसाला स्टेशनवर पोंचवायला जायचं म्हणजे मला एक भयंकर दिव्य वाटतं. कारण गाडी आणि गर्दी या अभिन्न बाबी आहेत आणि त्यामुळं जागा पकडण्यासाठीं तीनची गाडी असली कीं आपल्याला एकलाच स्टेशनवर हजर राहावं लागतं. हमाल नेहमीं टोकून देतो,— 'साहेब, गाडी दीडला फलाटला लागेल; जागा पकडून द्यायला पाहिजे असेल तर काय तरी समजून द्या.' ही 'समजून द्या' ची भाषा आपल्याला पूर्णपणें समजलेली असल्यामुळं गर्दीच्या दिवसांत आपण हमालाला पूर्णपणें शरण जातों. पण दीड ते तीन वाजेपर्यंत, म्हणजे गाडी फलाटला लागल्या-पासून तों सुटेपर्यंतचा कंटाळवाणा वेळ कसा घालवावा याचा मला तरी बिकट प्रश्न पडतो.

आगगाडीच्या फलाटावर, गाडीनं जाणाऱ्यांपेक्षां पोंचवायला आलेल्या मंडळींचीच भाऊगर्दी अधिक असते. एखाद्या नव्या नवरीची पाठवणी करतांना स्टेशनवर कांहीं लोक ओक्साबोक्शीं रडत असतात. साधारणपणें पोंचवायला जातांना हटकून एखादा रुमाल भिजवायची कला अनेक चतुर लोकांना साध्य झालेली असते. कांहीं लोक 'जोक्स' मारून जाणाऱ्या प्रवासी पाहुण्यांना हंसवायचा यथाशक्ति प्रयत्न करीत असतात, तर कांहीं लोक पोरांचे मुके घेणें, त्यांना इकडून तिकडे नाचवणें, बिस्किटांचा नाहींतर चॉकोलेटचा पुडा घेऊन देणें, इत्यादि गोष्टींत मग्न असतात. आमच्या विजयला स्टेशनवर नेहमीं 'गोल्ड स्पॉट'ची तहान लागते. आणि बायकोला घरीं चहा पीत असली तरी स्टेशनवर कॉफी लागते. विजय 'गोल्ड स्पॉट' शिवाय आतां जगणंच अशक्य आहे अशी माझी खात्री झाली कीं मी नाइलाजानं पांच आण्यांचं व्यर्थ नुकसान सोसतों. कारण तें 'गोल्ड स्पॉट' एक-चतुर्थांश देखील विजयाच्या घशाखालीं जाणार नाहीं

तेवढ्यांत आपल्याला चहाची तल्लफ येते. ' हॅट्! चहा—चहा म्हणजे काय ? झटकन करून टाकूं ' असं म्हणून आपण चहाच्या तयारीला लागतों. पण कुठून तयारी करावी हेंच कळेनासं होतं. चहाचं भांडं सांपडतं; पण फळीवरच्या तीनशेंपन्नास 'डालडा ' च्या डब्यांपैकीं कोणत्या डब्यांत चहा आणि कोणत्या डब्यांत साखर आहे हें एक ब्रह्मदेव आणि बायको यांच्याशिवाय कुणालाच माहीत नसल्यामुळं, आपण क्षणभर कुंठित होतों. फळीवरच्या त्या प्रत्येक डब्याचं संशोधन करायचं म्हणजे दिव्य असतं. पण आपण चहासाठीं अगदीं पेटलेले असल्यामुळं, काय वाटेल तें झालं तरी चहा करायचाच असा निर्धार करतों अन् त्या डब्यांच्या समुद्रांतून हवे असलेले डबे शोधून काढतों. अर्थात् या संशोधनांत आपली निम्मी शक्ति खलास झालेली असते. त्यानंतर कांकडा आणि पंप यांच्या सहाय्यानं स्टोव्हशीं अर्धा तास मारामारी करून आपण स्टोव्ह पेटवतों. आणि कामाला लागल्यापासून तब्बल एका तासानं आपला अमृततुल्य चहा तयार होतो.

इतक्यांत कुणीतरी दरवाजा खडखडावतं. बहुधा मोलकरीण आलेली असते. बायको घरांत नसतांना मोलकरीण घरांत आली कीं आपली भयंकर पंचाईत होते. मोलकरणीशीं बोलायचं तरी काय आणि तिला हुकूम तरी कसा फर्मावायचा ? बरं, जोरांत आवाज काढला तरी पंचाईत आणि थोडं नरमाईनं बोललं तरी बोंब ! साधारणपणें कोणत्याच मोलकरणीचं आपल्याबद्दल अनुकूल मत नसल्यामुळं, आपण ' तिला काय करायचं असेल तें करूं दे ' अशा आविर्भावांत वर्तमानपत्राचं वाचन करण्यांत गढून जातों. नेहमीं जी मोलकरीण तासभर राबत असते ( चांगलं व्याख्यान ऐकत ), तीं आज दहा मिनिटांतच पळ काढते. पण आपण पुरुषमाणूस असल्यामुळं आपली परिस्थिति बिकट असते. करणार काय ?

बायको माहेरीं गेल्यावर आपल्याकडे अनेक तिऱ्हाईत माणसें येऊं लागतात. " बाई आहेत का ? " असं विचारीत एक गृहस्थ येतो. या

गृहस्थाचं आपण कधीं तोंडहि पाहिलेलं नसतं. हा गृहस्थ म्हणजे आपल्या 'पोटाला घालणारा' वाणी नामक सद्गृहस्थ. या वाण्याशीं कोणत्याहि प्रकारची वाटाघाट करण्यासारखी आपली मनःस्थिति नसते, तरीपण "सामान काय पाठवून देऊं?" असं तो विचारतोच. "सामान कांहीं नको," असं उत्तर देऊन आपण त्याला धुडकावून लावतों, पण वेटा हालत नाहीं! शेवटीं "बाई बाहेरगांवीं गेल्यायत?" असा प्रश्न विचारीत आपल्याकडे तुच्छतापूर्वक पाहून तो वैश्यपुत्र निघून जातो.

वाण्याप्रमाणें सकाळींच दूधवाला टपकतो. पहांटे आपली झोंपमोड करणाऱ्या आम दूधवाल्यांबद्दल मला भारी राग आहे. मी मंत्री झालों तर पहांटे दूध घालायची बंदी करीन. आपण साखरझोंपेंत असतांना दरवाजा खडखडावत बसणाऱ्या दूधवाल्याबद्दल आपलं मत कधींच चांगलं नसतं. आपण धडपडत सकाळच्या अंधारांत उठतों, वाटेंतल्या खुर्चीला ठेंचकाळतों. त्यामुळें कळवळून "कौन है? कोण आहे?" असा आरडाओरडा करीत दरवाजा उघडतों. दूधवाल्यासमोर पातेलं ठेवतों. नेहेमीप्रमाणं त्यानं पूर्ण पाऊण शेर दूध ओतल्यांवर आपल्या लक्षांत येतं कीं बायकोनं पावशेरच घ्यायला सांगितलंय! त्यावर आपण त्याला म्हणतों,—

"भय्या! इतना दूध नहीं मंगता है. फक्त पावशेर डालो. बाई बाहेर गाम गया है."

आपल्या विचित्र राष्ट्रभाषेनं भय्या खचून गेलेला असतोच. कारण सौभाग्यवती त्याच्याशीं अगदीं बाळबोध मराठींत बोलते. फक्त केव्हां तरी 'दूधमें कितना पानी है' असा सवाल ती हिंदींत करते. 'बाई बाहेरगाम गया है' या वाक्यानें त्याच्या ध्यानीं खरा प्रकार येतो आणि आपल्याला न समजेल अशा अस्सल हिंदुस्थानींत आपल्याला शिव्या देत बिचारा तें सगळं दूध परत ओतून घेऊन पावशेर दूध देऊन जातो. आपण दरवाजा बंद करून परत झोंपीं जातों, तेवढ्यांत पुन्हा दरवाजा वाजतो. दूधवाल्यानंतर आणखी हा कोण उपटला हें आपल्या ध्यानीं येत नाहीं. दार उघडतों, तर

तेवढ्यांत आपल्याला चहाची तल्लफ येते. ' हॅट्‌ ! चहा—चहा म्हणजे काय ? झटकन्‌ करून टाकूं ' असं म्हणून आपण चहाच्या तयारीला लागतों. पण कुठून तयारी करावी हेंच कळेनासं होतं. चहाचं भांडं सांपडतं; पण फळीवरच्या तीनशेंपन्नास ' डालडा ' च्या डब्यांपैकीं कोणत्या डब्यांत चहा आणि कोणत्या डब्यांत साखर आहे हें एक ब्रह्मदेव आणि बायको यांच्याशिवाय कुणालाच माहीत नसल्यामुळं, आपण क्षणभर कुंठित होतों. फळीवरच्या त्या प्रत्येक डब्याचं संशोधन करायचं म्हणजे दिव्य असतं. पण आपण चहासाठीं अगदीं पेटलेले असल्यामुळं, काय वाटेल तें झालं तरी चहा करायचाच असा निर्धार करतों अन्‌ त्या डब्यांच्या समुद्रांतून हवे असलेले डबे शोधून काढतों. अर्थात्‌ या संशोधनांत आपली निर्म्मी शक्ति खलास झालेली असते. त्यानंतर कांकडा आणि पंप यांच्या सहाय्यानं स्टोव्हशीं अर्धा तास मारामारी करून आपण स्टोव्ह पेटवतों. आणि कामाला लागल्यापासून तब्बल एका तासानं आपला अमृततुल्य चहा तयार होतो.

इतक्यांत कुणीतरी दरवाजा खडखडावतं. बहुधा मोलकरीण आलेली असते. बायको घरांत नसतांना मोलकरीण घरांत आली कीं आपली भयंकर पंचाईत होते. मोलकरणीशीं बोलायचं तरी काय आणि तिला हुकूम तरी कसा फर्मावायचा ? बरं, जोरांत आवाज काढला तरी पंचाईत आणि थोडं नरमाईनं बोललं तरी बोंब ! साधारणपणें कोणत्याच मोलकरणीचं आपल्याबद्दल अनुकूल मत नसल्यामुळं, आपण ' तिला काय करायचं असेल तें करूं दे ' अशा आविर्भावांत वर्तमानपत्राचं वाचन करण्यांत गढून जातों. नेहमीं जी मोलकरीण तासभर राबत असते ( चांगलं व्याख्यान ऐकत ), तीं आज दहा मिनिटांतच पळ काढते. पण आपण पुरुषमाणूस असल्यामुळं आपली परिस्थिति बिकट असते. करणार काय ?

बायको माहेरीं गेल्यावर आपल्याकडे अनेक तिऱ्हाईत माणसें येऊं लागतात. " बाई आहेत का ? " असं विचारीत एक गृहस्थ येतो. या

गृहस्थाचं आपण कधीं तोंडहि पाहिलेलं नसतं. हा गृहस्थ म्हणजे आपल्या 'पोटाला घालणारा' वाणी नामक सद्गृहस्थ. या वाण्याशीं कोणत्याहि प्रकारची बाटाघाट करण्यासारखी आपली मनःस्थिति नसते, तरीपण "सामान काय पाठवून देऊं?" असं तो विचारतोच. "सामान कांहीं नको," असं उत्तर देऊन आपण त्याला धुडकावून लावतों, पण बेटा हालत नाहीं! शेवटीं "बाई बाहेरगांवीं गेल्यायत?" असा प्रश्न विचारीत आपल्याकडे तुच्छतापूर्वक पाहून तो वैश्यपुत्र निघून जातो.

वाण्याप्रमाणें सकाळींच दूधवाला टपकतो. पहांटे आपली झोंपमोड करणाऱ्या आम दूधवाल्यांबद्दल मला भारी राग आहे. मी मंत्री झालों तर पहांटे दूध घालायची बंदी करीन. आपण साखरझोंपेंत असतांना दरवाजा खडखडावत बसणाऱ्या दूधवाल्याबद्दल आपलं मत कधींच चांगलं नसतं. आपण धडपडत सकाळच्या अंधारांत उठतों, वाटेंतल्या खुर्चीला ठेंचकाळतों. त्यामुळें कळवळून "कौन है? कोण आहे?" असा आरडाओरडा करीत दरवाजा उघडतों. दूधवाल्यासमोर पातेलं ठेवतों. नेहेमीप्रमाणं त्यानं पूर्ण पाऊण शेर दूध ओतल्यावर आपल्या लक्षांत येतं कीं बायकोनं पावशेरच घ्यायला सांगितलंय! त्यावर आपण त्याला म्हणतों,—

"भय्या! इतना दूध नहीं मंगता है. फक्त पावशेर डालो. बाई बाहेर गाम गया है."

आपल्या विचित्र राष्ट्रभाषेनं भय्या खचून गेलेला असतोच. कारण सौभाग्यवती त्याच्याशीं अगदीं बाळबोध मराठींत बोलते. फक्त केव्हां तरी 'दूधमें कितना पानी है' असा सवाल ती हिंदींत करते. 'बाई बाहेरगाम गया है' या वाक्यानें त्याच्या ध्यानीं खरा प्रकार येतो आणि आपल्याला न समजेल अशा अस्सल हिंदुस्थानींत आपल्याला शिव्या देत बिचारा तें सगळं दूध परत ओतून घेऊन पावशेर दूध देऊन जातो. आपण दरवाजा बंद करून परत झोंपीं जातों, तेवढ्यांत पुन्हा दरवाजा वाजतो. दूधवाल्यानंतर आणखी हा कोण उपटला हें आपल्या ध्यानीं येत नाहीं. दार उघडतों, तर

पाववाला! पण पाववाला आपल्याशीं प्रेमपूर्वक संभाषण करण्याच्या भानगडींत न पडतां एक अख्खा पाव (आपल्याला आज नको असतांनाहि) आपल्या अंगावर भिरकावून निघून जातो. आतां अशा परिस्थितींत झोंपणार काय, कपाळ? म्हणून अंगावर पांघरूण घेऊन पेपर वाचीत पडतों. आणि दहा मिनिटांनीं जोगच्या जागीं अस्वस्थ होतों. कारण आपल्या लक्षांत येतं कीं, आपल्याला चिमटे काढून उठविणारी प्रिया आज नाहीं. आतां टूथब्रश कोण शोधून देणार आणि आपल्या हातांतलं वर्तमानपत्र हिसकावून चहा प्यायला कोण लावणार?

बायको माहेरीं गेल्यावर आपली आणखी एक पंचाईत होते, ती दाढीच्या सामानाबाबतची. बायको असतांना आपल्याला फक्त दाढी करायचं काम असतं, दाढीचा ब्रश आणि ब्लेड धुवायचें काम तीच मोठ्या आस्थेनें करीत असते. पण ब्रह्मचर्याश्रमांत तो दाढीचा ब्रश धुवायची बिकट कामगिरी आपल्यावर येऊन पडते. ईश्वरानं पुरुषाला दाढी दिली नसती तर काय बहार झाली असती, असे विचार मनांत येऊन आपण ईश्वराच्या अडाणीपणाबद्दल त्याला वारंवार दोष देऊं लागतों. अणुबॉम्ब शोधून काढणारे मूर्ख शास्त्रज्ञ दाढी विनासायास अर्ध्या मिनिटांत करायचं एखादं स्वस्त यंत्र कां शोधून काढीत नाहींत याचंहि आपल्याला नवल वाटतं. कदाचित् शास्त्रज्ञमंडळी दाढ्या वाढवीत असल्यामुळं त्यांना या गोष्टीचं महत्त्व वाटत नसावं, किंवा बेटे आजीव ब्रह्मचारी असावेत.

दाढीनंतर अंघोळ हा एक तापदायक प्रकार! बायको असतांना तिनं दहा वेळां तरी आरडाओरडा केल्याशिवाय आपण अंघोळीला उठत नाहीं. अकराव्या आरोळीनंतर उठलोंच, तर तिच्यावर मोठी मेहेरबानी केलीय् अशा आविर्भावांत. शिवाय बाथरूममध्यें टॉवेल नसला तर तिच्या माहेरच्या गबाळेपणावर एक लेक्चर द्यायला मुभा! आज मात्र टॉवेलच काय, पण साबण आणि तपेली यांचाच कुठं पत्ता नसतो! त्यामुळं आपल्याशींच चरफडत त्यांच्या शोधार्थ घरांत वणवण करीत हिंडावं लागतं. तेवढ्यांत नळाखालीं विसाणाच्या पाण्यासाठीं म्हणून ठेवलेली बादली तुडुंब

भरून वाहूं लागते. आणि पाणी थंडगार होतं. शेवटीं आपल्या मूर्खपणाला दोष देत आपण आपलं ‘ काकस्नान ’ आटोपतों.

अंघोळीनंतरहि आपले हाल संपलेले नसतात. डोक्याला लावायचं तेल सांपडतं, पण कंगवा सांपडत नाहीं. जगांत वेळेवर न सांपडणाऱ्या ज्या वस्तू आहेत त्यांत कंगव्याचा पहिला नंबर लागेल. कंगव्याची आपल्या बायकांशीं जानी दोस्ती असल्यामुळं त्यांना तो हटकून वेळेवर सांपडतो; पण आपल्याला मात्र झुकांडी देतो. आणि सांपडलाच तर त्यांत हटकून केंसांची गुंतवळ सांपडायचीच ! शेवटीं कंगव्याचा शोध करायचा नाद सोडून देऊन आपण मोडक्या फणीवर भागवतों. त्यामुळं आपले केंस राजकपूरच्या ‘ स्टाईल ’ वर विंचरले जातात. यानंतर कपाटाची मनधरणी करावी लागते. आपले बुशशर्ट आणि पॅंट कुठं ठेवलेलीं असतात हें आपल्याला कधींच माहीत नसतं. समोर ठेवलेले कपडे मुकाट्यानं चढवायचे असा आपला शांततापूर्ण बाणा असल्यामुळं, कोणते कपडे कुठं आहेत, लॉंड्रींत कोणते आहेत, कोणते फाटले आहेत, इत्यादि वस्त्रविषयक बारकावे आपल्याला अज्ञातच असतात. त्यामुळं कपाटांतील व्यवस्थितपणावर बोळा फिरवून आपण आपले कपडे शोधून काढतों. या ‘ पटसंशोधन ’ प्रसंगीं मात्र बायको हा प्राणी किती उपयुक्त आहे याची आपल्याला खात्री पटते.

त्यामुळं एकंदरींत विवाहानंतरचं हें ब्रह्मचर्य आपल्या हातून कसं पार पाडलं जाणार याची आपल्याला चिंता वाटूं लागते ! संध्याकाळीं ऑफिस सुटलं कीं कांहीं कां असेना, घरीं जायची ओढ असे. — त्यामागं धाक अगर प्रेम, कांहींहि असो; पण सर्व नवऱ्यांचे पाय बिनतक्रार घराकडे वळतात ही गोष्ट कबूल केली पाहिजे. त्यामुळं रोजच्या संवयी-प्रमाणं आपणहि घरीं येतों. घराला एक प्रकारचा कुंदपणा आलेला असतो. खुर्च्या-टेबलंहि कशीं दीनवाणीं वाटूं लागतात. सकाळचं चहाचं भांडं तमंच ताटकळत पडलेलं असतं. साखरेचा डबा आपण उघडाच टाकून गेलेलों असतों; आणि जातांना नळ बंद करायचं विसरल्यामुळं स्वयंपाकघरांत तळं निर्माण झालेलं असतं.

अशा वेळीं, बायको घरीं असतांना 'काव-काव' करणारे मित्र कुठें भूमिगत झालेले असतात, कुणास ठाऊक! आपला वेळ घालवायला एकहि गृहस्थ येत नाहीं. आपण परुळेकरांकडे जावं तर ते आपल्या बेबीला औषध पाजीत असतात, आणि आरसांकडे जावं तर ते बिछान्यांतले ढेकूण मारीत बसलेले असतात. आपल्या ब्रह्मचर्यामुळं आपलं कुणीहि प्रेमानं स्वागत करीत नाहीं. सर्वजण आपल्याकडे संशयानं पहात असतात. आपण आरसांकडे आणखी पांच मिनिटं बसूं या असा बेत करतों, तर त्यांच्याकडे साईबाबांच्या आरतीची वेळ झालेली असते. अशा वेळीं हा नास्तिक माणूस जाईल तर बरं, अशा भावनेनं सर्वजण आपल्याकडे पहात असतात. आपल्याला हें कळतं आणि आपण काढता पाय घेतों.

संध्याकाळीं खाणावळीचा डबा म्हणजे काय भयंकर चीज आहे याचा अनुभव येतो. विशेषतः त्यांतली तांबड्या भोपळ्याची भाजी आपल्या मस्तकांत चढते. कसेबसे दोन घांस खाऊन आपण उठतों आणि झोंपेची आराधना करूं लागतों. पण बायको घरांत असतांना पडल्या-पडल्या झोंपणारे आपण, बायको नसतांना मात्र झोंपेची आराधना करूनहि झोंपी जात नाहीं. अशा परिस्थितींत पहांट होते. आज सौभाग्यवतीचा 'मेमोरँडम्' येणार याची खात्री असतेच. त्याप्रमाणं सकाळीं नऊ वाजतां पोस्टमन पत्र आणून टाकतो. पत्राचा मायना, सुरूवातीचा प्राथमिक मजकूर नेहेमीप्रमाणं शेवटीं मात्र "तुमची फार आठवण येते. विजू फार मस्ती करतो. प्रकृतीला जपावें. पाववाल्याला पाव नको म्हणून सांगणें. बाहेर जातांना कुलूप नीट लावावें... आणि मला इथें कंटाळा आलाय; मी परवांच्या गाडीनें येत आहें. स्टेशनवर यावें..." आणि शेवटीं टीप :– "पत्र फार घाईंत लिहिलें आहे, त्यामुळें अक्षर फारच वाईट आलं आहे, त्याला हंसूं नये!"

'बायको येणार!' ही बातमी वाचतांच आपल्याला हायसं वाटतं, पण लगेच आपण केलेला घराचा 'अवतार' पाहून ती कशी भडकणार

याचं चित्र मनाशीं रंगवीत आपण घरसफाईतच दोन दिवस घालवतों. पण घरसफाई समाधानकारक न होतां अव्यवस्थितपणा आणखीच वाढतो.

आज ' बाई ' येणार म्हणून शेजारणी परत माझ्याकडे अनुकूलतेनं पाहूं लागतात. एखाद्या अपराधी गुन्हेगाराप्रमाणं आपण स्टेशनवर जातों. कारण आल्यानंतर या औट घटकेच्या राज्यांत आपण काय-काय अनर्थ माजवले आहेत याची झडती घेतली जाणार याची खात्री असते. त्यामुळं स्टेशनांत शिरणाऱ्या इंजिनाच्या धडधडाटाबरोबर आपल्या हृदयांतील धडधडाटहि वाढतो.

स्टेशनवर बायकोला उतरवून घेतांना आपल्या ध्यानीं येतं कीं, जातांनाच्यापेक्षां ओझं दामदुप्पट झालंय्. पण बोलायची सोय नसते. आपल्याला पाहून बायको हंसते.... विजय आपल्या पँटचा चोळामोळा करतो. बायको म्हणते,—

" इश्श ! मी दोन दिवस बाहेर गेलें नाहीं तर कित्ती वाळलांत ! "

—या प्रसंगीं पुढच्या प्रश्नांचा मारा थांबविण्यासाठीं एकच उपाय म्हणजे, आजारी माणसासारखा चेहेरा करणं ! कारण हा अभिनय जमला नाहीं, तर पूर्वीच्या आठ अटींची फेरतपासणी, घराची बारकाईनं पाहणी, आणि बापरे ! — कपाटांतला गोंधळ पाहून तर बेचाळीस पिढ्यांचा उद्धार ! —

त्यापेक्षां नको हें औट घटकेचें ब्रह्मचर्य, आणि तें सुख, असा विचार मनांत येऊन आपण साईबाबाचं नांव घेत घरीं येतों. नाहीं तर दुसरं काय करणार ?

# मी रेडीओ घेतों.

त्या दिवशीं मी ऑफिसांतून घरीं नेहमीपेक्षां जरा उशीराच आलों. आजकाल नवरा ऑफिसांतून उशीरा आला कीं बायका नुसतं थैमान मांडतात; त्यामुळें आज आपली धडगत नाहीं हें जाणून मी वाटेंत एक बिस्किटाचा पुडा आणि बायकोनें गेले आठ दिवस आरडाओरड करून सांगितलेली पाव रत्तल मोहरीची डाळ या वस्तू ढालीसारख्या उपयोगाला येतील म्हणून बरोबर घेतल्या आणि याशिवाय नाना सबबी मनांत तयार करून घरांत पाऊल टाकलं. पण काय आश्चर्य! घरांत आदळआपट कांहीं नाहीं. सारं कसं शांत शांत! आपण चुकून भलत्याच घरांत शिरलों नाहीं ना म्हणून मी बाहेर येऊन पाटी वाचली तर माझंच बिऱ्हाड. शिवाय बाहेरच्या भिंतीवर आमच्या विजयनें कोळशानें चक्क लिहून ठेवलेलं 'येथें रामभाऊ राहातात!' पण आमच्या घरांत मी ऑफिसांतून घरीं यायच्या वेळेलाही आबादीआबाद कशी? मी अगदीं बुचकळ्यांत पडलों. म्हटलं आमची सासूबाई आलीय कीं आमच्या बायकोला शब्दकूटस्पर्धेंत उत्तेजनार्थ बक्षिस मिळालं?

अशा 'शांत' वातावरणांत रहायची संवय नसल्यामुळें कोट खुंटीवर अडकविला तरी मला गुदमरल्यासारखं वाटूं लागलं. प्रिय सौभाग्यवतीचं तें किंचाळणं अजून बाहेर येत नाहीं किंवा अजून कशी कपबशी फुटत नाहीं याचा मी विचार करीत होतों? इतक्यांत हास्यमुद्रेनें सौभाग्यवती चहाचा कप घेऊन बाहेर आली. अगदीं सिनेमांतल्यासारखं! लाजत मुरकत! शिवाय चहाचा कप माझ्या हातीं देतांना बायको गोड हंसली. रमणीचं गोड हास्य कवींच्या लंब्या चौड्या काव्यांतून ऐसपैस प्रमाणांत आढळत असलं तरी आमच्या संसाराच्या महाकाव्यांत बायकोचं गोड हास्य हीं एक दुर्मिळ

अलंकाराची बाब झालीय. त्यामुळें अलंकाराचं आमिष असल्याशिवाय बायको फुकट फार हंसत नाहीं. हा नेहमीचा अनुभव असल्यामुळें मी चरकलोंच. आमच्या बायकोचं रडणं मला परवडतं पण तिचं हंसणं मला रडवतं अशी खात्रींच. तरी पण धीर धरून हातांतल्या कपाकडे न पहातां मी जरा ओढून ताणून भाव खायचं ठरवलं, आणि म्हटलं—

"कशाला हा त्रास चहाचा–तुला?"

"इश्श! [जरा लाडिकपणें] – ऑफिसांतून दमून भागून यायचं जरा चहानें हुशारी येते."

इतर वेळीं चहाला 'जळ्ळा मेला चहा' अशी त्याची यथार्थ संभावना करणारी आमची सौभाग्यवती आज ही 'कषायपेयप्रशस्ति' कां करते हें कांहीं क्षण मला समजेना. मोठ्या दमांत मी चहाचा घुटका मारतों.

"आपण घ्यायचा ना? परत तोच संशयास्पद लाडिकपणा."

"घेतोय ना मी—" मी खोट्या अज्ञतेनें.

"इश्श! चहा नव्हे रेडियो!"

"रेडियो? चहाचा घुटका घशांत अडकल्यामुळं मी कळवळलों.

"हें काय? तुम्हीच म्हणत नव्हतां का– या वर्षी दिवाळीला रेडियो घ्यायचा म्हणून"

"अग मी म्हटलं म्हणून काय झालं"

"तुम्ही म्हटलंत म्हणून तर मी चाळींत सर्वांना सांगूनहि टाकलं कीं आम्ही दिवाळींत रेडियो घेणार म्हणून!

"अगपण अगदीं याच दिवाळीला काय घाई आहे अगदीं?— पुढच्या वर्षी घेऊं? हें वाक्य मी जरा जादा आत्मविश्वासानें उच्चारलें.

"चार वर्षं घेऊं या, घेऊं या म्हणून चाललंय! मेली एवढी हौस ती कसली नाही (एक हुकमी हुंदका)... परवां चिटणीसबाईनीं घेतला."

"अग त्या चिटणीस बाईचं काय सांगतेस? म्युनिसिपालटींत तिचा नवरा खोऱ्यानें पैसा ओढतोय–शिवाय सासऱ्याची मदत आहेच! आम्हांला आहे कां असं कुणी ?"

"उगाच सासऱ्यावर घसरूं नका ? आमचे अण्णा चांगला मोजून दोन हजार हुंडा द्यायला निघाले होते–तेव्हां का नाक मुरडलंत ? तरी बरं सोळा तोळे दागिने–दोन मांडवांचा खर्च—"

"पुरे–पुरे—आतां लग्नाचा इतिहास नको" मी मोठ्यानें ओरडलों. कारण आमच्या भांडणाचा शेवट शेवटीं लग्नावर यायचाच. त्यांत हिच्या अण्णांना किती तकलीफ पडली, आणि किती नाकदुऱ्या काढाव्या लागल्या–शेवटीं त्यांनींच म्हणून पांच लेकी पदरांत असतांना हें सोसलं–आणि असल्या भणंग माणसाला मुलगी दिली इत्यादि–मला पाठ झालेलं रोजचं कीर्तन ऐकावं लागलं असतं.

मी पुरे म्हणतांच बायको चवताळली.

"आतां पुरे कां—? तुमच्या घरांतून मला वारभर कापड तरी मिळालंय."

"कां ? बायको अधिकच रंगांत आली. आपल्या अण्णांच्या स्तुतीवरून आमच्या आप्पांच्या निंदेला सुरुवात व्हायचीच असा नियम असल्यामुळें–आणि या विषयावर तिचीं मतं साधार आणि अधिकृत असल्यामुळं इतर वेळीं मला तोंड बांधून मुक्याचा मार सहन करावा लागतो. पण आज मी या क्षणीं 'रेडियो घ्यायचा' हा मंत्र म्हटला तर आमच्या पिताजींची त्यांच्या सुनेकडून होणारी 'षष्ठी' थांबेल आणि बापाची सेवा केल्याचें पुण्य लाभेल म्हणून मी एकदम जाहीर केलें—

"पुरे–आतां ! आपण रेडियो घ्यायचा !"

"खरंच–घ्यायचा ना ?"

"घ्यायचा–अगदीं या रविवारीं"

"छान ! म्हणजे त्या गव्हाणकरणीची छान खोड मोडेल ! परवां मी मंडळाचा कार्यक्रम ऐकायला गेलें तर मेली म्हणते–आमचा रेडियो या शेजाऱ्यांनीं ऐकून ऐकून बिघडलाय–आतां अशी खोड मोडेल मेलीची !"

चाळींतल्या प्रत्येक बाईची खोड मोडायचा आमच्या बायकोचा निर्धार आहे, यासाठीं तिनें पंचवार्षिक योजना आंखली आहे. या योजनेंत मव्हाणकरिणीसारखा रेडियो, झारापकरीण बाईसारखा टेबल फॅन, सुशीलाताईसारखं उषा सुइंग मशीन, आणि केळकरांसारखं स्टीलचं कपाट या वस्तु आहेत. याशिवाय नॉयलॉनचं पातळ, कल्पनेचा डान्सिग क्लास, स्वयंपाकीणबाई (किंवा घरगडी), स्वयंपाकघरांत उंच ओटा आणि कोबा [घरमालकाच्या सौजन्यानें] इत्यादि डेव्हलपमेंट प्लॅन्स आहेतच ! पण आमच्या पंचवार्षिक योजनेंत नेहमीं तुटीचा अर्थसंकल्प असल्यामुळें अद्याप एकाहि शेजारणीची खोडकी जिरलेली नाहीं. त्यामुळें आमच्या आकाशवाणीच्या घोषणेमुळें तिचा आनंद आकाशांतहि मावेनासा झाला यांत नवल नाहीं.

अर्थात् रेडियोंत मलाहि स्वार्थ होताच. रेडियोमुळें बायको जशी आपल्या शेजारणींची खोड मोडणार होती. त्याप्रमाणें मीहि आमच्या ऑफिसांतील शेजाऱ्यांची खोड जिरवणार होतों. विशेषतः आमच्या ऑफिसांत नव्यानेंच लागलेली आशा काळे ही रेडियोवर अधून मधून धडपडत असे. पण तेवढं निमित्त काढून देशपांडे "आशाताई [ताई हें उगाचच !] कालचा तुमचा मालकंस झक्क होता. अगदीं रेडियो घेतल्याचं सार्थक झालं." असं म्हणून माझ्याकडे वळून—काय रामभाऊ तुम्हीं ऐकलात का आशाताईचा मालकंस ?"

यावर मी 'नाहीं बुवा' असं उत्तर देतांच बेटा "अरेच्या ! तुमच्याकडे अजून रेडियो नाहींच" असं जाहीर करून त्या पोरीसमोर माझं उणं काढायचा. या सगळ्या प्रकरणामुळें गेल्या महिनाभर आपण काय वाटेल तें झालं तरी रेडियो घ्यायचा. असा निश्चय केला होता. शिवाय आमच्या चाळींत फक्त आमच्याच मजल्यावर रेडियो नव्हता. तळ मजला आणि वरचा मजला. हे आम्हांला नेहमीं भिकारडा मजला म्हणून हिणवीत. त्यामुळें आमच्या मजल्याची सर्व प्रतिष्ठा आणि अब्रू राखणं आतां फक्त माझ्याच एकट्याच्या हिंमतीवर अवलंबून होतं. आमच्या घरीं रेडियोचा

चाळींतल्या प्रत्येक बाईची खोड मोडायचा आमच्या बायकोचा निर्धार आहे. यासाठीं तिनें पंचवार्षिक योजना आंखली आहे. या योजनेंत गव्हाणकरिणीसारखा रेडियो, झारापकरीण बाईसारखा टेबल फॅन, सुशीलाताईसारखं उषा सुइंग मशीन, आणि केळकरांसारखं स्टीलचं कपाट या वस्तु आहेत. याशिवाय नॉयलॉनचं पातळ, कल्पनेचा डान्सिंग क्लास, स्वयंपाकीणबाई ( किंवा घरगडी ), स्वयंपाकघरांत उंच ओटा आणि कोबा [घरमालकाच्या सौजन्यानें] इत्यादि डेव्हलपमेंट प्लॅन्स आहेतच ! पण आमच्या पंचवार्षिक योजनेंत नेहमीं तुटीचा अर्थसंकल्प असल्यामुळें अद्याप एकाहि शेजारणीची खोडकी जिरलेली नाहीं. त्यामुळें आमच्या आकाशवाणीच्या घोषणेमुळें तिचा आनंद आकाशांतहि मावेनासा झाला यांत नवल नाहीं.

अर्थात् रेडियोंत मलाहि स्वार्थ होताच. रेडियोमुळें बायको जशी आपल्या शेजारणींची खोड मोडणार होती. त्याप्रमाणें मीहि आमच्या ऑफिसांतील शेजाऱ्यांची खोड जिरवणार होतों. विशेषतः आमच्या ऑफिसांत नव्यानेंच लागलेली आशा काळे ही रेडियोवर अधून मधून धडपडत असे. पण तेवढं निमित्त काढून देशपांडे "आशाताई [ताई हें उगाचच!] कालचा तुमचा मालकंस झक्क होता. अगदीं रेडियो घेतल्याचं सार्थक झालं." असं म्हणून माझ्याकडे वळून—काय रामभाऊ तुम्हीं ऐकलात का आशाताईचा मालकंस ?"

यावर मी 'नाहीं बुवा' असं उत्तर देतांच बेटा "अरेच्या ! तुमच्याकडे अजून रेडियो नाहींच" असं जाहीर करून त्या पोरीसमोर माझं उणं काढायचा. या सगळ्या प्रकरणामुळें गेल्या महिनाभर आपण काय वाटेल तें झालं तरी रेडियो घ्यायचा. असा निश्चय केला होता. शिवाय आमच्या चाळींत फक्त आमच्याच मजल्यावर रेडियो नव्हता. तळ मजला आणि वरचा मजला. हे आम्हांला नेहमीं भिकारडा मजला म्हणून हिणवीत. त्यामुळें आमच्या मजल्याची सर्व प्रतिष्ठा आणि अब्रू राखणं आतां फक्त माझ्याच एकट्याच्या हिंमतीवर अवलंबून होतं. आमच्या घरीं रेडियोचा

आवाज सुरू झाला कीं यांचा 'आवाज' बंद होणार होता, आणि आवाज दामदुप्पट वाढणार होता.

झालं. मी रेडियो–आणि रविवारींच आणणार ही बातमी आमच्या मजल्यावर सोसाट्यासारखी पसरली. आमचे शेजारी गांधी, कुळकर्णी, बाळ नायडू, मामा कारखानीस, खुळे हे लोक भयंकर खूष झाले. कुळकर्ण्यांची नुकतीच कॉलेजांत जाणारी कमू यापुढें सिनेमांतलीं गाणीं घरच्या घरीं अर्थात् आपल्या मजल्यावरच ऐकूं येणार म्हणून खूष झाली. आमचा शेजारचा खुळे एकटा ब्रह्मचारी. त्याला व्यसन फक्त पोटदुखीचं. पण तोहि म्हणाला, "असावा, आपल्या मजल्यावर रेडियो असावा." सकाळींच कामावर जाण्यापूर्वीं आमचे मामा कारखानीस हजर.

"काय रामभाऊ काय चाललंय?"

"या–या–मामा–या–" मी मामांचं लांबरुंद हास्य करीत स्वागत केलं.

"कालच कळलं! तुम्ही रेडियो घेणार म्हणून, छान! छान! आतां असं करा आमच्या कारखान्यांत काळू सुतार आहे तो फर्स्ट क्लास एक रेडियो केस बनवून देईल–आणि तो वरचा जगताप आणि मेढेकर साले जळतात आपल्या मजल्यावर त्यांचाहि नक्षा उतरेल."

त्यावर मी जरा अधिकारवाणीनें म्हणालों–"या रेडियोनें त्या जगतापचे पुढें आलेले दांत चांगलेच पडतील. आणि त्या मेढेकरची भलती चरकीहि साफ उतरेल. पण मी रेडियो घेतलाय तो त्यांची खोड मोडण्यासाठीं नव्हे–आजकाल रेडियो पाहिजेच, शिवाय हिचं सारखं चाललं होतं."

"अस्सं अस्सं! "मामा खिंकाळले" म्हणजे वहिनींचा हट्ट!"

इतक्यांत मामांच्या नांवानें सदैव शिव्या देणारी आमची बायको त्यांच्यासाठीं गरम गरम चहा घेऊन आलेली पाहून मी थंडच झालों.

आमच्या घरून नवसासायासानें मिळणाऱ्या त्या चहाच्या कपावर अधाशासारखें तुटून पडत मामा म्हणाले, “ वहिनी, आतां नुसतं चहानें नाहीं भागायचं ! पार्टी हवी जंगी पार्टी ! ”

त्यावर माझ्याकडे विश्वासाई कौतुकानें पहात आमची सौभाग्यवती म्हणाली, “ देऊं देऊं कीं अगदीं जंगी पार्टी देऊं ! ”

मामा गेल्यापासून माणसांची रीघ लागली अगदीं. रेडियो यायच्या आंतच त्या बातमीचा खरेखोटेपणा तपासून पाहण्यासाठीं आमचे अण्णा राजे, नागेश बांवकर, नाईक, वाळकर, तात्या रेडे, माल्या, मध्या यांनीं सतरा खेपा घातल्या. एखाद्या पहिलटकरणीची जशी अगत्यानें चौकशी करतात तशी आमच्या बायकोची चौकशी; त्यामुळें ‘ आधींच मुरकट तशांत रेडियो ’ अशी आमच्या बायकोची अवस्था झाल्यामुळें चहा नी बिस्किटांचा तोबा उडाला. घराला अगदीं हॉटेलचं स्वरूप आलं. हॉटेलांत रेडियो कां लावतात याचा अर्थ त्यावेळीं मला कळला. या हॉटेलची मॅनेजर आमची बायको आणि मी वेटर ! शिवाय या चहाच्या गिऱ्हाईकांच्या चांभारचौकशा आणि सूचना यांनीं टेकीला आलों. एकाचं म्हणणं रेडियो बेडरूममध्यें असावा तर एकाचं म्हणणें बसायच्या खोलींत. कोणी सांगितलं कीं कपाटावर ठेवा तर एक म्हणाला फळी मारून घ्या. अलीकडे उंदरांना रेडियोचाहि नाद लागल्यामुळें रेडियोंत उंदीर शिरण्याचा बराचसा संभव असल्यामुळें केस करून घ्या, अशी सीरिअस सूचना. केस नेहमींच सीरिअस कां असते याचा उलगडा तिला पन्नास रुपये खर्च पडेल हें ऐकतांच झाला.

रेडियो घेणार या बातमीमुळें आमचा मजला हलला तशी आमची अगोदरच लटलटणारी चाळ आणखीन हादरली ! रेडियोची पेटी घेऊन मी टॅक्सींतून विजयी वीराच्या थाटांत बाहेर आलों. तेव्हां अख्खी चाळ मला बघायला लोटली होती. [ नाहींतरी या मेल्यांना टकमका बघण्याखेरीज उद्योगच नाहीं हा बायकोचा नेहमीचा शेरा मला पटला ]. तीनहि मजले

मला आणि माझ्या रेडियोला पहाण्यासाठीं उदंड भरले होते. एखादी चाळंतीण अकराव्या दिवशीं परतली कीं असेच आमचे चाळकर बंधू जमा होतात, ही आठवण मला असल्यामुळें क्षणभर मला लाजल्यासारखें झालें. त्यामुळें विविध भारतीच्या पंचरंगी कार्यक्रमाचे भाव माझ्या चेहेऱ्यावर उमटले होते. क्षणार्धातच मनाचा मोठा हिय्या करून पहिल्या मजल्यावर रेडियो आणणारा एकमेव वीर म्हणून नरवीर तानाजीच्या थाटांत आमच्या चाळीचा सरळसोट उभा आणि पान तंबाकूच्या रक्तानें चित्रविचित्र झालेला जिना, चढत असतांना अधुनमधून टवाळखोर शेजारी पुटपुटत होते तें मी कान लांब करून ऐकलं.

"रामभाऊंनीं शेवटीं आणला वाटतं रेडियो!–" एक समंजस शेजारीण, "अग कसला रेडियो घेऊन बसलीस? आणला असेल चोर-बाजारांतून–राम्याची काय छाती आहे नवा घ्यायची?"–तिचा अत्यंत यूसलेस नवरा (नाना घोडके.)

"काय हो नाना, या राम्यानें पैसा कुठून आणला–कां कुठें डल्ला मारला?"–एक टवाळखोर पाजी शेजारी. काका सातघरे.

"नानांना काय विचारतोस, मी सांगतों हा राम्या म्हणजे बायकोच्या हातचं बाहुलं. भेंड्याची भाजी खाणारा शिळपट तो काय डल्ला मारणार. सर्व ह्या सासऱ्याच्या जिवावर."

—लग्न न जमणारा डांबिस वामन्या चित्रे.

"अहो भाडयानें आणला असेल दिवाळीसाठीं" माझा शत्रु तात्या पिंगळे "म्हणजे दिवाळींत दिवाळं काढणार तर" आमच्या चाळींतील एकमेव नवकवि गोट्या कर्णिक.

माझ्या शत्रूंचीं हीं वाक्यं ऐकतांच माझ्या अंगाचा तिळपापड होत होता. पण रेडियोंतील एखाद्या श्रुतिकेंतीलच आहेत असं मानून मी संत तुकारामाच्या शांततेनें आमच्या बिऱ्हाडीं आलों. पंचारती घेऊन फक्त मला ओवाळण्याचं बाकी ठेवलं होतं आमच्या बायकोनं.

रेडियो आल्यानंतर तो कुठं ठेवावा त्याच्यावर पुष्कळ चर्चा आणि वाटाघाटी! मला वाटतं नभोवाणी खातंहि आपलं नवं स्टेशन सुरू करतांना एवढी वाटाघाट करीत नसेल. शेवटीं सर्वानुमतें ठराव पास झाला कीं रेडियो पुढच्याच खोलींत टीपॉयवर ठेवावा. रविवारीं सकाळीं ११ वाजतां रेडियोचे कार्यक्रम सुरू होतात त्यामुळें आमच्या बायकोनें सकाळींच पिठलं भात उरकून आपलं काम आवरलं होतं. केव्हां एकदां मी रेडियो लावतें असं तिला झालं होतं. कोणतीं बटनं कशीं फिरवायचीं याचं साग्रसंगीत ज्ञान करून घेतल्यावर ती स्टुलावर आरूढ झाली आणि तिनं विजय, कल्पना आदि मंडळींना रेडियो कसा लावायचा हें समजावून दिलं.

पण एवढ्यावरच विजयचं समाधान होईना. त्याच्या मनांत जगाचा दौरा करायची इच्छा झाली. तो म्हणाला,– " पपा, मला रशिया लावून दाखवा ना?" त्यावर कल्पना म्हणाली –" वेडा कुठचा–आतां रशियाचे लोक झोपले असतील. खरं कीं नाहीं हो पपा." आतां झाली कीं नाहीं पंचाईत. कारण शाळा सोडल्यापासून मी भूगोल साफ विसरून गेलों होतों. आपल्याकडे अंधार असतांना जगांत कांहीं देशांत प्रकाश असतो हें मला अंदाजानें ठाऊक होतं. आतां रशिया कुठें बसतो हें कुणा लेकाला ठाऊक? पण माझ्या मदतीला सौभाग्यवती धावून आली, ती म्हणाली–आतां कुठले रशियाचे कार्यक्रम. ते सर्व रात्रीं ऐकायला येतील."

त्यावर विजयनें आणखी एक शंका काढली.

" पपा–चंद्रावर रेडियो असेल काहो? मग लावाना चंद्राचें स्टेशन "

" बावळटच आहे अगदीं " कल्पना म्हणाली.

" चलचल्–चंद्रावर रेडियो असणारच - मला दिलीप सांगत होता."

चंद्रावर खरोखरच काय काय आहे यावर आतां आपल्याला एक व्याख्यान द्यावं लागणार या भीतीनें मी आतां गांगरलोंच होतों इतक्यांत आमच्या रेडियोला पहायला आलेल्या आमच्या बापूसाहेब कुळकर्ण्यांनीं माझी या कठिण प्रसंगांतून सुटका केली.

"काय रामभाऊ काय चाललंय् "

"कांहीं नाहीं – आजच आणलाय रेडियो" मी कौतुकांत म्हणालों.

"वा वा! छान झालं. अहो आजकाल रेडियोशिवाय मजा नाहीं. आतां आम्हीं दहा वर्षांपूर्वींच एक घेतला बरं-बरं पण कसला आहे हा रेडियो?

"म्हणजे कोणत्या मेकचा म्हणतां? हा आहे मेयो रेडियो."

"मेयो —नांव नाहीं कधीं ऐकलं तें? घ्यायचा तर चांगला मर्फीचा नाहींतर माकोनीचा घ्यायचा." बापूसाहेब शेरे मारते झाले.

"मेयो—म्हणजे जर्मन मेकचा–" मी मनांतल्या मनांत संतापून म्हणालों.

"अहो—या जर्मन रेडियोचा आजकाल भरंवसा नाहीं. काय काका-तुमचं काय मत?" बापूसाहेब आमच्या दुसऱ्या शेजाऱ्याला म्हणजे काका अवचटला विचारते झाले.

"अगदीं लाख बोललांत–" काका, अवचट तोंड वेंगाडीत म्हणाले रामभाऊ, तुम्ही स्वस्ताईच्या मागें लागून फसलांत.

" —अहो स्वस्ताई–नव्हे–चांगले चारशें पंचाहत्तर मोजलेत मी." मी उसळून म्हणालो.

"चारशें पंचाहत्तर–आणि या भिकारड्या रेडियोला–" काका अवचट किंचाळेच–" अहो, त्यापेक्षां कैसर कां नाहीं घेतलात–

"कैसर नव्हे कॉसर-कॉसर" बापूसाहेब—

"कैसर आणि कॉसर एकच खरंच रामभाऊ–मला नाहीं वाटत हा रेडिओ टिकेल असं. या मेयोसारखा परवां आमच्या राघूअण्णांनीं मेयर रेडियो घेतला. चांगले सहाशें रुपये मोजून दिले आणि आठ दिवसांत बाजा!" "बरं किती व्हॉल्वचा?"

"सात व्हॉल्व–?"

"सात व्हॉल्व–शक्य नाहीं–" परत काका किंचाळले. चारशें पंचाहत्तर रुपयांत सात व्हॉल्व ठेवलेत तुमच्या काकानें"

इकडे आमच्या मेयो रेडियोचा हा असा पंचनामा चालू असतांना आमची सौभाग्यवती घायाळ होत होती. नवसासायासानें झालेल्या मुलाच्या कुंडलींत अशुभ ग्रह आहेत असं सांगितल्यावर जशी स्थिति होईल तशी तिची झाली. आपल्या नवऱ्याच्या निवडीबाबत (तिची केलेली निवड सोडून) तिला शंका होतीच. शिवाय आमच्याकडे येणारे जाणारे सगळे प्रेक्षक आमच्या रेडियोवर टीकाच करूं लागले. मला वाटतं आपण जो रेडियो घेतों, त्यापेक्षां चांगलं मॉडेल दुसरं अस्तित्वांतच नाहीं अशी प्रत्येकाची समजूत असते. आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचा तो कारटा ही म्हण रेडियोबाबत मला पूर्णपणें प्रत्ययाला आली. याशिवाय आल्यागेल्या प्रत्येक पाहुण्या प्रेक्षकाला रेडियोचा मेक, त्याची किंमत, नवा कीं सेकंड हॅंड, कधीं घेतला-कमिशन काय मिळालें याचा साद्यंत रिपोर्ट चहाचा एक कप देऊन सांगावा लागे. त्यामुळें मी अक्षरशः कावून गेलों. शेवटीं एक दिवस आमच्या रेडियोच्यावर टांगण्यासाठीं मी एक बोर्ड तयार करून घेतला आणि पुढीलप्रमाणें टांगला.

## हा आमचा रेडियो

मालक–रामभाऊ रोडके (श्री. आणि सौ.)

रेडियोचें नांव—मेयो.

त्याचें गांव—जर्मनी

किंमत - अगदीं मोजून रोख चारशें पंचाहत्तर अधिक टॅक्सी
पांच रुपये ३ आणे. (१९ नये पैसे)
व्हॉल्व—सात—बॅंड स्प्रेड.

वि. सूचना: रेडियो ३० ऑक्टोबर १९५९ रोजीं घेतला. अगदीं नवा
आणि मोडेपर्यंत आमच्या मालकीचा. अधिक
माहितीसाठी सौ. रोडके यांना भेटावें.
(कृपया चहा एकदांच मिळेल)

सही–(गिचमिड अक्षरें)
राहाणार, कोंडिबाची पत्र्याचाळ.

पृच्छक आणि शंकितांच्या जाचाला कंटाळून मी ही पाटी लावली खरी, पण येणाऱ्याजाणाऱ्यांची टीका थांबली नाहीं. ही पाटी पाहून नवकवि गोष्या कर्णिक म्हणाला, " लेकाच्यानें मला सांगितलं असतं तर मी नसती एक कविता करून दिली? पण एक कप चहा त्याला महाग वाटतो ना? " ही पाटी मी माझ्या मतें सुवाच्च अक्षरांत लिहिली तर आमची शेजारीण सुशीलाताई मुद्दाम चावटपणानं विचारते-"सुधाताई, लावायचा बोर्ड तर चांगल्या अक्षरांत लावायचा-आमच्या सुनंदानं वळणदार अक्षरांत लिहून दिला असता" म्हणजे हा बोर्ड तयार करून मी माझंच अवलक्षण करून घेतलं.

या चौकशीवाल्या प्रेक्षकांच्या मागोमाग आमच्याकडे रसिक प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी लोटूं लागल्या. माणसाच्या ज्याप्रमाणें जाती असतात त्याप्रमाणें रेडियो श्रोत्यांच्या, नाना तऱ्हेच्या जाती असतात. कुणी फिल्मी संगीताचे शोकीन् तर कुणी श्रुतिकांचे, कुणाला गुरुवारचं कीर्तन, तर कुणाला विविधभारती, कुणाला बातम्या तर कुणाला गुंजीखाँचा अडाणा. यांतले कांहीं प्रेक्षक तर एकाचवेळीं यच्चयावत् सर्व रेडियो स्टेशनें लावण्यांत पटाईत असतात. ते कोणतेंही स्टेशन पूर्णपणें कधींच लावीत नसतात. मुंबई म्हणजे अगदींच बेकार अशी सुरुवात करून दहा मिनिटांत ते सारा हिंदुस्थान पालथा घालतात. एकंदरींत आपल्याकडचे कार्यक्रमच 'वर्स्ट' असा शेरा मारून चिनी, जपानी, रशियन, इंडोनेशियन, (हें सारं तर्कानं. कारण कोणत्या स्टेशनवर कोणती भाषा चालू आहे हें कुणाच्या बापाला कळतंय!) असा मध्य आशियांतील प्रवास सुरू होतो. आमच्या रामभाऊ खुळ्यांना इंग्रजी भाषेचा फार ध्यास. ऑक्सफर्ड डिक्शनरी उशाशीं ठेवून झोंपण्याची संवय त्यांनीं लावून घेतलेली. त्यामुळें माझ्याकडे रेडियो आणलाय हें कळतांच आतां बी. बी. सी. ऐकायला मिळणार, यामुळें त्यांचा आनंद पोटांत मावेनासा झाला. मी रात्रीं दिवा लावून पडलों रे पडलों कीं रामभाऊ आलेच दरवाजावर.

"अहो रामभाऊ उठा, उठा—"

आतां एक रामभाऊ दुसऱ्या रामभाऊला उठवायला आलेला असतांना आपण न उठणं म्हणजे आपल्या नांवाला कमीपणा.

"काय–खुळेमहाराज काय काढलंत आज–तुमचे दोस्त मन्या चोळकर नाहीं वाटतं आज?"

"मन्या चोळकर गेला मसणांत आधीं बी. बी. सी. लावा पाहूं. आज स्पेंडरचा टॉक आहे."

अशा भलत्या वेळीं टॉक देणाऱ्या स्पेंडर नामक मूर्ख विद्वानाबाबत अगदीं वाईट मत करून घेत, मी बी. बी. सी. लावण्याचा यत्न करूं लागलों. पण घर्रर्र घर्रर्र शिवाय कांहींच ऐकूं येईना.

"रामभाऊ—आज बी. बी. सी. लागणें शक्य नाहीं."

"कां हो?"

"अहो, भयंकर वादळी हवा आहे इंग्लंडमध्यें—पहा न् चक्क घर-घर आवाज येतोय तो वादळाचाच!"

"काय राव आम्हांला बनवताय! तुमचा रेडियो स्ट्रॉंग नाहीं. आमच्या त्या बावकरांचा मस्त मार्कोनी–काय वाटेल तें स्टेशन लावा. अगदीं गोड आवाज–बरय. उद्यां लावूं मग–उद्यां ग्रॅंजरचा टॉक आहे."

रेडियोच्या एकट्या दुकट्या श्रोत्याला घरीं परतावणं मला सुलभ जाई. पण रेडियोचे सामुदायिक श्रोते कसे परतवायचे. कारण रेडियोच्या महिला मंडळाच्या कार्यक्रमाला आमच्याकडे आमच्या मजल्यावरल्या झाडून सर्व भगिनी हजर. फक्त नांवाला रेडियो लावून ठेवलेला. पण बडबड एवढी कीं, आमचा रेडियोच काय, पण आमच्या रेडियोचा बाप आणून ठेवला असता तरी एक अक्षरहि कुणाला ऐकूं गेलं नसतं. शिवाय सुटीच्या दिवशीं या महिला घरीं येणार असं म्हटल्यावर मला निर्वासितासारखं रामभाऊ खुळे किंवा मन्या चोळकरकडे पळ काढावा लागे. पण याहिपेक्षां भयंकर ताप-

दायक श्रोते म्हणजे आमच्या विजय कल्पनेचे मित्र. मुलांच्या कार्यक्रमासाठीं झाडून सर्वजण हजर. आव ऐकण्याचा पण किलकिलाट फार. शेवटीं हा मला चिडवतो, ह्यानें माझा खडू मोडला–तो टेबलावर चढला–हा बटनं फिरवतो–त्यानें टेबलावर शाई सांडली–असा उपद्व्याप! यांतली कांहीं मंडळी माझीं मासिकं फाडून टाकत तर–कांहीं गपचिप माझ्या पुस्तकावर आमच्या रेडियोचीं चित्रं काढून जात.

या सगळ्या व्यापामुळें रेडियो ही भलती बलायत मी आपल्या घरीं आणलीय याची मला खात्री पटली. आमच्या बायकोला तर रेडियोचा नादच लागला. नेहमींप्रमाणें मी सुटीच्या दिवशीं आठ वाजतां उठावं तर रेडियो आल्यापासून 'मंगल प्रभात' सुरू झाली. रेडियो सिलोन लावून ती आंत स्वयंपाक घरांत पळे. मी कुठें कांहीं लिहायचंय म्हणून जरा रेडियो बंद करावा तर आंतून ओरडा 'कोणी बंद केला रेडियो'? मी मोठ्यानें ओरडून म्हटलं कीं मी केला कीं तसेच पिठांत भरलेले हात–माझ्यासमोर नाचवून म्हणूं लागे कीं "जळलं मेला थोडा वेळ लावला कुठं रेडियो तर झाली यांची कटकट सुरू. वेळ तरी मिळतोय का ऐकायला–"

"अग पण सकाळपासून चालू आहे–लाइटचं बिल किती येईल–!"

"माहिती आहे लाइटच्या बिलाची काळजी. रात्रीं रमी खेळतांना–नाहीं बरं लाइटच्या बिलाची आठवण होत ती!"

अशा वेळीं एकाच प्रसंगीं दोन रेडियो नको वाजायला म्हणून मी गप्प बसलों, करतां काय?

आमच्या बायकोच्या या रेडियोप्रेमामुळें आमचं घर अगदीं रेडियोमय झालं आहे. माझी जितकी काळजी घेणार नाहीं तितकी ती रेडियोची घेते. या रेडियोप्रमाणें बायकोच्याहि तोंडाला बटनें असतीं तर किती बरं असं मला वाटूं लागलंय तर या रेडियोप्रमाणें नवऱ्यालाहि एखाद्या शो-केसमध्यें ठेवतां आलं असतं तर किती छान झालं असतं असं बायकोला वाटूं लागलंय.

पण परवां हिंदुस्थानांत टेलिव्हिजन सुरू झाल्याचं वर्तमान ऐकून तिचा आनंद गगनांत मावेनासा झालाय. हा टेलिव्हिजन आपण घ्यायचाच अशी (आपला नवरा कुबेर आहे अशीच तिची समजूत) तिची प्रतिज्ञा आहे. मात्र या टेलिव्हिजनला प्रत्येक नवऱ्याच्या ऑफिसचं स्टेशन लावून ठेवावं. म्हणजे नवऱ्याच्या ऑफिसचं स्टेशन लावलं कीं नवरा काय करतोय याची जिवंत साक्ष.

—रेडियोसारख्या सुधारणा शोधून काढून पुरुषांनींच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतलाय--आणि आतां त्यांत टेलिव्हिजनची भर.

म्हणजे आमच्या संसाराचाच 'टेलिव्हिजन' होणार.

—त्यामुळें भयानें आजपासूनच मी फिरतीच्या नोकरीच्या शोधाला लागलोंय.

# नोकरी पहावी मिळवून

गेल्या जन्मीं आम्हीं पुरुषांनीं काय पाप केलं होतं, कुणास ठाऊक! कारण या जन्मीं आमच्यामागं दोन गोष्टी कायमच्या लागल्या आहेत : एक नोकरी आणि दुसरी बायको! बरं, या दोघी शहाण्या सवतीप्रमाणं गोडीगुलाबीनं एका ठिकाणीं नांदतील तर शपथ! गंमत अशी, त्यांचं एकमेकींशीं मुळींच पटत नाहीं आणि एकमेकींशिवाय मुळींच चालत नाहीं. कारण आजकाल चांगली नोकरी असल्याशिवाय कुणी चांगली पोरगी द्यायला तयार होत नाहीं आणि बायको नसेल तर कोण लेकाचा नोकरीचे पाय धरायला जातो? यामुळं बेकारी आणि ब्रह्मचर्य या रिकामटेकड्या मंडळींची एकमेकांशीं चांगली गट्टी जुळते. कारण यांपैकीं एकाचा त्याग केला तर दुसऱ्याचा त्याग जुलमानं करावाच लागतो. बेकार तरुणाला ब्रह्मचर्याचा त्याग करून विवाह-शृंखला अडकवून घ्यायच्या असतील तर त्याला नोकरीचं 'परमिट' मिळव-लंच पाहिजे. तुम्ही 'कसे' आहांत हें न पहातां तुम्हांला 'कसली' नोकरी आहे याचीच चिकित्सा वधूपिते प्रामुख्यानं करीत असतात. दारोदार फिर-तीची, किंवा आकाशपर्यटनाची उडती नोकरी असली तर असल्या सर्वार्थानं 'चंचल' पोराला पोरगी द्यायला लोक नाखूष असतात. लग्नाच्या बाजारांत आजकाल डॉक्टर, इंजिनीयर, आय्. ए. एस्. इत्यादि मंडळींची जरा जास्त चलती आहे. खाजगी कंपनींतल्या पांचशें रुपये पगारापेक्षां सरकारची पन्नास रुपयांची कारकुन. पालकांना आणि पोरींना पृथ्वीमोलाची वाटते, आणि तुमच्या गळ्यांत 'पर्मनंटली' आपली पोरगी अडकवायची असली तर तुम्हांला 'पर्मनट जॉब' आहे कीं नाहीं यावर तो निर्णय अवलंबून असतो. त्यामुळं अशा तऱ्हेची पन्नास रुपयांची अत्यंत सुरक्षित आणि बिनडोक

सरकारी नोकरी तुम्हांला चिकटली अगर तुम्ही तिला चिकटलांत, कीं त्यामागोमाग अगदीं अल्पावधींत तुम्हांला बायको नामक लचांड चिकटलंच म्हणून समजा! आणि एकदां का बायको चिकटली कीं नोकरीलाहि नाइलाजानं घट्ट धरून रहावं लागतं मात्र त्यांतहि कांहीं साहसी पुरुषोत्तम एक नोकरी सोडून दुसरी पकडतात. पण बायको मात्र एकदां पकडली कीं ती आपल्याला कायमचं पकडींत ठेवते! जरा इकडे का तिकडे बघूं देत नाहीं. नोकरीच्या बाबतींत कर्तृत्ववान पुरुषांना 'पार्ट टाइम जॉब' करायला मुभा असते, तर बायकोच्या बाबतींत हें असलं 'पार्ट टाइम लफडं' ती मुळींच चालू द्यायची नाहीं.

यामुळं चांगली बायको मिळणं हें जसं भाग्याचं लक्षण मानलं जातं त्याप्रमाणं सहजासहजीं चांगली नोकरी मिळायलासुद्धां आपल्या कुंडलींत लायकीपेक्षां उच्चीचे ग्रह असावे लागतात. आणि जगाचा न्याय सदा उलटा असल्यामुळं कुरूप माणसाच्या घरीं जातिवंत सौंदर्य भांडीं घांशीत असतं तर बेअक्कल नालायक पुरुष उत्तम चाकरीच्या पदावर अधिष्ठित झालेला आढळतो. आणि देखणा पुरुष सुंदर बायको मिळविण्याच्या नादानं अनेक उत्तम उत्तम पोरी नाकारून, शेवटीं 'साधारण मंडळीच' पदरीं घेतो. आजकाल नोकरीच्या साम्राज्यांतहि प्रेमाच्या साम्राज्याप्रमाणं, गुप्त चिठ्ठ्याचपाट्यांचं बंड फार माजलं आहे. एका अर्थी नोकरीचा अर्ज म्हणजे एक संभावित प्रेमपत्रच मानावं लागेल. पण या प्रेमपत्राचा फारसा कांहीं उपयोग नसतो. त्यापेक्षां या चोरट्या चिठ्ठ्यांनाच जास्त महत्त्व; आणि या चिठ्ठ्या खेळवण्यांत जो हुषार, त्याला नोकरी प्रसन्न झालीच म्हणून समजा. लग्न जुळविण्यापूर्वी पोरगा धड आहे कीं नाहीं, त्याचीं कुठं लफडीं नाहींत ना, अशी खातरजमा गुप्तपणं केली जाते; तर नोकरींत तुमच्या कॅरेक्टरच्या शुद्धतेबद्दलचं जाहीर प्रशस्तिपत्र एखाद्या जबाबदार माणसाकडून मिळवावं लागतं. भले तुम्ही कितीहि सज्जन असां, प्रत्यक्ष तुकारामाचे बाप असां, पण तुम्हांला हें कॅरेक्टर सर्टिफिकेट सादर केलंच पाहिजे. मला वाटतं, नोकरीच्या 'क्यू'त प्रत्यक्ष संत रामदास

येऊन उभे राहिले तर त्यांनाहि या सर्टिफिकेटाशिवाय नोकरी नाहीं मिळायची ! त्यामुळं आजकाल या कॅरेक्टर सर्टिफिकेट देणाऱ्या आम् सज्जन मंडळींना भलता भाव चढलाय्.

माझ्या बेकारीच्या काळांत असंच एक सर्टिफिकेट मिळवायला मला कोण यातना भोगाव्या लागल्या ! अशाच एका सत्पुरुषानं कनवाळूपणानं माझ्या सर्व गतपातकांची क्षमा करून मला हवं तें सर्टिफिकेट देण्याचं कबूल केलं; अगदीं 'प्रॉमिस' केलं. 'रविवारीं घरीं या' म्हणाला. त्याप्रमाणें एका शुभ-रविवारीं मी त्याच्याकडे ठीक नऊ वाजतां गेलों. आपल्याकडे कामाकरितां [ आपल्या नव्हे, त्याच्या ] कोणी याचक आला कीं त्याला फार वेळ तिष्ठत ठेवल्याशिवाय आपण मोठेपणाला चढत नाहीं असा सकल संतांचा गैरसमज असतो. त्याप्रमाणं या गृहस्थाच्या घरीं नऊ ते अकरापर्यंत तब्बल दोन तास मला वाट पाहण्यांत घालवावे लागले. मी दिवाणखान्यांत एका खुर्चीत स्थानापन्न झाल्यावर दर दहा मिनिटांनीं एकेक 'न्यूज-बुलेटिन' बाहेर पडायचं.—

"साहेब चहा घेताहेत." [ कपांच्या आवाजावरून आपण तें ओळखतोंच. ] चहा घेतल्याशिवाय कांहीं लोकांना म्हणे 'होतच' नाहीं; त्यामुळं त्यांत अर्धा तास.

यानंतर दाढीची अनाउन्समेंट !

दाढीनंतर स्नान केलंच पाहिजे असा गव्हर्न्मेंटचा कायदाच असल्यामुळं साहेबांचं शास्त्रोक्त स्नान सुरू होतं. [ अगदीं राजा गोपीचंदासारखं ! ]

यानंतर साहेब देवपूजेला बसतात. [ अशा वेळीं देवाबद्दल आपलं मत विनाकरण वाईट होतं. ]

म्हणजे तब्बल एकशेंएकवीस मिनिटांनीं साहेब दिवाणखान्यांत प्रवेश करतात. या मध्यंतराच्या असह्य अशा काळांत दिवाणखान्यांतील भिंतींवर टांगलेलीं सर्व चित्रं, कॅलेंडरं, टेबलावरची ऑक्स्फर्ड डिक्शनरी आणि आयुर्वेद फार्मसीचा कॅटलॉग आपल्याला पाठ होतो.

चांगलं बोटभर गंध लावून आमचे सज्जन— काका डोंगळे बाहेर येतात.

"काय राम, इकडे कुणीकडे आज ?"

आपल्या पूर्ण लक्षांत असूनहि आपण चक्क विसरलोंय अशी सण-सणीत थाप दिल्याशिवावाय आजकाल भागत नाहीं हें ठाऊक असल्यामुळं काका डोंगळे आपल्या टक्कलावर हात फिरवीत वरील प्रश्न अगदीं सहजगत्या विचारतात.

अशा वेळीं आपण गोंधळणार नाहीं तर काय कपाळ ? आपण म्हणतों,—"तें सर्टिफिकेट—"

"अरेच्चा ! तुला सर्टिफिकेट पाहिजे नाहीं का ? – खरं सांगूं ? आजकाल मी कुणालाच सर्टिफिकेट देत नाहीं. रोज पन्नास लोक येतात ! [थाप!] पण उगाच लफडीं नको व्हायला म्हणून मी हल्लीं हा धंदा सोडलाय ! बरं, पण तूं असं कर, उद्यां ऑफिसांतच ये.—"

अशा वेळीं जोडा खाल्ल्यासारखा आपला चेहेरा होतो. नोकरींत पुढं जोडे खावे लागणार आहेत याचीं प्रसादचिन्हंच. पण चकरा खाल्ल्या-शिवाय किंवा मारल्याशिवाय आजच्या घडीला कोणतंच काम सुरळीतपणं होत नसल्यामुळं आपण निराश न होतां त्यांच्या ऑफिसांत जातों. पण हें ऑफिस म्हणजे एक भयंकर काम असतं. ऑफिसं म्हणजे नवीं पदार्थ-वस्तुसंग्रहालयं [किंवा 'झू'] अशी नवी व्याख्या करायला कांहींच हरकत नसते. तिथं कुणाचाच कुणाला पत्ता नसतो. आपल्या खुर्चीवर कधींच हजर न रहाणं हें साहेबलोकांचं व्यवच्छेदक लक्षण असल्यामुळं त्यांचे शिपाईप्यादे गांवगुंडांप्रमाणें माजलेले असतात. आपण चौकशी करावी तर,—"आत्तांच इथं होते. कुठं गेले तें माहीत नाहीं; केव्हां येणार तें सांगितलेलं नाहीं." अशीं ठराविक उत्तरं देऊन तो द्वाररक्षक आपल्या-कडे ढुंकून सुद्धां पहायला तयार होत नाहीं. शिवाय बावळट साहेब आणि स्मार्ट शिपाई नेमण्याचा अलीकडचा नवा प्रघात असल्यामुळं, साहेब

कोण आणि शिपाई कोण हें ओळखणं कठिण जातं. त्यामुळं एकदां एका कचेरींत मी शिपायालाच साहेब समजून सलाम केला आणि साहेबाला शिपाई समजून एक विडी दिली. [ वेड्यानं ती घेऊन खिशांत ठेवली.— संवयीचा परिणाम ! ]

या सर्व अनुभवांमुळं कोणत्याहि माणसाचा त्याच्या ऑफिसांतील पत्ता शोधून काढायची वेळ आली कीं माझ्या अंगावर कांटा उभा रहातो. एक वेळ कोलंबसासारखी नवी अमेरिका शोधून काढणं परवडलं; पण एखाद्या साहेबाला त्याच्या कचेरींतील समुद्रांतून अलगद शोधून काढणं म्हणजे भयंकर दिव्य !— पण लक्षांत कोण घेतो ? कारण बेकार तरुणांच्या कुंडलींतील ग्रह जसे सारखे भ्रमण करीत असतात. त्याप्रमाणं त्याला हवे असणारे साहेबलोकहि इतस्ततः विनाकारण भटकत असतात. शिवाय या कचेऱ्यांत इतक्या पाय्या आणि इतक्या वाटा असतात, कीं एखाद्या पौराणिक चक्रव्यूहांत सांपडल्यासारखी अवस्था होते. आपल्याला एखाद्या संबंधित अधिकाऱ्याचा पत्ता काढायचा असला तर किमान दोनशें माणसांशीं बोलाचाली, किमान दोन मैलांची पायपीट आणि चार पांच जिन्यांची चढउतार करावी लागते. इतकं करूनहि त्या साहेबाचा पत्ता गवसलाच तर तो चक्क दूर दूरवर गेलेला असतो !

पण त्या दिवशीं कोणताहि नवकवि माझ्या मार्गांत आडवा न आल्यामुळं मला डोंगळ्यांची खोली चटकन् सांपडते. द्वाररक्षक, तिरकी टोपी करून ' मराठा ' वाचण्यांत गर्क झालेला असतो. त्याच्या वाचनांत व्यत्यय आणल्यामुळें तो कावतो आणि गुरगुरत म्हणतो,—" ही चिठी लिवा–आंत बसलेत कुनीतरी ! "

हें आंतलं ' कुणीतरी ' लवकर सटकावं म्हणून आपण सांईबाबाचा धांवा करूं लागतों. इतक्यांत साहेब घंटी मारून शिपायाला दोन चहा आणायची ऑर्डर देतात. हा लेकाचा टकल्या डोंगळे लोकांना चहा पाजतो तर !

त्यांचं चहापान चालू असतांनाच आपल्याला आंतून बोलावणं येतं. पण काय आश्चर्य! आंत आमचे टक्कलवाले डोंगळे नसून कुणीतरी झिलपेवाले डोंगळे असतात. तेहि आपल्याकडे आणि आपण त्यांच्याकडे चमत्कारिक मुद्रेनं पाहूं लागतों.

"मला डोंगळ्यांना भेटायचं होतं.— एस्. के. "

"या देहाला एस्. एम्. डोंगळे म्हणतात." माझं नांव 'घनश्याम' या थाटांत हा 'एसेम्' रुद्रावतार धारण करून बोंबलतो, — "तुम्हांला मराठी वाचतां येतं कीं नाहीं? बाहेरची पाटी एकदां वाचा, नाहीं तर डोळे तपासून घ्या. अरे नाईक, यांना त्या एस्. के. डोगळ्यांकडे घेऊन जा."

एका दमांत त्या डोंगळ्यानं आपली गर्दन उडवल्यामुळं आतां आपल्यालाच टक्कल पडेल कीं काय अशी भीति वाटते. शिवाय त्यानं आपल्या वर्मावर आघात केल्यामुळं त्याचा सूड कसा घ्यावा याचा विचार करीतच आपण खोलीबाहेर पडतों. साहेबाच्या खोलींतून बाहेर पडल्यावर शिपाई परत मूळपदावर येतो आणि तिथूनच एस्. के. डोंगळे कुठं सांपडतील तें सांगतो.

शेवटीं या डोंगळ्यांचा पिच्छा पुरवून आपण तें थोर सर्टिफिकेट अखेर हस्तगत करतोंच! पण—

थोड्याच दिवसांत आपल्या ध्यानीं येतं कीं, असल्या फालतू प्रशस्ति-पत्रांना नोकरीच्या बाजारांत कांहींच किंमत नाहीं. एखाद्या कुरूप मुलीचं लग्न पैशाच्या जोरावर लीलया जमतं, त्याप्रमाणं वशिल्याच्या जोरावर उत्तम नोकरी सहज मिळवतां येते. उलट सुंदर पोरगी असूनहि हुंडा देण्याची ऐपत नसल्यामुळं ज्याप्रमाणं एखादा वधूपिता हैराण होतो त्याप्रमाणें अंगीं हुषारी आणि लायकी असूनही बिचारा उमेदवार खितपत पडतो.

विसाव्या शतकांतील वशिला ही एक अद्‌भुतरम्य चीज आहे.— अगदीं अल्लाउद्दिनाची जादूची अंगठी. या अंगठीपुढें कृतांतकाळ सरकारी

अधिकारी, मुजोर सुपरिंटेंडेंट, ताठ मॅनेजर, खाष्ट मुकादम सारेजण गोगलगाईसारखे सदा नम्र असतात. या वशिल्याच्या अंगठीच्या जोरावर मुंबईचा माणूस एका क्षणांत दिल्लीपर्यंत पोंचूं शकतो तर दिल्लीचा माणूस मॉस्कोला जाऊं शकतो. वशिला हा एक नवा परीस आहे, त्याचं माहात्म्य काय वर्णावं? त्यावर अनेक ग्रंथ आणि काव्यं रचलीं जावींत अशा योग्यतेचा तो आहे. तो हातीं बाळगला कीं मूर्खांचा शहाणा, बेअक्कलवानचा पंडित, भेकडाचा शूर, गबाळ्याचा टापटीप आणि नालायकाचा लायक तुमच्या डोळ्यांदेखत होतो! तुमच्याकडे बाकी कांहीं नको, फक्त तो पाहिजे–तो म्हणजे दि ग्रेट वशिला. आतां हा वशिला कुठून आणि कसा लावायचा हें शास्त्र अति कठिण आहे.—अगदीं ॲटम-बॉंब बनवण्यापेक्षां कठिण. त्याला वेगळीच अक्कल आणि निराळीच धूर्तता लागते. तें येरा गबाळाचं काम नोहे,—ही उक्ति फक्त वशिल्यालाच तंतोतंत लागू पडते.

ह्या वशिला–शास्त्रांतले कांहीं पंडित, महापंडित अनेक ठिकाणीं वावरत असतात. त्यांचे डावपेंच एखाद्या कसलेल्या सेनापतीला लाजवतील. त्यांचं धोरण एखाद्या परराष्ट्रीय मंत्र्यालाहि मागं टाकील. कुठं आणि कसा खडा टाकावा याचं यथार्थ ज्ञान त्यांच्याखेरीज कुणालाच नसतं. अमक्या ठिकाणीं तमक्याची नोट चालेल; अमका साहेब आपल्या बायकोचं बाहुलं असल्यामुळं त्याच्या बायकोलाच गांठलं पाहिजे; अमक्याचं अमुक एक पान आहे, त्याला गांठलं तर वा रे वा!—अमका भयंकर स्ट्रिक्ट आहे, पण त्यांना मानतो; अमक्याचा दर काय आणि कोणाच्या थ्रू घेतो,—इत्यादि साग्रसंगीत टिपणं या वशिलेकर मंडळींपाशीं जय्यत तयार असतात. कोणत्या रोगावर कोणतं औषध लागू पडेल असं छातीठोकपणं सांगूं शकणाऱ्या वैद्यापेक्षांहि या मंडळींचा आत्मविश्वास जबरदस्त असतो. चिठ्याचपाट्या मिळवणं हा त्यांच्या हातचा अगदीं मळ असतो. या चिठ्या देणाऱ्या माणसांची वर्गवारी दोन विभागांत करतां येईल: एक अति उदार तर दुसरे अति कंजूष. माझ्या एका माहितीच्या बड्या माणसानं अशा चिठ्यांचे फॉर्मच छापून घेतले आहेत. अर्थात् बुडता उमेदवार त्याचा काडीसारखा उपयोग करूं पहात असला तरी त्याला काडीइतकीहि किंमत नसते.

हे चिठ्ठ्या देणारे लोक भयंकर भाव खातात. आजकाल हें काम किती डेंजरस् झालंय, आणि आतांपर्यंत आपल्या चिठ्ठ्यांमुळं किती लोक रांकेला लागले, याचीहि यादी ते वाचतात. पण अशा चिठ्ठ्यांचाहि कांहीं उपयोग नसतो. "मी आपल्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार करीन. अहो, आजकाल फार स्ट्रिक्ट झालंय... नियमाच्या बाहेर आम्हांला कांहींच करतां येत नाहीं... प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांची चिठ्ठी आणलीत तरी मी हेंच उत्तर देईन..." असं साळसूद कीर्तन ऐकावं लागतं.

कांहीं धूर्त मोठे धोरणी असतात.—"अस्सं! म्हणजे यांची चिठ्ठी घेऊन आलांत होय तुम्ही? अहो, त्यांच्यासाठीं आम्ही काय नाहीं करणार? ते आमच्या पाठच्या भावासारखे. पण काय सांगूं, कालच जागा भरल्या... आतां सहा महिन्यांनीं या." अशी संगीत बोळवण करतात. आपण सहाच काय, पण बाराहि महिने वाट पहायला तयार असल्यामुळं सहा महिन्यांनीं परत जातोंच. "छेः छेः! अजून कांहींच नाहीं. उलट आतां रिट्रेंचमेंटच चालू आहे.—तशांत तुम्ही ऑनर्स असतां तर बरं झालं असतं."—सहा महिन्यांनीं ही भाषा.

एका सद्गृहस्थाकडे मी अशीच एक जंगी चिठ्ठी घेऊन गेलों असतांना त्यानं मला अर्धा तास, 'सरकारी नोकरी करण्यापेक्षां एखाद्यानं समुद्रांत कसा जीव द्यावा' यावर उत्तम व्याख्यान दिलं. शेवटीं 'तुम्ही कशाला या रॉटमध्यें येतां?' असा प्रश्न विचारून त्यानं मला निरोप दिला.

या नोकरी-मोहिमेंत अनेक ठिकाणीं नन्नाचा पाढा केवळ अनुभव नाहीं म्हणून ऐकावा लागतो; पण अनुभव आणि नोकरी या इतक्या परस्परावलंबी गोष्टी आहेत कीं विचारूं नका! असे इंटरव्ह्यू घेण्यांत प्रवीण असलेल्या एका तरुण अधिकाऱ्यानं आपल्या स्वतःच्या वधूपरीक्षेच्या वेळीं 'तुम्हांला पूर्वीचा कांहीं अनुभव आहे कीं नाहीं' असा प्रश्न त्या मुलीला विचारला होता! त्यामुळं वधूपरीक्षा आणि इंटरव्ह्यू यांच्यांतील साम्य मोठं मजेदार वाटतं. 'पाहायला' येणार असलं कीं पोरी व्यवस्थित सजतात

आणि नटतात, त्याप्रमाणं इंटरव्ह्यूच्या दिवशीं उमेदवार एखाद्या अखंड सौभाग्यकांक्षिणीप्रमाणं नटतात. रोज गोल पँट नेसणारा त्या दिवशीं कडक इस्तरी करतो; तर रोज राजकपूरच्या थाटांत हिंडणारा नौजवान अगदीं शाहू मोडक बनतो. रोजची बेगमपारा अगदीं सुलोचना बनते, तर सदासर्वदाचा जॉनी वॉकर संत एकनाथ होतो. एका पोरीवर ज्याप्रमाणं अनेकांचा डोळा, त्याप्रमाणं एका नोकरीवर अनेकांचा डोळा. पण नोकरी ही चवचाल स्त्री नसल्यामुळं ती एखाद्या पतिव्रतेप्रमाणं आपलं स्वयंवर मांडते, आणि एकीसाठीं पन्नास तरी वीरपुरुष स्वयंवराच्या मंडपांत दाखल होतात. आपला नंबर आल्यावर आपण धडधडत्या छातीनं (पण ती पुढं काढून) एखाद्या उपवर पोरीप्रमाणं लाजतलाजत त्या खोलींत शिरतों. तिथं आपले भावी सासरे आणि त्याचे सहकारी बसलेले असतात. 'बैस बाळ हं.' अशा सुरांत ते आपल्याला बसायला सांगतात. आपण हळूच त्यांच्याकडे पहात खालीं बसतों. घाम सुटल्यामुळं आपण वरच बघूं शकत नाहीं.

यांतला आपला भावी 'सासरा' कोणता हेंच आपल्याला कळत नाहीं. कुणीतरी विचारतं,—"काय नांव तुमचं?"

"रामभाऊ डुकरे!"

"शिक्षण किती?"

हा प्रश्न ऐकून आपण बावरतों. आपल्या अर्जांत सर्व माहिती दिलेली असतांना हे तेच-तेच प्रश्न कां विचारतात म्हणून आपण अधिक लाजतों. शिवाय शिक्षणाचा प्रश्न त्या मानानं नाजुकच असल्यामुळं आपलं अवसान गळतं, आणि त्यामुळं आपल्या तोंडून शब्दच उमटत नाहीं. एखाद्या नवरीला 'तुला पेटी वाजवायला येते का,' 'भरत काम येतं का,' यासारखे सर्व प्रश्न विचारून झाल्यावर सांगतात तसं, आतां आपण लंगडे आहोंत कीं काय हें बघायला चालून दाखवायला सांगणार कीं काय याचं भय वाटतं. शिवाय आधींच आपल्या पोटांत आणि पायांत या

प्रश्नांच्या भडिमारामुळं गोळे आलेले असल्यानं आपल्याला चालण्याचीहि ताकद उरलेली नसते.

शेवटीं—‘ नेक्स्ट ! ’ असा जोरदार आवाज काढून आपली बोळवण करतात. आपण इंटरव्ह्यूंत सर्वस्वी खलास झालों असलों तरी वर उगाचच भलता आव आणून टाय सांवरीत — ( संवय नसल्यामुळं ती अगोदरच सैल झालेली असते, ) आपण बाहेर पडतों.

‘ काय पडलांत का पसंत ?’ या भाषेंत सर्वजण आपली चौकशी करतात. बहुतेक एक तारखेच्या मुहूर्तावर नोकरीच्या बोहोल्यावर अपण चढणारच अशा लंब्याचौड्या गप्पा आपण मारूं लागतों.

— अर्थात् आठवड्यांत ‘ नापसंत ’ असल्याचं पत्र येतं. आपले वडील आपल्याला एकदां ‘ उजवून ’ टाकण्याच्या अहोरात्र चिंतेंत असल्यामुळं आणि त्यांना हा ‘ भार ’ असह्य झालेला असल्यामुळं सतराशें-पन्नास लोकांचीं आर्जवं करून, शेंदोनशें लोकांचे वशिले लावून आणि पांचपन्नास ठिकाणीं ‘ दाखवून ’ शेवटीं आपलं एका ठिकाणीं ‘ जमतं.’

आणि हें जमल्यावर आपल्या पाळतीवर असणारा धूर्त वधूपिता आपल्या पोरीशीं आपलं जमवून देतो.

— आणि त्यानंतरची बायकोची सेवा आणि नंतर नोकरीची सेवा.
— बायको नि नोकरी, नोकरी नि बायको ...

अनंत–अनंत कलहांचा तो सुप्रसिद्ध इतिहास !

यामुळं आपण तरी निश्चय केलाय्—पुढील जन्मीं दोन गोष्टी करणार नाहीं.

एक नोकरी नि दुसरी बायको !

## सार्वत्रिक चहाबंदी

सकाळची साडेसहाची वेळ होती. दूधवाला केव्हांच दार ठोठावून गेला होता. रात्रभर सुरेख झोंप लागल्यामुळें मी नेहमींपेक्षां जरा लवकरच उठलों, पण दरवाज्यांत 'लोकमान्य' पडलेला कांहीं दिसेना. स्वयंपाकघरांत 'स्टोव्ह' चा आवाज किंवा कपबश्यांचा खडखडाट ऐकूं येईना म्हणून आंत डोकावलों, तर एक अद्‌भुतरम्य दृश्य पाहायला मिळालें.— तें दृश्य म्हणजे आमची सौभाग्यवती शांतपणें ओट्यावर बसून 'लोकमान्य' वाचण्यांत गर्क झालेली होती! वर्तमानपत्रें आणि आमची गृहलक्ष्मी यांचा असा सुयोग दुर्मिळ असल्यामुळें मी हबकलोंच. माझी चाहूल लागतांच सौभाग्यवतीनें 'लोकमान्य' माझ्याकडे भिरकावला आणि ती म्हणाली,—

"सुटलें बाई या चहाच्या जंजाळांतून!"

"काय, म्हणतेस काय तूं? सात वाजायला आले आणि अजून चहाचा पत्ता नाहीं? हें चालवलं आहेस काय तूं?"

"'लोकमान्य' नीट वाचून पहा, म्हणजे समजेल मी काय म्हणतेंय् तें!"

मीं मुकाट्यानें 'लोकमान्य' उचलला आणि पाहातों, तों भयंकर प्रकार! हेडलाइन अगदीं चक्क अशी होती :

**"खास वटहुकुमान्वयें भारतांत सार्वत्रिक चहाबंदी!"**

या मथळ्याखालीं पुढील मजकूर होता:—

"नवी दिल्ली:—आज भारत–सरकारनें खास वटहुकूम काढून अखिल भारतांत चहाबंदी जारी केली आहे. या हुकुमान्वयें भारतांतल्या

कानाकोपऱ्यांतील उपाहारगृहांतून चहाची जाहीर अगर खाजगी विक्री बंद करण्यांत येईल. यापुढें चहाची पूड विकणें, जवळ बाळगणें, सांठा करणें, किंवा त्या चहाचा अर्क दूधमिश्रित अगर कोरा विकणें, खाजगी जागेंत अगर जाहीर जागेंत असा चहा गाळणें, पिणें, अगर दुसऱ्याला देणें हा गुन्हा ठरविण्यांत आला आहे. चहा पिऊन भररस्त्यावर वादविवाद करणें, सामुदायिक चहापान करणें याला पूर्ण बंदी घालण्यांत आली आहे. आज पहांटे पोलीस घरोघर चहाचे सांठे जप्त करतील.

"हा कायदा मोडणाऱ्यास चार वर्षें सक्तमजुरी आणि चार हजार रुपये दंड होईल. आरोग्याच्या दृष्टीनें ज्यांना चहा आवश्यक आहे अशांची शारीरिक तपासणी होऊन त्यांना चहा-परवाने देण्यांत येतील. देशांतून या व्यसनाचा नायनाट व्हावा म्हणून आजपासून सर्वत्र 'चहाबंदी-सप्ताह' साजरा करण्यांत येणार आहे....

"सरकारचे चहा-मंत्री श्री. रामराज नायर यांनीं यु. प्रे. ला खास मुलाखत दिली. तींत त्यांनीं असें म्हटलें आहे, 'गेलीं १५० वर्षें पारतंत्र्यांत असलेल्या भारतांत चहारूपी व्यसनानें हजारों कुटुंबें धुळीला मिळालीं आहेत. आमच्या खेड्यापाड्यांतहि चहाचीं दुकानें जाऊन शेतकऱ्यांच्या आरोग्याची दैना उडाली आहे. शहरांतील सुशिक्षित तसेंच विद्वान् लोक, लोकांना ज्ञानदान देणारे वर्तमानपत्रकार आणि मासिकाचे संपादक यांच्यांतहि हें चहाचें व्यसन बोकाळून त्यांनीं आपल्या आरोग्याची हानि करून घेतली आहे. आपले नवरे चहाबाज झाल्यामुळें आमच्या संसाराची दुर्दशा उडाली आहे, अशा अर्थाचीं हजारों स्त्रियांचीं गाऱ्हाणीं सरकारकडे आल्यामुळें हा वटहुकूम एकाएकीं काढावा लागला. या वटहुकुमामुळें मुंबईसारख्या शहरांतील इराणी आणि उडुपी बेकार होतील, त्यांची इतर धंद्यांत सोय लावण्याची सरकारची तयारी आहे......,"

हा भयंकर मजकूर वाचून पूर्ण होतो न होतो, तोंच खालून रस्त्यावरच्या आरोळ्या माझ्या कानीं आल्या.

'चहा-राक्षसाचा नायनाट होवो!'
'चहाच्या भयंकर व्यसनाचें निर्मूलन करा!'

असे फलक घेऊन स्त्रियांची एक मोठाली मिरवणूक रस्त्यानें घोषणा देत चालली होती. अग्रभागीं एक शाहीर जोरजोरानें पुढील कडवं आळवीत होता,—

'चहानें केली धूळधाण ऽ
देश हिंदुस्थान ऽ
सुधारिल कोण ?...'

मी गॅलरींत आलों तर गॅलरींत सर्व बिऱ्हाडकरूंची तोबा गर्दी उडालेली होती. ती महिलांची मिरवणूक पाहाण्यासाठीं रस्त्यावरहि अनेक बघे जमा झालेले होते.

ती मिरवणूक चौकांत आली आणि तिथें परत घोषणा सुरू झाल्या. चौकांत मध्यभागीं 'लिप्टन' 'ब्रुक-बॉंड' यांचे डबे एकत्र करून त्यांचा एक राक्षस तयार करण्यांत आलेला होता या राक्षसाचं तोंड म्हणजे पुठ्ठ्याची एक अगडबंब किटली होती. शेवटीं सर्व स्त्रियांनीं 'चहा-राक्षसा'च्या नांवानं शंख करून त्या राक्षसाला अग्नि दिला.

हा संतापजनक प्रकार पाहून माझ्या तळपायाची आग मस्तकांत गेली. 'पाहून घेऊं पुढच्या निवडणुकींत' असं म्हणून मी घरांत आलों आणि सौभाग्यवतीला हलकेच चहाची ऑर्डर दिली. पण गृहलक्ष्मी आपली मख्ख! ती म्हणाली, "पावडर कालच संपली आहे. हवा तर गवती चहा करून देतें."

कर्म! चहावांचून जीव लागला तडफडायला. बाहेर कुठें मिळाला तर पाहावा म्हणून आमचे जिगरदोस्त गंपूनाना यांना घेऊन मी चहा पिण्याच्या मोहिमेवर निघालों. खालीं रस्त्यावर आलों तर 'रामभरोसे', 'लक्ष्मीविलास', 'अमृततुल्य टी' हीं चहामंदिरें निषेधार्थ बंद होतीं. नाक्या-

नाक्यावर पोलिस-पहारा होता. शेवटीं सेंट्रल सिनेमाजवळ आलों. 'वीरकर -वेलणकरां'नीं जाहिरात लावली होती.

'गवती चहा मिळेल, उत्तेजन मिळेल, गव्हाचा कोको मिळेल.' तिकडे तिरस्कारानें पाहात आम्ही सेंट्रल सिनेमासमोरच्या आमच्या आवडत्या इराण्याकडे गेलों ... त्याचें दुकान उघडें होतें. गंपूनाना म्हणाले "बाळोबा, या इराण्याकडे नक्की चहा मिळणार."

मी म्हटलं, "पोलीस काय झोंपलेयत ?"

"आपला हा अर्देशीर इराणी त्या पोलिसांना पुरून उरेल. त्यानं नक्की भत्ते सुरू केले असणार पोलिसांना. चला तर खरं !"

आम्ही अर्देशीरकडे गेलों, तर हॉटेलांत अगदीं शुकशुकाट होता. गंपूनाना अर्देशीरच्या कानाशीं लागले आणि त्यांचें काय संभाषण झालें, कुणास ठाऊक ! माझी छाती धडधडत होती. पोलीस येतात कीं काय? ...शेवटीं अर्देशीर आम्हांला आंतल्या खोलींत घेऊन गेला. त्या खोलींत आमच्यासारखेच अट्टल चहाबाज धाकधूक करीत चहा मारीत होते. अर्देशीरनें कप हातांत देण्याआधीं दोन कप चहाचा एक रुपया रोख घेतला. मी म्हटलं, "अरे बाप रे! एक रुपयाला दोन कप चहा ?"

तो म्हणाला, "साब येत्री परवडत नाय! ये पोलिसलोकांला भत्ता देवा लागतो, आणि आपुन लोकाला तो च्यांगली क्वालिटीबी लागते."

रेल्वे स्टेशनवरच्या चहापेक्षांहि भयंकर तो असा चहा आम्ही घटघटा प्यायलों. गंपूनाना एका कपांतच बेहोष झाले; आणि लागलीच डिसोजा-सायबाचें आणि मिस् देशमुखचें काय लफडें आहे तें बडबडूं लागले. मी चांगलाच हादरलों. म्हटलं, ही 'स्ट्रांग क्वालिटी' ह्यांना चढली कीं काय ? त्यांचा चेहेराहि तरारला होता. बोलतांना ते हातवारे करूं लागले. शेवटीं अर्देशीर म्हणाला, "अरे, ये गंपूनाना घोटाला करेल. ही सुपारी खाऊनशी जा, म्हजे तोंडाला वास नाय येल."

आम्ही सुपारीचे ब्रोकणे भरले आणि लागलीच परत चाळींत आलों. आजूबाजूचे बिऱ्हाडकरू आमच्याकडे संशयानें पाहात होते. घरांत पाऊल टाकतांच सौभाग्यवतीनें आमचें लक्षण ओळखलें. ती कडाडली, "प्या! बंदी झाली तरी प्या, म्हणजे सुटाल! आतां एवढा ढोसून आलांत आणि नऊ वाजतां जेवणार तरी काय, कपाळ?"

आम्ही नऊ-पंचावन्नची गाडी पकडली. गाडींत जो तो सरकारला शिव्या देत होता. रमी आणि ब्रिजचे प्रवासी–अड्डे बंद झाले होते आणि प्रत्येकाचा विषय चहा आणि चहाबंदी हाच होता. आमच्या ऑफिसांतल्या सान्यांच्या मतें, ही चहाबंदी म्हणजे मद्राशांचा डाव आहे. आमचा रामभाऊ जोशी हा लोहिया-गटांतला असल्यामुळें तो म्हणाला, "पुढच्या निवडणुकींत आमच्या गटाला निवडून दिलंत तर चहाबंदी रद्द करूं."

आमच्या कमर्शियल ब्रँचचे गोखले 'केसरी' फडकावीत म्हणाले, "महाराष्ट्रीयांना खच्ची करायचा हा सरकारचा डाव आहे. कारण महाराष्ट्रीय माणसाचं सर्व डोकं चहांत आहे. हा चहा बंद केला कीं संयुक्त-महाराष्ट्राची चळवळ आपोआपच नाश पावेल. मला वाटतं, या वटहुकुमामागं मोरारजीचा हात असावा..."

आमचे वैद्य म्हणाले, "अहो, पण आपल्या डिसूजासाहेबाला पांच-पांच मिनिटांनीं 'वीक टी' पाहिजे, त्याचं कसं व्हायचं?"

त्यावर गंपूनाना म्हणाले, "त्या ऐवजीं तो 'वीक-मिस् देशमुख' ला घेऊन बसेल!"

इतक्यांत चर्चगेट आलें, आम्ही उतरलों. ऑफिसांतलं वातावरण चहाशिवाय गरम झालेलें होतें. सरकार आतां 'टी टाइम' बंद करणार असा बंडू गोखलेचा तर्क. त्यावर रमेश माळगांवकर म्हणाला, "सरकारनं टी-टाइम बंद केला तर युनियनला सांगून आपण संपावरच जायला हवं."

इतक्यांत डिसूजासाहेबाची स्वारी आल्यामुळें संभाषण बंद झालें आणि जो तो कामांत गर्क झाला किंवा झाल्यासारखें दाखवूं लागला.

दुपारचा एक वाजला आणि 'लंच-अवर' साठीं आम्ही सगळे एकत्र जमलों. सर्वांचे चेहेरे मलूल दिसत होते. गंपूनाना तर फारच कावरेबावरे झाले होते. त्यांनीं दामू शिपायाला हाक मारली. त्याचा चेहेरा नुकताच चहा झोंकून आल्यासारखा दिसत होता. तो म्हणाला, " काय गंपूनाना, काय घेणार काय ? "

गंपूनाना म्हणाले, " अरे वाः ! देव पावला आम्हां सर्वांना ! चला तर. "

दामू म्हणाला, " आतां नाहीं. टी–टायमाला घेऊन जाईन. "

त्याचें हें उत्तर ऐकतांच सर्वांचे चेहेरे पडले. चार वाजेपर्यंत आतां चहा मिळणार नसल्यामुळें कुणाचेंच कामावर लक्ष लागेना. अट्टल पिणाऱ्यांचे जीव कासावीस झाले. गंपूनाना तर तळमळायला लागले. मिस् देशमुख साहेबाच्या खोलींत किती वेळ लचकत–मुरडत गेली याचें त्यांनीं टिपण केलें नाहीं, किंवा रमेश माळगांवकरबरोबर भारताचें परराष्ट्रीय धोरण कसें चुकीचें आहे याची तावातावानें चर्चाहि केली नाहीं. चहा नसल्यामुळें डिसोझासाहेबाची घंटा जोरजोरानें वाजूं लागली आणि मिस् देशमुखच्या कामानिमित्त साहेबाच्या खोलींत येरझारा फार होऊं लागल्या. इतक्यांत 'ईव्हिनिंग न्युज' चा अंक आला. आम्ही सगळेजण त्याच्यावर तुटून पडलों. 'ईव्हिनिंग न्यूज'च्या पहिल्या पानावर सेन्सेशनल बातमी होती. तिचा सारांश असा :

## " पोलीस अधिकाऱ्यास चहा पितांना पकडलें

" मुंबई, ता. १८–आज दुपारीं बारा वाजतां दिवसाढवळ्या चहा-बंदी–पोलिसांनीं महारबावडी पोलिस-स्टेशनवर अचानक धाड घालून तेथील पोलिस–इन्स्पेक्टर श्री. चायवाला यांना आपल्या खोलींत चहा पितांना पकडलें. पोलिसांनीं झालेल्या घटनेचा तत्काळ पंचनामा केला असून दोन चहाचे कप, अर्धी भरलेली किटली, चहाचा चोथा असलेलें गाळणें, तसेंच सुमारें पांच रत्तल चहाची बुकी, एवढा मालमसाला जप्त केला आहे. चहापान केल्यामुळें श्री. चायवाला यांचा चेहेरा प्रफुल्लित दिसत होता,

सार्वत्रिक चहाबंदी

. वाचनालय शाखा.
दा. क ... नों. दि ..........
वि. ...

आणि त्यांची तंद्री लागलेली होती. या प्रकरणीं कॉन्स्टेबल धोंडू यानें चहा तयार करून गुन्ह्यास मदत केल्याबद्दल त्यालाहि अटक करण्यांत आली आहे. या प्रकारामुळें सर्वत्र खळबळ माजली आहे..."

ही बातमी वाचतांच ऑफिसमध्यें एकच हलकल्लोळ माजला.

"पाहिलंत, पोलीस लेकाचे चोरून चहा प्यायला लागले आहेत, आणि म्हणे चहाबंदी! सरकारला कांहीं कळत नाहीं..."

त्यावर रामभाऊ म्हणाले, "अहो, याचा परिणाम म्हणजे घरोघर चहाच्या चोरट्या भट्ट्या चालणार! आमचीं पोरंबाळं चहा पीत नव्हतीं, तीं चहा पिणार, आणि चोरट्या चहाच्या भट्ट्यांचे पोलीस हप्ते खाणार!"

"वादच नाहीं!" रमेश माळगांवकर म्हणाला. तो नुकताच इकॉनामिक्स घेऊन बी. ए. झाला होता, तेव्हां तें ज्ञान वारंवार पाजळण्याची त्याला संवय होती. तो पुढें म्हणाला, " अन् यामुळं आपली आर्थिक घडी बिघडणार—"

गंपूनानांना हा वादविवाद सहन होईना. ते म्हणाले, "अहो, वाद कसले करतां? इकडे चहाविना आमचा जीव चाललाय् आणि तुम्हांला वादविवाद सुचताहेत! लेकाचा दामू टी-टायमाला बंदोबस्त करतों म्हणाला आणि अजून त्याचा पत्ता नाहीं!"

या गडबडींत, मिस् देशमुख चहाला स्पर्श करीत नसल्यामुळें तिला कांहींच त्याचें सुखदुःख नव्हतें त्यामुळें आम्ही दामूची वाट कां पाहातों हें तिला कळलें तर तें डिसूजासाहेबापर्यंत जाईल यांत शंकाच नव्हती. शेवटीं दामू आला. दामूचा चेहेरा पाहातांच गंपूनानांनीं ताडलें कीं, दामू 'घेऊन' आला असला पाहिजे.

तो येतांच गंपूनानांनीं त्याला विचारलेंच, "काय दामू, एक कप मारून आलेला दिसतोस!"

"कसला च्या घेऊन बसलांत गंपूनाना?" दामू निराशेनें म्हणाला, गांवठी पिऊन आलों न्हव!"

"गांवठी म्हणजे काय रे ?" रमेशनें विचारलें.

"अवं, गांवठी म्हणजे गवती च्या. त्यांत धने टाकले होते इराऱ्यानं आणि त्याचे आठ आने घेतले." दामू म्हणाला.

दामूचं हें साहस पाहून आम्ही थक्क झालों. रमेश आणि रामभाऊ गांवठी म्हणतांच मागें सरले. रमेश माळगांवकर म्हणाला, "अहो, आजार-पणांतदेखील मीं गवती चहाला स्पर्श केलेला नाहीं, तर आतां कुठचा ? त्यापेक्षां आटींव दूध बरं."

रामभाऊ म्हणाले, "आपल्याला बुवा तो गवती कीं गांवठी चहा पिऊन ओकारीच येईल. काय रे दामू, अस्सल कुठं मिळणार नाहीं ?"

दामू म्हणाला, "छेः! आतां या वख्ताला कुठची असली च्या ? गांवठी प्यायची असली तर चला."

शेवटीं गंपूनाना आणि मी असे दोघे अट्टल उरलों. गंपूनाना म्हणाले. "गांवठी तर गांवठी, पण इराणी त्याला खऱ्या चहाची लज्जत आणीलच ? काय दामू ?"

"त्यें खरं हाय !" दामू म्हणाला, "तुम्हांला कळनारसुद्धां नाय, गांवठी हाय कीं असली हाय तें !"

आम्ही गपचिप बाहेर पडलों. आम्ही कोणत्या मोहिमेवर निघालों आहोंत तें आमच्या सहकारी मित्रांनीं ओळखलें. दामूनें एक कप मारला असल्यामुळें त्याचीं पावलें जलद पडत होतीं. गंपूनानांना त्याचा फारसा भरंवसा नव्हता; त्यांनीं विचारलें, "काय रे, इतकं करून इराणी पाजणार ना ?"

दामू म्हणाला, "त्याची काळजी नको."

इराण्याच्या हॉटेलमध्यें जाईपर्यंत आमच्या जिवांत जीव नव्हता. इराण्याकडे आज नेहमींसारखी कारकून मंडळींची गर्दी नव्हती; अगदीं

शुकशुकाट होता. दोघेतिघेजण 'कोका-कोला' पीत होते. त्यांनीं आमच्याकडे संशयित मुद्रेनें पाहिलें. इराण्यानें आम्हांला वेधडक स्पेशल खोलींत नेलें आणि पांच मिनिटें थांबायची विनंति केली. पांच मिनिटांपेक्षां जास्त वेळ थांबायला आम्हांला सवड नव्हती; तितक्यांत ओव्हलटीनचा पुकारा करीत ऑर्डर-वाला आंत आला आणि त्यानें आमच्यासमोर तो अमृततुल्य चहा ठेवला. आमच्या सुदैवानें तो 'गांवठी' नसून 'असली' होता. पण एकाच वेळच्या पावडरवर इराण्यानें आलटूनपालटून पंचवीस कप उकळलेले असावेत, असें वाटत होतें. पण गंपूनाना म्हणाले, " 'गवती' पेक्षां हें आधण बरं!" एक घुटका घेतल्याबरोबर गंपूनाना प्रफुल्लित झाले आणि डिसूझा नि मिस् देशमुख यांचें लफडें कसें आहे याचा तपशीलवार वृत्तांत देऊं लागले. इतक्यांत इराणी आंत येऊन आम्हांला दम देऊन गेला, म्हटलें, वाटेंत पोलिसांनीं ही बडबड ऐकली तर नक्कीच त्यांना संशय यायचा; म्हणून गंपूनान ना एक 'कॅप्स्टन' ओढायला देऊन घाईघाईनें ऑफिसांत परतलो.

ऑफिसांत कसाबसा वेळ काढला आणि सहा वाजतां घरीं जायला निघालों. आज चौपाटीवर चहाबंदीनिमित्त सरकारचें अभिनंदन करणारी स्त्रियांची खास सभा होती. तिला आमची 'मंडळी' गेली असणार असा तर्क होता, तो खरा ठरला; चाळींत अगदीं सामसूम. म्हटलें, रेडियो लावावा; तर 'कामगार-सभेंत' एका कामगार स्त्रीची खास मुलाखत चालू होती. या चहापायीं आपल्या संसाराचा कसा सत्यनाश झाला, सारखा चहा ढोसूनढोसून आपल्या नवऱ्याची प्रकृति कशी बिघडली, वेळीअवेळीं चहा-साठीं तो घराबाहेर कसा जायचा आणि पिऊन परत आल्यावर त्याची जेवणावर कशी वांच्छा नसायची; पण आज चाहाबंदीमुळें घरांत कसें आनंदाचें साम्राज्य पसरलें आहे आणि पोराबाळांचीं तोंडें कशीं हसरीं झालीं आहेत, याचें तिनें साग्रसंगीत वर्णन केलें. आज रेडिओवर चहाबंदीनिमित्त खास कार्यक्रम होते रात्री चहाबंदी-मंत्र्यांचें भाषण, नंतर गु. ल. घाटपांडे यांची 'चहा कीं विष' ही नाटिका आणि शंकर घोडगांवर यांचें चहाविषयक काव्यगायन असे कार्यक्रम ठेवण्यांत आलेले होते.

गंपूनानांनीं हा अत्याचार पाहातांच रेडिओ निम्म्या किंमतींत फुंकून टाकायचा विचार केला; आणि ते सरकारला अद्वातद्वा शिव्या देऊं लागले.

सकाळपासून अवघा दीड कप चहा घेतल्यामुळें आमचे प्राण कंठाशीं आलेले होते. कांहींतरी करून अर्धा कप चहा घशाखालीं उतरवल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. चहाशिवाय ज्यांची प्रकृति नादुरुस्त राहील अशा लोकांना सरकारनें 'परमिट सिस्टीम' चालू केलेली होती. इतक्यांत माझ्या लक्षांत आलें कीं, आमचे भाऊसाहेब वकील यांचें चहाशिवाय चालणें शक्य नसल्यामुळें त्यांच्याकडे 'परमिट' आणि मालमसाला नक्की असणार. गंपूनानांना ही शक्कल सुचवतांच त्यांना परमानंद झाला. ते म्हणाले, "चला, त्यांच्याकडे जाण्याचा टॅक्सीचा खर्च माझा."

शेवटीं टॅक्सी करून आम्ही भाऊसाहेबांकडे गेलों. भाऊसाहेब घरींच 'घुटका' घेत बसलेले होते. अगदीं राजरोस त्यांचें हें धाडस पाहून मी थक्क झालों. प्रत्यक्ष भाऊसाहेबांची बायको त्यांच्या कपांत चहा ओतीत होती. त्यांना असली गुणी बायको मिळाल्याबद्दल आम्हांस 'घरची' आठवण येऊन भाऊसाहेबांचा हेवा वाटला. आमचे पडलेले चेहेरे पाहून भाऊसाहेबांना आमची दया आली.

ते म्हणाले, "मित्रांनो, तुम्हीं कां आलां आहांत तें तुमच्या भकास आणि तहानेलेल्या चेहेऱ्यांवरून स्पष्ट दिसतं आहे. मित्रांना संकटांत मदत करणं हें माझं कर्तव्य आहे; पण तुम्हांला जरा उशीर झाला. असली चहा आत्तांच संपला. तुम्हांला दुसऱ्या धारेचा म्हणजे याच पावडरवर परत उकळून तयार केलेला चहा चालेल का?"

आम्ही दीन स्वरांत म्हणालों, "भाऊसाहेब, केवळ दोन जीवांचा प्रश्न आहे. निराशेच्या निर्वाणीचा शेवटचा उपाय म्हणून आम्ही तुमच्याकडे आलों आहोंत. आम्हांला कसलाहि द्या, पण द्या."

भाऊसाहेब म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं. बरोबर कांहीं खायला हवं कीं नुसताच?"

आम्ही म्हणालों, " आम्ही अगदीं पद्धतशीर घेणार. "

भाऊसाहेबांना आमच्या ज्वलंत चहाभक्तीचें कौतुक वाटलें. ते म्हणाले, " मला जरा गंपूनानांची काळजी वाटते. उद्यां वहिनी मला शिव्या देतील. म्हणतील, भाऊसाहेबांनीं हें आरंभलं आहे तरी काय ? "

घरगुती उल्लेख ऐकून गंपूनाना जरा ओशाळले. ते धीर करून म्हणाले, " त्याचं कांहीं विशेष नाहीं हो."

आमचा वादसंवाद होईतों दोन प्याले भरून आले. गरमगरम, अगदीं वाफा येत होत्या. भाऊसाहेबांना अभिवादन करून आम्ही प्यायला सुरुवात केली. एक घुटका घेतांच गंपूनाना आनंदित झाले आणि 'मुंदडा-प्रकरणावर बोलूं लागले. शेवटीं वहिनींसमोर तमाशा नको, म्हणून त्यांना प्रतिबंध न करतां भाऊसाहेबांनीं दिलेली सुपारी चघळीत मी गंपूनानांना हाताशीं धरून बाहेर काढलें. रात्र पडली होती, त्यामुळें आमची ही स्थिति कुणाच्याच लक्षांत आली नाहीं. पण गंपूनाना कांहीं ऐकेनात. ते मोठमोठ्यानें बरळूं लागले. नवकाव्य आणि नवकथा यांवर त्यांनीं व्याख्यानच द्यायला सुरुवात केली. तें ऐकून गेटावरचा पोलीस आला. शिट्या फुंकल्या गेल्या आणि त्यानें आम्हांला पकडलें. भरचौकांत अशा परिस्थितींत पकडलें जाणें म्हणजे बेअब्रू. त्यामुळें मस्तकांत हजारों घणाचे घाव पडताहेत असें वाटून मी तिथल्या तिथें बेशुद्ध झालों, आणि खालीं पडलों—

" इश्श ! केवढ्यानं पलंगावरून पडलांत ?— नाहींतरी भारीच लोळायला हवं ! "— सौभाग्यवती मला हात धरून उठवीत होती. खरा प्रकार माझ्या ध्यानीं आला. एकूण सारें स्वप्नच तर ! पण मला विचार करायला फुरसत नव्हती. आमची वज्रचुडेमंडिता कडाडली, " चला, आठ वाजले. चहाचं पातेलं केव्हांचं स्टोव्हवर ठेवलंय् ! "

" चहा ! तो प्रियतम चहा ! " चहाचें नांव ऐकतांच मी टुणदिशीं उडी मारली आणि तोंड धुवायला मोरींत धांवलों.

# मी विद्वान् कसा झालों ?

मी एक महाभयंकर विद्वान् आहें अशी माझी ठाम समजूत आहे. मात्र 'महाभयंकर' या विशेषणामुळें बिचकून जाण्याचें कारण नाहीं. अमका सिनेमा 'भयंकर चांगला' आहे, अमकी पोरगी 'भयंकर सुंदर' आहे, आचार्य अत्रे 'भयंकर विनोदी' आहेत. त्याप्रमाणेंच मी 'महाभयंकर विद्वान्' आहें. मी विद्वान् कसा झालों आणि माझी विद्वत्ता कशी आहे याचें आख्यानहि 'भयंकर'च आहे. विद्वान् माणसाचें बाह्यांग मीं पूर्णपणें आत्मसात् केलेलें आहे. ईश्वराच्या कृपेमुळें माझा चेहेरा अभिजात बावळट असल्यामुळें माझ्या विद्वत्तेला एक अपूर्व शोभा आलेली आहे. ज्ञानाच्या गंगेंत सदैव डुंबत असल्यामुळें मी अंघोळ नांवाच्या नाटकाच्या खटाटोपांत मुळींच पडत नाहीं. त्याचा एक सुपरिणाम असा झाला आहे कीं, अज्ञानी लोक अक्षरशः माझ्या वाऱ्यास उभे रहात नाहींत. कपडे हे विद्वत्तेला अनावश्यक असल्यामुळें मी सर्वोदयी कार्यकर्त्यांपेक्षांहि जास्तींत जास्त गबाळ कपडे घालतों. शिंपीकामावर माझें प्रेम नसल्यामुळें आणि तो कापाकापीचा हिंसात्मक धंदा फार दिवस चालूं नये असें माझें प्रामाणिक मत असल्यामुळें मी फारसा त्याच्या वाटेला जातच नाहीं. एक जाडजूड, जुनापुराणा कोट, त्याच्या रंगाशीं मेळ राखील अ ा शर्ट, त्याच मालेंत ठाकठीक बसेल असें धोतर आणि वर एक प्रचीनतम टोपी, अशा पेहेरावांत मी बिनदिक्कत वाटेल तिथें जातों. डोकें हेंच माझें मुख्य भांडवल असल्यामुळें त्यावरचें मासिक व्याज मी संपूर्णतया न्हाव्याच्या स्वाधीन करतों. त्यामुळें विचार तल्लख होतात यांत वादच नाहीं. विद्वत्ता आणि बायका यांचें जन्मापासूनचें हाडवैर असल्यामुळें मीं लग्न या विषयाशीं अजून सलगी केलेली नाहीं.

माझ्या विद्वत्तेच्या या बाह्यांगाप्रमाणें अंतरंगहि मोठें मनोवेधक आहे. माझा ग्रंथसंग्रह दहा हजार पुस्तकांचा आहे. महाराष्ट्राच्या दुर्दैवानें अलीकडे विद्वत्ता रद्दीच्या मोलानें विकली जाऊं लागली आहे. त्यामुळें माझा हा अमोल संग्रह मीं रद्दींतच विकत घेतला आहे. साधारण सहा आणे शेर या भावांत एका शेरांत सरासरी पन्नास पुस्तकें येतात. या भावांत हीं एकूण दहा हजार पुस्तकें मीं फक्त पंच्याहत्तर रुपयांना घेतलेलीं आहेत. या संग्रहांत अमोल पुस्तकें आणि हस्तलिखितें आहेत. माझ्या मृत्यूनंतर हा संग्रह पुणें विद्यापीठाला देण्याचा माझा विचार आहे. १८४३ पासून प्रसिद्ध झालेलीं सर्व रेल्वे-टाइमटेबलें माझ्या या अपूर्व संग्रहांत आहेत. या टाइम-टेबलांवरून भारतीय रेल्वेच्या इतिहासावर मीं कांहीं टिपणें केलेलीं आहेत, तीं रेल्वे-मंत्र्यांना पाठवून देण्याचा माझा विचार आहे. चित्रशाळा, पाठक बुकसेलर्स आदि प्रकाशकांच्या पुस्तकांच्या जुन्या याद्या माझ्या संग्रहांत आहेत. आयुर्वेद रसशाळा, धूतपापेश्वर यांचे माझ्या संग्रहांतले वर्षांवर्षांचे कॅटलाग म्हणजे आयुर्वेदाच्या अभ्यासकांना अपूर्व मेजवानीच! याशिवाय घैसास कंपनी, हिज मास्टर्स व्हाइस यांच्या रेकॉर्डस्‌चे ‘कॅटलॉग म्हणजेच भारतीय संगीतकलेच्या अभ्यासकांचे अमोल संदर्भग्रंथ माझ्याच संग्रहांत आहेत. १८८१ पासून तों १९५७ पर्यंत महाराष्ट्रांतील वाण्याच्या दुकानांतील जुन्या चोपड्याहि माझ्या संग्रहांत आहेत, याचा मला मोठा अभिमान वाटतो. या संग्रहाच्या अभ्यासावरून महाराष्ट्रांतील ‘व्यापार-वृद्धीचा इतिहास’ कोणाहि अभ्यासू माणसाला लिहितां येईल. या संग्रहाची मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें केली असून ती मीं नाकारली आहे. कारण पुढेंमागें नॅशनल लायब्ररी, कलकत्ता या संस्थेकडून त्याला मागणी येण्याचा दाट संभव आहे. माझ्या ग्रंथसंग्रहांतील आणखी एक अपूर्वता म्हणजे १८१८ ते १९४७ पर्यंतच्या काळांतल्या महाराष्ट्रांतील लग्नपत्रिका. सुमारें तीन हजार लग्नपत्रिकांचा माझा संग्रह म्हणजे महाराष्ट्रांतील सामाजिक स्थित्यंतरांचा धांवता इतिहासच! या इतिहासावरून मराठी मुद्रणकलेची कशी वाढ झाली हेंहि दिसून येतें. अनेक घटस्फोटांच्या खटल्यांत पुराव्या-साठीं अनेक कोर्टांत या संग्रहाचा फार उपयोग झालेला आहे. महाराष्ट्र

सामाजिक परिषदेच्या एखाद्या अधिवेशनांत या संग्रहाचें प्रदर्शन भरविण्याचा माझा मनोदय आहे.

या संग्रहामागोमाग १८२३ ते १९५३ या काळांतील सुमारें दहा हजार पोस्टकार्डें माझ्या संग्रहांत आहेत. या पोस्टकार्डांचें मीं वर्गीकरण केलेलें असून 'इंग्रजकालीन पत्रसार-संग्रह' या नांवाचा मीं तयार केलेला एक संदर्भग्रंथ सध्या प्रकाशनाच्या मार्गावर आहे. या संग्रहांत १ हजार मृत्युपत्रें [मृत्यूची बातमी कळवणारीं), दोन हजार लग्नपत्रें (लग्न ठरल्याची बातमी कळवणारीं), एक हजार खुशालपत्रें ('आम्ही सर्व खुशाल आहोंत' या अर्थाचीं), दोन हजार भानगड—पत्रें (धमक्या, शिव्या, कोर्टकचेऱ्या नवरा-बायकोच्या भानगडी वगैरे) आहेत. या पत्रांवरून गेल्या शंभर वर्षांतील महाराष्ट्राचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास कोणासहि लिहितां येईल.

—या संग्रहांत कांहीं अपूर्व पत्रें आहेत. गांधींनीं टॉलस्टायला लिहिलेलें पत्र, वासुदेव बळवंत यानें पंचम जॉर्ज याला लिहिलेलें पत्र शिवरामपंत परांजपे यांनीं हिटलरला लिहिलेलें पत्र, (हें पत्र प्रचंड खळबळजनक आहे, त्यामुळें त्यांतील वृत्तांत देतां येत नाहीं.) अशीं अनेक अपूर्व पत्रें असल्यामुळें तो एक खळबळजनक ग्रंथ ठरणार आहे, याशिवाय १८५७ ते १९५७ या शंभर वर्षांतील हायस्कुलमधील विद्यार्थ्यांच्या निबंधांच्या आणि गणिताच्या चोपड्या म्हणजे शिक्षणशास्त्रज्ञांस अपूर्व मेजवानी आहे. या चोपड्यांत न्यायमूर्ति रानड्यांची गणिताची चोपडी, कोल्हटकरांची निबंधाची वही, (कोल्हटकरांना निबंधांत १० पैकीं ३ मार्क होते,) पाहून मराठी वाङ्मयभक्तांस प्रेमाचें भरतें येईल.

मी विद्वान् असल्यामुळें व्याख्यान देण्यांत पटाईत आहें. 'तुटीच्या अर्थसंकल्पा' पासून तों 'स्वयंपाकघरांतील काटकसर' यांपैकीं कोणत्याहि विषयावर मी अस्खलित दोन तास बोलूं शकतों. बारशापासून बाराव्यापर्यंत सर्व समारंभांना उपस्थित राहून विद्वत्तापूर्ण भाषणें करण्यांत माझा हात

कोणीच धरणार नाहीं. कंटाळवाणें भाषण करून 'सारी सभा चित्रासारखी तटस्थ' करण्यांत माझा हातखंडा आहे. कोणत्याहि सभेला गर्दी कमी हवी असल्यास (जागेच्या अभावीं) मला अध्यक्ष नेमण्यांत येतें (आजकाल महाराष्ट्रांत विद्वत्तेची चाड नाहीं!) परंतु इतकें असूनहि दिवसांतून दोन वेळां तरी कोणत्या ना कोणत्या सभेचें अध्यक्षस्थान मला नाइलाजास्तव स्वीकारावें लागतेंच. (महाराष्ट्रांत विद्वानांचा दुष्काळ आहेच!) केव्हां केव्हां फार मोठ्या सभांत माझ्यावर आभारप्रदर्शनाचें गोड काम टाकण्यांत येतें. पण मी आभार मानण्यासाठीं उठल्यावर लोकांची पळापळ सुरू होते; एवढ्या विद्वान् माणसाला हें क्षुल्लक काम दिल्याबद्दल निषेध म्हणून ते सभात्याग करतात. एकदां पळण्याच्या शर्यतीला मी अध्यक्ष म्हणून गेलों असतां, माझ्या भाषणाचा एवढा जबरदस्त परिणाम झाला कीं, सर्वच्या-सर्व उमेदवार पहिले आले! आणि माझ्या व्यायाम विषयक सणसणीत भाषणामुळें प्रेक्षकांनाहि चेव येऊन त्यांनींहि त्या शर्यतींत आगाऊ नांवें नोंदवलीं नसतांहि भाग घेतला! (माझ्या भाषणामुळें त्यांच्यांत एवढी निरपेक्ष बुद्धि निर्माण झाली कीं ते पळाले; पण पारितोषिकें घेण्यासाठीं परतले नाहींत!) सभेच्या संचालकांनाहि माझ्या भाषणामुळें दम निघेना, आणि ते उभ्या उभ्या, न पळतांहि अक्षरशः धापा टाकूं लागले.

माझें संशोधन अपूर्व आहे. वेदकाळापासून तों पंचवार्षिक योजनेपर्यंत मी प्रत्येक विषयावर अधिकारवाणीनें बोलूं शकतों. फटकळ आणि विक्षिप्त बोलणें, प्रतिपक्षाची रेवडी उडवणें हे माझ्या हातचे मळ आहेत. 'नेपोलियन भ्याड होता.' 'आईन्स्टाइनला फारशी अक्कल नव्हती,' असलीं मतें, बिनदिक्कत फेकण्यांत मी पटाईत आहें. एडिसन नांवाचा माणूस झालाच नाहीं, या माझ्या विधानामुळें युरोपीय शास्त्रज्ञांत फार मोठी खळबळ माजली होती. शेवटीं मीं पुराव्यानें सिद्ध केलें कीं, एडिसन नांवाचा माणूस झालाच नाहीं. एडिसनच्या वडिलांनीं त्याचें बारसें केलेंच नव्हतें. त्याचे वडील मि. एडी यांचें एक दुर्मिळ पत्र मला सांपडलें तें मीं 'लंडन टाइम्स' मध्यें जसेंच्या तसें प्रसिद्ध केलें. मि. एडी यांनीं आपल्या मुलाचें

नांव न ठेवल्यामुळें त्याला आजूबाजूचे लोक 'मि. एडी यांचा मुलगा' अशीच हांक मारूं लागले, त्यामुळें एडिसन या नांवाचा माणूस नव्हता, या माझ्या विधानाला बळकटी आली.

संभाजीबाबतचें माझें संशोधन क्रांतिकारक ठरलें आहे. सर्वसामान्य शालेय इतिहास वाचणाऱ्या लोकांची अशी समजूत आहे कीं, औरंगजेबानें संभाजीचा तुळापूर येथें वध केला. मीं तुळापूर आणि वडू येथें यासाठीं सहा महिने मुक्काम केला आणि सारा महाराष्ट्र पालथा घातला, तेव्हां मराठ्यांच्या इतिहासावर अपूर्व प्रकाश पाडील अशी साधनसामग्री माझ्या हातीं आली. त्या कागदपत्रांवरून असें सिद्ध होतें कीं, संभाजीचा औरंग-जेबानें वध केला ही कल्पनाच चुकीची आहे. संगमेश्वरला संभाजीला पकडण्यासाठीं औरंगजेबाचे लोक आले असतां त्याची बातमी संभाजीला अगोदरच लागली. त्याबरोबर संभाजी तिथून पळाला; मात्र पळण्यापूर्वी मुसलमान सैनिकांना फसविण्यासाठीं त्यानें हुबेहूब आपल्यासारखा दिसणारा एक तोतया संभाजी मागें ठेवला. औरंगजेबाचे सैनिक त्या तोतया संभाजी-लाच खरा संभाजी समजले आणि त्याचा त्यांनीं तुळापूर येथें अमानुष वध केला. शेवटीं खरा शिवपुत्र संभाजी लपतछपत नाशिक, दिल्ली मार्गें नेपाळांत गेला आणि तिथें लोटमांडू या गांवीं हिंवतापानें वारला मरण्या-पूर्वीं कांहीं दिवस त्यानें लोटमांडूच्या लोकांना आपण खरे कोण आहों याची ओळख दिली, तेव्हां लोकांना मोठा विस्मय वाटून त्यांनीं त्याला मरणोत्तर सन्मानपूर्वक जाळलें. लोटमांडू येथें ज्या घरांत संभाजी रहात होता तें घर नुकतेंच वादळांत नामशेष झालें आणि दुर्दैवानें एक राष्ट्रीय स्मारक नष्ट झालें.

माझा हा नवा क्रांतिकारक शोध महाराष्ट्राला पचण्यासारखा नाहीं. हें जाणून असल्यामुळें मीं त्याला पॅरिसच्या एका वर्तमानपत्रांत प्रसिद्धि दिली. एडिसनच्या शोधामुळें परदेशांत माझें अगोदरच नांव झालेलें असल्यामुळें, या लेखामुळें फ्रेंच अकादमीनें मला खास पॅरिसला बोलावणें

पाठवलें. पण विद्वानांत तोरा आणि अहंमन्यता, तसेंच विक्षिप्तपणा हे गुण आवश्यक आहेत अशी माझी प्रामाणिक समजूत असल्यामुळें हें आमंत्रण मीं साभार नाकारलें आणि आमच्या महाराष्ट्र साहित्य–परिषदेपुढें फ्रेंच अकादमी अगदीं सामान्य आहे असें माझें निर्भीड मत मीं त्यांना कळवलें आणि त्याची एक प्रत महाराष्ट्र साहित्य–परिषदेला पाठवली. तिची साहित्य परिषदेनें फारशी दखलहि घेतली नाही. ( हा पहा महाराष्ट्रांतील कंपूशाहीचा पुरावा ! ) पण फ्रेंच अकादमीनें परत विनंतीपूर्वक पत्र पाठवलें कीं, आपण प्रत्यक्ष येऊं शकत नसला तरी एखादा प्रबंध पाठवावा. त्याबरोबर मी ‘ व्हिक्टर ह्यूगोचें वाङ्मयचौर्य ’ या विषयावर एक अंतर्भेदी प्रबंध लिहून त्यांना पाठवला. संत तुकारामाच्या काव्याचें अगदीं शब्दशः भाषांतर करून व्हिक्टर ह्यूगोनें अश्लाघ्य वाङ्मयचौर्य केलें आहे, असें मीं त्या प्रबंधांत प्रतिपादिलें आहे. हा माझा प्रबंध फ्रेंच अकादमीला अपूर्व वाटून त्यांनीं मला ‘ ऑनररी डी. लिट्’ची पदवी बहाल केली; पण परकी राष्ट्राचा हा बहुमान त्याज्य आहे या स्वदेशाभिमानाच्या सबबीवर मीं ती साभार नाकारली.

माझी ही कीर्ति लंडन विद्यापीठाकडे पोंचली. माझ्यासारख्या विद्वानाची बी. बी. सी. वर मुलाखत व्हावी असे प्रयत्न झाले. त्यांनाहि मीं साफ नकार दिला; पण त्यांना माझ्या विद्वत्तेचे आणि संशोधनाचे उन्मेष दाखविण्यासाठीं पुढील प्रश्नोत्तरें त्यांना पाठवून दिलीं. तीं बी. बी. सी. नें ध्वनिक्षेपित केलीं. त्यांतील कांहीं प्रश्नोत्तरें वानगीदाखल आपल्यापुढें ठेवीत आहें :

## १८५७ चें बंड कीं स्वातंत्र्ययुद्ध ?

—या विषयावर आतांपर्यंत अनेक विद्वानांनीं लिहिलें आहे. कांहीं विद्वानांचें मत असें कीं, १८५७ सालीं शिपायांचें बंड झालें, तर कांहींच्या मतें तें स्वातंत्र्ययुद्ध होतें. मला या बाबतींत आपणा सर्वांच्या मताला धक्का देणारें संशोधनपूर्ण मत मांडावयाचें आहे. तें असें कीं, १८५७ सालीं बंड

झालेंच नाहीं, आणि स्वातंत्र्ययुद्धहि झालें नाहीं. अलीकडे नव्यानेंच हातीं आलेल्या कागदपत्रांवरून असें सिद्ध झालें आहे कीं, १८५७ सालीं भारताच्या इतिहासांत कोणतीच विशेष घटना घडली नाहीं. बहादुरशा १८५४सालीं आणि नानासाहेब १८५५ सालीं वारला अशा अर्थाचें दुर्मिळ पत्र लखनौ–दफ्तरांत उपलब्ध झालें आहे. या विषयावर सुमारें १८५७ पानांचा एक प्रचंड ग्रंथ मी लिहीत असून तो लवकरच प्रसिद्ध होईल.

## गाढवाला चार पाय असतात : खरें कीं खोटें ?

—गाढवाला चार पाय असतात हा दृष्टिभ्रम आहे. गाढवाला खरोखरी तीनच पाय असतात. रशियन शास्त्रज्ञ गादोवास्की याच्या मताचा आधार घेतां, गाढवाला चार पाय आहेत असें मानणारे सारे एकजात गाढव आहेत असें म्हणावें लागेल. गाढवाला तीन पाय आणि दोन शेपट्या होत्या. त्यापैकीं एका शेपटीचा उपयोग न करण्याचा गाढवपणा त्याच्या हातून घडल्यामुळें तिलाच लोक पाय मानूं लागले. गाढवाची लाथ मारण्याची संवय यामुळेंच नैसर्गिक आहे. अंगावरील माशा मारण्यासाठीं जनावर शेपटीचा उपयोग करतें, तसेंच गाढव आपल्या एका पायाचा—म्हणजे खऱ्या अर्थानें दुसऱ्या शेपटीचाच—उपयोग करतें.

## बैल आकाशांत उडत नाहींत : खरें कीं खोटें ?

ही गोष्ट साफ खोटी आहे बैल आकाशांत अगदीं गरुडासारखा संचार करूं शकतात 'ऑक्स–फर्ड' विद्यापीठाचे नामवंत प्राणिशास्त्रज्ञ मि. यू. सी. बुल यांनीं या विषयावर फार महत्त्वपूर्ण संशोधन केलेलें आहे. ते म्हणतात, पूर्वीं बैल आकाशांत उडत असत. पुढें पृथ्वी आणि सूर्य यांच्यांतील आकर्षणामुळें आकाशांतील धूलिकणांत 'नियॉन' नांवाचे विद्युत्कण जमले. या विद्युत्कणांशीं बैलांचा संघर्ष होऊन बैलांना उडणें अशक्य होऊं लागलें. हे धूलिकण पूर्णपणें नष्ट केले तर, यापुढें प्रत्येक शेतकऱ्याला पोपटाच्या पिंजऱ्याप्रमाणें बैलांसाठींहि पिंजरे ठेवावे लागतील.

## दोन अधिक दोन चार : खरें कीं खोटें ?

दोन अधिक दोन यांची बेरीज चार नसून पांच होते ही गोष्ट अनेकांना आश्चर्यांत टाकील. अंकशास्त्र हें मूळ भारतीयांचें. त्यावरील ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतील 'अंकरत्नाकर' नांवाचा एक संस्कृत ग्रंथ नुकताच तंजावर येथें सांपडला आहे. त्यांत दोन अधिक दोन पांच असें स्वच्छ म्हटलेलें आहे. आणि दोन अधिक तीन = चार असें म्हटलेलें आहे. पण पुढें नेमाडपंत नांवाच्या एका अंकशास्त्रज्ञानें पूर्वीचा अंकगणनेचा क्रम एक, दोन, तीन, पांच, चार, सहा, असा होता तो बदलून एक, दोन, तीन, चार, पांच असा केला. ख्रिस्तपूर्व आठव्या शतकांत एका हाताचीं बोटें चारच गणीत. दोन हातांचीं बोटें चार आणि चार मिळून दहा, अशी बेरीज मांडली जाई; आणि माणसाचे हातपाय मिळून एकूण पांच असें लिहिलें जाई. 'अश्विन गोळाबेळा' येथील शिलालेखांत याचा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून दोन अधिक दोन पांच हें उघडच आहे.

## मुंबईला पाण्याचे फार हाल आहेत : खरें कीं खोटें ?

या सारखी खोटी गोष्ट कोणतीच नाहीं. मुंबई नगरपालिकेच्या कृपेनें मुंबईला पाण्याचे हाल मुळींच नाहींत; पाण्याची चांगली चंगळ आहे. हाल आहेत ते बिचाऱ्या मुंबईकरांचे. त्यांनाच या पाण्याचें दर्शन होत नाहीं. पण आपण अज्ञानी लोक नेहमीं म्हणत असतों कीं, 'मुंबईला पाण्याचे हाल आहेत.'

## आजार नसणें हें निरोगीपणाचें लक्षण आहे का ?

या विषयावर माझीं मतें ठाम आहेत. आजारीपणाचा अभाव हें निरोगीपणाचें लक्षण आहे ही आतांपर्यंत सर्वांची समजूत होती. परंतु दीर्घ संशोधनाअंतीं असें सिद्ध झालें आहे कीं, वारंवार आजारी पडणें हेंच खरें निरोगीपणाचें लक्षण आहे. ज्यांना कांहींहि आजार झालेला नाहीं किंवा होत

नाहीं. त्यांच्याबद्दल खात्री देतां येत नाहीं. आजार होणें म्हणजे आपल्या शरीरांतील टाकाऊ गोष्ट बाहेर टाकणें. चांगला पांच डिग्रीपर्यंत ताप आला कीं आपण घाबरतों. वास्तविक आपल्याला आनंद व्हायला पाहिजे. कारण ताप येणें हें निरोगीपणाचें लक्षण आहे. शरीरांतील उष्णता बाहेर टाकण्याचा तो एक नैसर्गिक मार्ग आहे. त्यावर औषध घेणें हा शुद्ध वेडेपणा आहे. हगवणीसारखा आजार म्हणजे आपल्या भावी निरोगीपणाची ग्वाहीच. नैसर्गिक रीत्या जो आजार तुमच्या एरंडेलाची किंवा 'ब्रुकलॅक्स'ची बिनबोभाट, विनाखर्च कामगिरी करतो, त्याला डॉक्टरचें औषध घेऊन प्रतिबंध करणें हा वेडेपणा आहे, असें ख्यातनाम ब्रिटिश डॉक्टर मि. हॅगमन यांचें मत आहे. असा प्रतिबंध केला असतां, 'रेचको–न्मूमोटो' नांवाचा रोग होतो.

त्यामुळें वारंवार आजारी पडणें हेंच खरें जिवंत माणसाचें लक्षण आहे.

माझी ही मुलाखत फारच गाजली आणि लंडन युनिव्हर्सिटीच्या 'फॅकल्टी ऑफ मेडिसिन' तर्फे एम्. डी. च्या विद्यार्थ्यांसमोर 'डायरिया' या विषयावर मी प्रबंध वाचावा अशी सूचना आली. कारण माझी मुलाखत रविवारीं सकाळीं ध्वनिक्षेपित झाल्यामुळें लंडनमधील नागरिकांचें पोटाचें आरोग्य सुधारलें आणि त्याचाच परिणाम म्हणून हें आमंत्रण मला पाठविण्यांत आलें. पण तूर्त आयुर्वेदांतील 'सोनामुखी' या विषयावर एक प्रचंड ग्रंथ लिहिण्यांत मीं गर्क असल्यामुळें, तें निमंत्रण मी साभार नाकारलें.

माझ्या या विद्वत्तेच्या अवाढव्य पसाऱ्यामुळें मी कदाचित् महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद भूषविण्याची शक्यता आहे. पण परिषदेच्या या निवडणुकीच्या धुळवडींत न उतरतां, माझें व्यासंगावरचें लक्ष कमी होऊं न देण्यांतच मराठी वाङ्मयाचें कल्याण आहे, असा माझ्या

अनेक मित्रांचा सल्ला आहे. मराठी वाङ्मयांत माझ्या आगमनापूर्वी अंधार होता असें माझें प्रामाणिक मत असल्यामुळें आणि तें मांडण्यास मी मुळींच कचरणार नाहीं, आणि जमलेल्या क्षुल्लक साहित्यवृंदाला अर्थात् तें मुळींच रुचणार नाहीं, यामुळेंहि मी तें स्वीकारीन असा भरंवसा नाहीं.

— थोडक्यांत, माझ्या विद्वत्तेचें रहस्य हेंच कीं, व्यासंग !— जन्मभर व्यासंग ! सतत, कायमचा व्यासंग ! नहि ज्ञानेन सदृशं ... वगैरे वगैरे !

# स्त्रिया आणि सिनेमा

स्त्रिया आणि सिनेमा हा विषय अत्यंत नाजूक आणि अवघड आहे. एखादा जडजंबाल विचारप्रवर्तक लेख जगबुडतीचा चेहरा करुन लिहिणं एकवेळ सोपं आहे. एखादी 'हृद्य नी आकर्षक' लघुकथा खरडणं, किंवा एखादा 'सखोल, आणि व्यासंगपूर्ण' टीकालेख भरडणं किंवा त्याहिपेक्षां आजकालच्या सिनेमाच्या ऐन उमेदींत देशपांडेगिरी करुन एखादी 'पटकथा' फडकावणं सोपं आहे. पण स्त्रिया आणि सिनेमा या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर चार शब्द लिहिणं अगर बोलणं हें धोक्याचं आहे.

याचं कारण म्हणजे आमच्या 'घरांतून' त्याला कडक विरोध होण्याचा संभव आहे. हा विषय म्हणजे 'होम अफेअर्स' असल्यामुळें त्यासंबंधीं 'जरा जपून' 'पुढचं पाऊल' टाकलं पाहिजे. एक वेळ आम्ही सिनेमांत जावं. (आम्हांला एक्स्ट्रॉचं कामहि मिळविण्यासाठीं तपें घालवावीं लागतील ही आमच्या घरीं खात्रीच आहे) पण असल्या 'भलत्या' विषयावर लिहू नये.

पण असल्या भलत्या विषयावर लिहिणं आवश्यक झालंय. आजकाल बायका फार पिसाळल्या आहेत. अगदीं ढेंकणांसारख्या पिसाळल्या आहेत. संयुक्त महाराष्ट्र परिषद घ्या, एखाद्या ख्यातनाम टीकाकाराचं व्याख्यानसत्र करा किंवा खुन्या मुरलीधरांत आफळेबुवाला बोलवा, बायकांची प्रचंड गर्दी झालेली असते. पत्रकारी भाषेंत बोलायचं म्हणजे 'उदंड गर्दी' झालेली दिसते. आणि या ठिकाणीं होणारी ही गर्दी अगदीं निष्कारण असते. त्या विषयांत स्त्रियांना कांहीं कळतच नाहीं. पण आपल्या वेशभूषेचें प्रदर्शन

करण्यासाठीं, इतरांच्या ‘प्रदर्शनाशीं’ आपली तुलना करून पाहण्याच्या उदात्त हेतूनींच ही गर्दी झालेली असते. आजकाल बोरीबंदर स्टेशनवर आमच्यासारख्या सभ्य विवाहित पुरुषाचा हटकून ‘विनयभंग’ होत असतो !!

परवां मी सहज लक्ष्मी रोडवरून चकरा मारतां मारतां प्रभात टॉकीजपाशीं आलों. तिथं ‘वंशाच्या दिव्या’ला लांबलचक क्यू लागला होता. आमची सौ. होतीच बरोबर. तिला तो ‘क्यू’ पाहून ‘पूढचं पाऊल’ पाहण्याची इच्छा झाली. मलाहि पुढचं पाऊल पाहण्याची इच्छा होतीच, पण आपलं एकट्यानें. अगदीं निवांतपणें. म्हटलं सौ. ला आर्यनांत संत रामदास दाखवूं. पण तिला कुठं पटतंय तें. तिनं ‘संत रामदास’ वरचं कुठल्यातरी नियतकालिकांत आलेलं एक परीक्षण माझ्या तोंडावर फेकलं आणि ‘संत रामदास’ सिनेमापेक्षां ‘संत रामदास’ साबण स्वस्त नी चांगला आहे. हीहि माहिती दिली. तिचं तें अगाध ज्ञान पाहून मला ‘मुकाट’ मिनर्व्हाच्या फॅमिली सर्कलच्या क्यूंत उभं राहावं लागलं.

आजकाल पुष्कळ सिनेमा साप्ताहिकें निघतात. त्यांच्या स्वस्ताईमुळें आणि रद्दीविषयक गुणांमुळें मी तीं घेतों. आमची सौ. तीं साप्ताहिकें एकनिष्ठपणें वाचते. त्यामुळं आजकालचे चित्रपट, त्यांचीं कथानकें, दुबळें दिग्दर्शन, भिकार ध्वनिमुद्रण इत्यादि जडजंबाळ शब्द वापरून ती माझ्याशीं गंभीर चर्चाहि करते. परवां तिनं मला ‘स्नेकपिट’ हा चित्रपट ‘फिजीऑलॉजिकल’ कसा आहे तें पटवून दिलं.

चित्रपटज्ञानाबाबत तिची प्रगति, तिचा गाढ व्यासंग वगैरे वगैरे पाहून परवां विजय टॉकीजांत आम्ही ‘हाऊ ग्रीन वॉज माय व्हॅली’ ला गेलों. त्या चित्रपटाला कॉलेजमधल्या पोरींची अगदीं ‘उदंड’ गर्दी झाली होती. पुढें मागें ‘चित्रपट आणि समाज जीवन’ या विषयावर एक जाडजूड ग्रंथ लिहायचा मी संकल्प केला असल्यामुळें त्या उदंड गर्दीचं मी प्रामाणिकपणें निरीक्षण करीत होतों. आमच्या पुढच्या रांगेंतहि पाठीमागून बऱ्या दिसणाऱ्या तरुणी बसल्या होत्या त्यांचंही मी ‘धावतं आलोचन’

करीत होतों. त्यामुळं आमची ही अस्वस्थ झाली. व त्यामुळें मला तिनं चित्रपटहि नीट पाहूं दिला नाहीं. आणि शेवटीं असं मत व्यक्त केलं कीं 'अलख निरंजन' ला गेलों असतों तर बरं झालं असतं.

सिनेमा आणि सुंदर स्त्रिया यांचा संबंध सर्वविश्रुतच आहे. पण चित्रपटगृहांत सिनेमा प्रकाशित झाल्यानंतरहि सुंदर स्त्रियांशीं असलेला संबंध तुटत नाहीं. विजय टॉकीजमध्यें प्रदर्शित होणाऱ्या इंग्रजी चित्रपटांतील गर्दी तेथें येणाऱ्या तरुणींच्यावर अवलंबून असते. यासाठीं सिनेमागृहाच्या चालकांनीं सुंदर स्त्रियांना निम्म्या तिकिटांत प्रवेश दिला पाहिजे; तसंच कुरूप स्त्रियांना बंदी तरी केली पाहिजे किंवा वाढविलेले दर ठेवावेत. कधीकधीं आपण एकटेच एखाद्या चांगल्या सिनेमाला जावं, जरा उशीरा जावं, न्यूज रील सुरू झालीय, आणि आपल्या शेजारीं एखादी स्त्री (ती सुंदर असावी) बसलीय या समाधानानं आपण बसावं आणि इंटरव्हल होतांच त्या 'सुंदर' स्त्रीचं खरं दर्शन होतांच जी झीट आल्यासारखी अवस्था होते तिला कुठल्याच ट्रॅजेडींत तोड नसावी !

अलीकडे सिनेमाला गर्दी खूप असते. कुठला भिकार चित्रपट लागो, त्याला क्यू हा आहेच. पण ह्या 'क्यूं'त स्त्रियांना मात्र आघाडीवर जाऊन पटकन तिकीट मिळतं. आमच्या दादर बी. बी. स्टेशनवर तिकिटांसाठीं सभ्य पुरुषांची रांग लागलेली असतांना कुठल्याहि स्त्रीला बिनतक्रार तिकीट मिळतं. त्यामुळें लांबलचक क्यू असला कीं मीं जवळपास एखादी स्त्री आहे का पाहतों व तिला जरा 'रिक्वेस्ट' केली कीं ती देते तिकीट काढून ! पण ही 'प्रॅक्टीस' नेहमीं चालत नाहीं. एकदां मी असाच एका चित्रपटाला गेलों. आमची 'ही' सोबत नसल्यामुळें तिकिटांचा प्रॉब्लेम निर्माण झाला. तेव्हां म्हटलं नेहमीचा मार्ग अनुसरावा. आजूबाजूला नजर फिरविली तर एक 'ॲप्रोचेबल' बाई आढळली. तिच्याजवळ जाऊन शक्य तेवढा गंभीर चेहेरा करून आणि आर्त आवाज काढून मी म्हटलं, "Will you please excuse me जरा तिकीट काढून द्याल का?" माझी "आर्ती" संपताच तिनं झुरळ खाल्ल्यासारखा चेहेरा करून माझ्याकडं पाहिलं आणि

## दोन अधिक दोन चार : खरें कीं खोटें ?

दोन अधिक दोन यांची बेरीज चार नसून पांच होते ही गोष्ट अनेकांना आश्चर्यांत टाकील. अंकशास्त्र हें मूळ भारतीयांचें. त्यावरील ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतील 'अंकरत्नाकर' नांवाचा एक संस्कृत ग्रंथ नुकताच तंजावर येथें सांपडला आहे. त्यांत दोन अधिक दोन पांच असें स्वच्छ म्हटलेलें आहे. आणि दोन अधिक तीन = चार असें म्हटलेलें आहे. पण पुढें नेमाडपंत नांवाच्या एका अंकशास्त्रज्ञानें पूर्वींचा अंकगणनेचा क्रम एक, दोन, तीन, पांच, चार, सहा, असा होता तो बदलून एक, दोन, तीन, चार, पांच असा केला. ख्रिस्तपूर्व आठव्या शतकांत एका हाताचीं बोटें चारच गणीत. दोन हातांचीं बोटें चार आणि चार मिळून दहा, अशी बेरीज मांडली जाई; आणि माणसाचे हातपाय मिळून एकूण पांच असें लिहिलें जाई. 'अश्विन गोळाबेळा' येथील शिलालेखांत याचा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून दोन अधिक दोन पांच हें उघडच आहे.

## मुंबईला पाण्याचे फार हाल आहेत : खरें कीं खोटें ?

या सारखी खोटी गोष्ट कोणतीच नाहीं. मुंबई नगरपालिकेच्या कृपेनें मुंबईला पाण्याचे हाल मुळींच नाहींत; पाण्याची चांगली चंगळ आहे. हाल आहेत ते बिचाऱ्या मुंबईकरांचे. त्यांनाच या पाण्याचें दर्शन होत नाहीं. पण आपण अज्ञानी लोक नेहमीं म्हणत असतों कीं, 'मुंबईला पाण्याचे हाल आहेत.'

## आजार नसणें हें निरोगीपणाचें लक्षण आहे का ?

या विषयावर माझीं मतें ठाम आहेत. आजारीपणाचा अभाव हें निरोगीपणाचें लक्षण आहे ही आतांपर्यंत सर्वांची समजूत होती. परंतु दीर्घ संशोधनाअंतीं असें सिद्ध झालें आहे कीं, वारंवार आजारी पडणें हेंच खरें निरोगीपणाचें लक्षण आहे. ज्यांना कांहींहि आजार झालेला नाहीं किंवा होत

नाहीं. त्यांच्याबद्दल खात्री देतां येत नाहीं. आजार होणें म्हणजे आपल्या शरीरांतील टाकाऊ गोष्ट बाहेर टाकणें. चांगला पांच डिग्रीपर्यंत ताप आला कीं आपण घाबरतों. वास्तविक आपल्याला आनंद व्हायला पाहिजे. कारण ताप येणें हें निरोगीपणाचें लक्षण आहे. शरीरांतील उष्णता बाहेर टाकण्याचा तो एक नैसर्गिक मार्ग आहे. त्यावर औषध घेणें हा शुद्ध वेडेपणा आहे. हगवणीसारखा आजार म्हणजे आपल्या भावी निरोगी-पणाची ग्वाहीच. नैसर्गिक रीत्या जो आजार तुमच्या एरंडेलाची किंवा 'ब्रुकलॅक्स'ची बिनबोभाट, विनाखर्च कामगिरी करतो, त्याला डॉक्टरचें औषध घेऊन प्रतिबंध करणें हा वेडेपणा आहे, असें ख्यातनाम ब्रिटिश डॉक्टर मि. हॅगमन यांचें मत आहे. असा प्रतिबंध केला असतां, 'रेचको-न्मूमोटो' नांवाचा रोग होतो.

त्यामुळें वारंवार आजारी पडणें हेंच खरें जिवंत माणसाचें लक्षण आहे.

माझी ही मुलाखत फारच गाजली आणि लंडन युनिव्हर्सिटीच्या 'फॅकल्टी ऑफ मेडिसिन' तर्फे एम्. डी. च्या विद्यार्थ्यांसमोर 'डायरिया' या विषयावर मी प्रबंध वाचावा अशी सूचना आली. कारण माझी मुलाखत रविवारीं सकाळीं ध्वनिक्षेपित झाल्यामुळें लंडनमधील नागरिकांचें पोटाचें आरोग्य सुधारलें आणि त्याचाच परिणाम म्हणून हें आमंत्रण मला पाठविण्यांत आलें. पण तूर्त आयुर्वेदांतील 'सोनामुखी' या विषयावर एक प्रचंड ग्रंथ लिहिण्यांत मीं गर्क असल्यामुळें, तें निमंत्रण मी साभार नाकारलें.

माझ्या या विद्वत्तेच्या अवाढव्य पसाऱ्यामुळें मी कदाचित् महा-राष्ट्र साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद भूषविण्याची शक्यता आहे. पण परिषदेच्या या निवडणुकीच्या धुळवडींत न उतरतां, माझें व्यासंगावरचें लक्ष कमी होऊं न देण्यांतच मराठी वाङ्मयाचें कल्याण आहे, असा माझ्या

अनेक मित्रांचा सल्ला आहे. मराठी वाङ्मयांत माझ्या आगमनापूर्वी अंधार होता असें माझें प्रामाणिक मत असल्यामुळें आणि तें मांडण्यास मी मुळींच कचरणार नाहीं, आणि जमलेल्या क्षुल्लक साहित्यवृंदाला अर्थात् तें मुळींच रुचणार नाहीं, यामुळेंहि मी तें स्वीकारीन असा भरंवसा नाहीं.

— थोडक्यांत, माझ्या विद्वत्तेचें रहस्य हेंच कीं, व्यासंग!— जन्मभर व्यासंग! सतत, कायमचा व्यासंग! नहि ज्ञानेन सदृशं ... वगैरे वगैरे!

# स्त्रिया आणि सिनेमा

स्त्रिया आणि सिनेमा हा विषय अत्यंत नाजूक आणि अवघड आहे. एखादा जडजंबाल विचारप्रवर्तक लेख जगबुडतीचा चेहरा करून लिहिणं एकवेळ सोपं आहे. एखादी 'हृद्य नी आकर्षक' लघुकथा खरडणं, किंवा एखादा 'सखोल, आणि व्यासंगपूर्ण' टीकालेख भरडणं किंवा त्याहिपेक्षां आज-कालच्या सिनेमाच्या ऐन उमेदींत देशपांडेगिरी करून एखादी 'पटकथा' फडकावणं सोपं आहे. पण स्त्रिया आणि सिनेमा या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावर चार शब्द लिहिणं अगर बोलणं हें धोक्याचं आहे.

याचं कारण म्हणजे आमच्या 'घरांतून' त्याला कडक विरोध होण्याचा संभव आहे. हा विषय म्हणजे 'होम अफेअर्स' असल्यामुळें त्यासंबंधीं 'जरा जपून' 'पुढचं पाऊल' टाकलं पाहिजे. एक वेळ आम्ही सिनेमांत जावं. (आम्हांला एक्स्ट्रॉचं कामहि मिळविण्यासाठीं तपें घालवावीं लागतील ही आमच्या घरीं खात्रीच आहे) पण असल्या 'भलत्या' विषयावर लिहूं नये.

पण असल्या भलत्या विषयावर लिहिणं आवश्यक झालय. आजकाल बायका फार पिसाळल्या आहेत. अगदीं ढेंकणांसारख्या पिसाळल्या आहेत. संयुक्त महाराष्ट्र परिषद घ्या, एखाद्या ख्यातनाम टीकाकाराचं व्याख्यानसत्र करा किंवा जुन्या मुरलीधरांत आफळेबुवाला बोलवा, बायकांची प्रचंड गर्दी झालेली असते. पत्रकारी भाषेंत बोलायचं म्हणजे 'उदंड गर्दी' झालेली दिसते. आणि या ठिकाणीं होणारी ही गर्दी अगदीं निष्कारण असते. त्या विषयांत स्त्रियांना कांहीं कळतच नाहीं. पण आपल्या वेशभूषेचें प्रदर्शन

करण्यासाठीं, इतरांच्या ‘ प्रदर्शनाशीं ’ आपली तुलना करून पाहण्याच्या उदात्त हेतूनींच ही गर्दी झालेली असते. आजकाल बोरीबंदर स्टेशनवर आमच्यासारख्या सभ्य विवाहित पुरुषाचा हटकून ‘ विनयभंग ’ होत असतो !!

परवां मी सहज लक्ष्मी रोडवरून चकरा मारतां मारतां प्रभात टॉकीजपाशीं आलों. तिथं ‘ वंशाच्या दिव्या’ला लांबलचक क्यू लागला होता. आमची सौ. होतीच बरोबर. तिला तो ‘ क्यू ’ पाहून ‘ पुढचं पाऊल ’ पाहण्याची इच्छा झाली. मलाहि पुढचं पाऊल पाहण्याची इच्छा होतीच, पण आपलं एकट्यानें. अगदीं निवांतपणें. म्हटलं सौ. ला आर्यनांत संत रामदास दाखवूं. पण तिला कुठं पटतंय तें. तिनं ‘ संत रामदास ’ वरचं कुठल्यातरी नियतकालिकांत आलेलं एक परीक्षण माझ्या तोंडावर फेकलं आणि ‘ संत रामदास ’ सिनेमापेक्षां ‘ संत रामदास ’ साबण स्वस्त नी चांगला आहे. हीहि माहिती दिली. तिचं तें अगाध ज्ञान पाहून मला ‘ मुकाट ’ मिनव्हांच्या फॅमिली सर्कलच्या क्यूंत उभं राहावं लागलं.

आजकाल पुष्कळ सिनेमा साप्ताहिकें निघतात. त्यांच्या स्वस्ताईमुळें आणि रद्दीविषयक गुणांमुळें मी तीं घेतों. आमची सौ. तीं साप्ताहिकें एकनिष्ठपणें वाचते. त्यामुळं आजकालचे चित्रपट, त्यांचीं कथानकें, दुबळें दिग्दर्शन, भिकार ध्वनिमुद्रण इत्यादि जडजंबाळ शब्द वापरून ती माझ्याशीं गंभीर चर्चाहि करते. परवां तिनं मला ‘ स्नेकपिट ’ हा चित्रपट ‘ फिजीऑलॉ-जिकल ’ कसा आहे तें पटवून दिलं.

चित्रपटज्ञानाबाबत तिची प्रगति, तिचा गाढ व्यासंग वगैरे वगैरे पाहून परवां विजय टॉकीजांत आम्ही ‘ हाऊ ग्रीन वॉज माय व्हॅली ’ ला गेलों. त्या चित्रपटाला कॉलेजमधल्या पोरींची अगदीं ‘ उदंड ’ गर्दी झाली होती. पुढें मागें ‘ चित्रपट आणि समाज जीवन ’ या विषयावर एक जाडजूड ग्रंथ लिहायचा मी संकल्प केला असल्यामुळें त्या उदंड गर्दीचं मी प्रामाणिकपणें निरीक्षण करीत होतों. आमच्या पुढच्या रांगेतहि पाठीमागून बऱ्या दिसणाऱ्या तरुणी बसल्या होत्या त्यांचंही मी ‘ धावतं आलोचन ’

करीत होतों. त्यामुळं आमची ही अस्वस्थ झाली. व त्यामुळें मला तिनं चित्रपटहि नीट पाहूं दिला नाहीं. आणि शेवटीं असं मत व्यक्त केलं कीं 'अलख निरंजन' ला गेलों असतों तर बरं झालं असतं.

सिनेमा आणि सुंदर स्त्रिया यांचा संबंध सर्वविश्रुतच आहे. पण चित्रपटगृहांत सिनेमा प्रकाशित झाल्यानंतरहि सुंदर स्त्रियांशीं असलेला संबंध तुटत नाहीं. विजय टॉकीजमध्यें प्रदर्शित होणाऱ्या इंग्रजी चित्रपटांतील गर्दी तेथें येणाऱ्या तरुणींच्यावर अवलंबून असते. यासाठीं सिनेमागृहाच्या चालकांनीं सुंदर स्त्रियांना निम्म्या तिकिटांत प्रवेश दिला पाहिजे; तसंच कुरूप स्त्रियांना बंदी तरी केली पाहिजे किंवा वाढविलेले दर ठेवावेत. कधीकधीं आपण एकटेच एखाद्या चांगल्या सिनेमाला जावं, जरा उशीरा जावं, न्यूज रील सुरू झालीय, आणि आपल्या शेजारीं एखादी स्त्री (ती सुंदर असावी) बसलीय या समाधानानं आपण बसावं आणि इंटरव्हल होतांच त्या 'सुंदर' स्त्रीचं खरं दर्शन होतांच जी झीट आल्यासारखी अवस्था होते तिला कुठल्याच ट्रॅजेडींत तोड नसावी !

अलीकडे सिनेमाला गर्दी खूप असते. कुठला भिकार चित्रपट लागो, त्याला क्यू हा आहेच. पण ह्या 'क्यूं'त स्त्रियांना मात्र आघाडीवर जाऊन पटकन तिकीट मिळतं. आमच्या दादर बी. बी. स्टेशनवर तिकिटांसाठीं सभ्य पुरुषांची रांग लागलेली असतांना कुठल्याहि स्त्रीला बिनतक्रार तिकीट मिळतं. त्यामुळें लांबलचक क्यू असला कीं मीं जवळपास एखादी स्त्री आहे का पाहतों व तिला जरा 'रिक्वेस्ट' केली कीं ती देते तिकीट काढून ! पण ही 'प्रॅक्टीस' नेहमीं चालत नाहीं. एकदां मी असाच एका चित्रपटाला गेलों. आमची 'ही' सोबत नसल्यामुळें तिकिटांचा प्रॉब्लेम निर्माण झाला. तेव्हां म्हटलं नेहमीचा मार्ग अनुसरावा. आजूबाजूला नजर फिरविली तर एक 'ॲप्रोचेबल' बाई आढळली. तिच्याजवळ जाऊन शक्य तेवढा गंभीर चेहेरा करून आणि आर्त आवाज काढून मी म्हटलं, "Will you please excuse me जरा तिकीट काढून द्याल का?" माझी "आर्ती" संपताच तिनं झुरळ खाल्ल्यासारखा चेहेरा करून माझ्याकडं पाहिलं आणि

कांहीं बोलणार तोंच पाठीमागून तिचे 'दादाभाई नौरोजी' (तिच्या गळ्यांत 'लायसन्स' नसल्यामुळें तिघांपैकी कुणीतरी एक) धांवून आले, आणि मला 'ऑनरेबल रिट्रीट' घ्यावी लागली !!

यामुळें आर्थिक परिस्थितीच्या झंझावातांत वगैरे सांपडलेल्या मध्यमवर्गीय तरुणींनीं पुढील 'पार्ट टाईम जॉब' करावा. नाहींतरी आमच्यासारख्या तरुणांना तिकीट मिळण्याची फार अडचण पडते. त्यांनीं सिनेमागृहाच्या दरवाजावर हें तिकीट काढून देण्याचं काम करावं, आपलं योग्य तें कमिशन घ्यावं. पुण्यासारख्या शहरीं 'फॅमिली सर्कलचा' सुळसुळाट असल्यामुळें अतिउत्साही तरुणींनीं स्वतःच्या जबाबदारीवर त्याचाहि विचार करावा.

बायकोला सिनेमाला नेण्यामुळें होणारे जे हजारों तोटे आहेत त्यांत मुलांच्या ऊर्फ वंशाच्या दिव्यांचा त्रास हा महत्त्वाचा ! हा त्रास इतका होतो कीं ३ वर्षांखालील मुलांना सरकारनं सिनेमाला नेण्याची बंदीच केली पाहिजे. एखाद्या 'कौटुंबिक' चित्रपटांत एकदिलानें व एक सुरानें जें कांहीं चाललेलं असतं तें अगदीं असह्य असतं. आमची कन्या आहे वर्षाची ! त्यामुळें अजून ती सिनेमा टीकाकार झालेली नाहीं. मात्र 'सकाळ' मधील जाहिरातीचं पान आणि ती यांचा निकट संबंध आहे. सकाळ दैनिक हें त्या दृष्टीनें 'श्रेष्ठ' दैनिक आहे. या पलीकडे आमच्या कन्येचा आणि सिनेमाचा संबंध नाहीं. आतां मी सिनेमाला जाणं म्हणजे सौ. ला नेणं. आणि सौ. ला नेणं म्हणजे आमच्या कन्येला नेणं आणि आम्ही तिघांनीं जाणें म्हणजे सारा सत्यानाश !

दोन आठवड्यांपूर्वीं आम्ही गेलों वंशाच्या दिव्यास. कॉम्प्लीमेंटरी पासावर हल्लीं निर्बंध असल्यामुळें फॅमिलीचीं तिकीटं काढून बसावं लागलं. तिथं आजूबाजूला अनेक वंशाचे दिवे आणि दिवट्या [दुसऱ्याच्या त्या...] जमा झाल्या होत्या. त्यांचं 'मौलिक संगीत' चालू असल्यामुळें इकडे सुधीर फडकेनें काय करामत केली आहे, किंवा रंगूचा बाजार कसा भरलाय तें कळलंच नाहीं.

आमची कन्या सुरुवातीचीं पंधरा मिनिटं समोर चाललेल्या रुपेरी प्रकाराकडे डोळे वटारून पाहात होती. मग पिक्चर 'रॉट' वाटल्यामुळें, तिला त्याचा कंटाळा आला आणि आजूबाजूच्या समानशीलांप्रमाणें तिनंहि 'प्रकाशमान' व्हायला सुरुवात केली. अर्थात आमच्या कन्येचं 'ध्वनिमुद्रण' अगदीं 'पॉवरफुल' असल्यामुळें आजूबाजूचे लोक चमत्कारिक नजरेनें पाहूं लागले. 'शुक् शुक्' च्या आरोळ्या, 'स्वतः येतात नी पोरांना आणतात कशाला?' इत्यादि इत्यादि, रिमार्कस उमटूं लागले. मी जणूं आपण त्या गांवचाच नाहीं या आविर्भावांत बसलों. पण आमच्या 'हिला' कुठलं खपायला! तिनं मला चिमटे घ्यायला सुरुवात केली. मीहि कोरियन आघाडीवरचा आव आणला. पण शेवटीं तिनं ऐसा जबरदस्त चिमटा घेतला कीं रंगूचा बाजार अर्धवट टाकून कन्येला बाहेर घेऊन डोअरकीपरशीं प्रभात टॉकीजच्या पुरातनत्वाबाबत गंभीर चर्चा करावी लागली.

'हॅम्लेट आणि शेंगा' हें साहित्यशास्त्रांतील एक नवं वादाचं कुलंगडें स्त्रियांनीं निर्माण केलें आहे. 'हॅम्लेट आणि इतर अनेक–' या विषयाच्या मालगाडीवर अनेक रिकामटेकड्या विद्वानांनीं टकरा दिल्या. पण हें प्रमेय मौलिक आणि अभिजात आहे!

कांहीं दिवसांपूर्वीं ऑरोराला हॅम्लेट लागला होता. 'क्लासिकल चित्रपट' म्हणून आजूबाजूच्या कॉलेजांतील अनेक अभ्यासी तरुणी नटूनथटून आल्या होत्या. सिनेमा तिकडे चालू असतां सगळ्याजणी शेंगा खात होत्या. भुताच्या प्रसंगाच्या वेळीं 'अय्याई–कसं ग घेतलं ते' इत्यादि 'ॲप्रीसिएशन'— नंतर "ती कर्णिक कशी शिष्ट आहे, हें नवं पातळ कुठून छापून घेतलंस, ते इंग्रजीचे प्रोफेसर इतक्या घाईनें बोलतात कीं नोट्सही लिहून घेतां येत नाहींत" इत्यादि रोजच्या गंभीर विषयांचं रवंथ चालू होतं.

मी चित्रपट आटोपल्यावर ताडकन् बाहेर पडलों. कारण म्हटलें नंतरची ती 'चर्चा' नको —! बाहेर त्या शेंगावाल्याची गाडी रिकामी झाली होती.

हॅम्लेटचा आणि शेंगांचा असा निकट संबंध आहे!!

सिनेमाचा आणि स्त्रियांचा असा आहे निकट संबंध. 'पडद्याआड' आम्हांस माहिती नाहीं. पण पडद्याबाहेर हें असं आहे. एका अमेरिकन् संशोधकाच्या मतें अमेरिकन मुली सिनेमा पाहून बिघडल्या आहेत. चुंबन कसं घ्यावं, आलिंगन कसं द्यावं, इत्यादि प्रेम व्यवहारांतील महत्त्वाचे धडे त्या सिनेमापासून शिकत असतात. इतकंच काय पण तोंड लांबरुंद कसं करावं, नाक कोणत्या वेळीं कसं फेंदारावं, इन्ग्रीड बर्गमन प्रमाणें ओक्साबोक्सी कसं रडावं याचीहि त्या 'प्रॅक्टीस' करीत असतात.

परवां हें कुठंतरी वाचल्यापासून मला आमच्या सौ. चं भय वाटूं लागलंय. तिनं हट्ट धरलाय 'पुढचं पाऊल' पुन्हां पाहायचा! (कांहीं पठ्ठयांनीं म्हणे सत्तर वेळां पाहिला–इति जाहिरात) पण म्हटलं आमच्या भाबड्या बाईवर त्याचा असा कांहीं वाईट परिणाम झाल्यास सकाळचा चहा 'माझ्या जाळ्यांत गावला मासा' या दुडक्या चालीवरच हातीं यायचा आणि 'रंगू बाजारला जाते' या चालीवर वरात निघायची!!

तेव्हां नको हा सिनेमा...!

# जंगलीं साहित्य–संमेलन

'मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रा. ओरँग उटँग यांच्या अध्यक्षतेखालीं अखिल महाराष्ट्रीय जंगली साहित्य–संमेलन भरणार आहे' ही बातमी महाराष्ट्रांतील ख्यातनाम दैनिक 'रानसत्ता' या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्यावर जंगली साहित्यिकांत आणि इतर गांवठी मराठी साहित्यिकांत एकच खळबळ उडाली. या साहित्य–संमेलनाला नवकथाकार प्रा. रा. न. घुबड, जीर्णकथाकार प्रा. सरडे, ग्रामीण कथालेखक रानडुक्कर, नवकवि प्रा. विठा [वट] वाघूळ, जीर्णकवि प्रा. वसंतराव कोकिळ, महाराष्ट्रकोशकार प्रा. सुरवंट, बालवाङ्मयाच्या प्रणेत्या डॉ. चिऊताई चिवचिवे, ऑल इंडिया रेडियोंतील स्पोकनवर्ड–विभागाचे प्रमुख श्री. काकाकुवा आणि त्यांचे सहकारी श्री. कावळे, 'कलकलाट' या नामांकित बालमासिकाचे संपादक मिठू पोपट, कवियित्री मैना उडवे, ख्यातनाम टीकाकार प्रा. भो. भो. कुत्तरडे ही मंडळी हजर राहाणार असून, शिवाय महत्त्वाचें आकर्षण म्हणजे चित्रपटसृष्टींतील लोकप्रिय कलाकार श्री. घोडा पंजाबका बेटा, झिप्पी, युरोपचे लासी ही मंडळी हजर रहाणार आहेत, असेंहि जाहीर झालें.

संमेलनाची जागा महाबळेश्वरचें जंगल हीच ठरली. आजकाल थंड आणि उच्च वातावरणांत मानवी प्राण्यांच्या सभा यशस्वीरीत्या पार पडत असतांना आपण जेथले 'आदि-वासी' तेथें आपण हक्कानेंच अशा प्रकारचें संमेलन भरवूं शकतों, असा युक्तिवाद मांडला गेला. कांहीं सत्यप्रिय प्राण्यांनीं अशा संमेलनांत हवा खाण्याखेरीज कांहींच उपयुक्त कार्य होत नसल्यामुळे संमेलनाची जागा बदलावी अशी शिफारस केली. पण थंड हवेच्या सुखापेक्षां

आमचें कामावरच अधिक लक्ष आहे, असा युक्तिवाद सर्वमतानें मंजूर झाला.

संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदासाठीं महाबळेश्वरच्या मधुमक्षिका-केंद्राच्या संचालिका राणीसाहेब पंचपुष्पा यांनीं निवडणूक लढवली. पण ग्रामीण कथालेखक आणि सातारा जिल्ह्याचेच एक रहिवाशी श्री. रानडुक्कर यांची मुसंडी अधिक प्रभावी ठरल्यामुळें त्यांची स्वागताध्यक्ष म्हणून बहुमतानें निवडणूक झाली. वास्तविक पहातां रानडुक्कर हे मूळचेच बुजऱ्या स्वभावाचे. त्यांना सभेंत बोलण्याचा मुळींच सराव नव्हता. लेखन आणि शिकार यापलीकडे त्यांना जीवन माहीत नाहीं. सारें आयुष्य उंसाच्या फडांत घालवल्यामुळें उंसाखेरीज त्यांना कशांतच गोडी नव्हती. त्यांचे ‘ रानगुऱ्हाळ ’, ‘ जंगली जनावरं ’, हे कथासंग्रह त्यांतील अस्सल ग्रामीण जीवनदर्शनामुळें फारच गाजले होते. तथापि लाजाळू आणि भित्र्या स्वभावाचे रानडुक्कर हें स्वागताध्यक्षस्थान स्वीकारतील कीं काय याची शंकाच होती. पण बोरिवलीच्या जंगलांतील उपनगरवासी प्रा. रा. न. घुबड यांनीं त्यांना फारच आग्रह केल्यामुळें शेवटीं त्यांनीं हें स्वागताध्यक्षस्थान स्वीकारलें.

जंगली मराठींतील सुप्रसिद्ध विनोदी लेखक प्रा. ओरँग उटँग हे विधिपूर्वक अध्यक्षपदीं बसल्यावर महाबळेश्वरच्या ‘ विहंगवृंद ’ या शाळेंतील दोन चुणचुणीत मुली कु. टिटवी आणि कु. साळुंकी यांनीं आपल्या गोड आवाजांत स्वागतपर पद्य म्हणून उपस्थित साहित्यिकांना नादलुब्ध केलें.

त्यानंतर स्वागताध्यक्ष रानडुक्कर हे बोलावयास उभे राहिले.

ते आपल्या भाषणांत म्हणाले, “ या महाबळेश्वरच्या जंगलांत बऱ्याच वर्षांनंतर हें संमेलन भरत आहे, याबद्दल मला फारच आनंद होत आहे. [ या क्षणीं त्यांनीं एक मुसंडी मारली. ] आज मी व्यवसायपरत्वें पुण्यास पेशवे पार्कांत रहात असलों तरी माझें मन त्या पुण्याच्या हवेंत

मुळींच रमत नाहीं. माझा पिंड महाबळेश्वरच्या जंगलांतच पोसला गेला आणि तिथंच वाढला. रात्रीं उंसाच्या फडांत मुसंड्या मारण्यांत माझं सारं बालपण गेलं असल्यामुळं माझा ग्रामीण जीवनाचा परिचय अधिक निकटचा आहे. माझ्याकडून निर्माण झालेल्या अस्सल जंगली वाङ्मयाच्या निर्मितीचें रहस्य हें कीं, लेखकांनीं आपल्या झाडपाल्याशीं प्रामाणिक रहावें. गांवठी भाषेंत 'खाल्ल्या अन्नाला जागणें' असें जें म्हणतात तें पुरेपूर अमलांत आणलें तर उत्तम जंगली वाङ्मयाची सहज निर्मिति होईल.'

त्यानंतर अध्यक्ष प्रा. ओरँग उटँग भाषणास उभे राहिले. ते म्हणाले, "माझ्या अध्यक्षीय भाषणांत आपण विनोदाची वा वाङ्मयसमीक्षेची अपेक्षा करीत असाल तर तें व्यर्थ आहे. आज आपण माझ्या जंगलीपणाचा जो बहुमान केलात त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. मात्र आजवर मराठी वाङ्मयांत 'आधींच मर्कट तशांतहि', 'मर्कटचेष्टा' आदि वाक्प्रचारांनीं आमची जी बदनामी करण्यांत आली आहे, त्याचा मी तीव्र निषेध करतों. एका हिंदी जंगली सिनेमांत माझा शिष्य 'झिप्पी' याचेंच काम मुख्य विनोदी नटापेक्षां चांगलें झालें, असा अभिप्राय वृत्तपत्रांत आला होता, त्याकडे मी श्रोत्यांचें लक्ष वेधूं इच्छितों. आणि त्यामुळें अधिक वाङ्मयसमीक्षेचा आणि भाषणाचा प्रपंच न करतां मी कांहीं प्रात्यक्षिकेंच करून दाखवितों." असें म्हणून अध्यक्षांनीं सभास्थानींच चारपांच अपूर्व कोलांट्याउड्या मारून उपस्थितांस हंसविलें.

जंगली साहित्यसंमेलनांतील आणखी एक विशेष म्हणजे या संमेलनांतील खास 'जंगली लघुकथा शाखासंमेलन.' या जंगली कथासंमेलनाचें अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध टीकाकार श्री. भो. भो. कुत्तरडे यांनीं स्वीकारलें होतें. ते आपल्या भाषणांत म्हणाले,—"आजकाल आमचें जंगली वाङ्मय शहरी वळणावर जात आहे, ही खेदाची गोष्ट होय. आजकाल आमच्या कथावाङ्मयांत आमचा नरराज केसरी आपल्या आयाळीला तेलफणी करीत बसतो, आणि आमचे जंगली बंधुजन फॅशनच्या मागें लागले आहेत. लैंगिक जीवन हेंच ज्याचें सारसर्वस्व, अशा प्रकारचें विकृत चित्रण

आमच्या जंगली कथेंतून आढळून येत आहे. परवां एका जंगली कथेंत 'वाघोबा दांत घांशीत होता,' असा अवास्तव उल्लेख आढळला. अशा तऱ्हेच्या चित्रणानें ही मंडळी जंगली जनतेची दिशाभूल करीत आहेत. याचें एक कारण म्हणजे, आम्हां तरुण जंगली लेखकांची कमकुवत निरीक्षणशक्ति."

श्री. कुत्तरडे यांच्या भाषणानंतर डॉ. काकं, एम्. ए., पीएच्. डी. यांचें जंगली कथेची तरफदारी करणारें भाषण झालें. अलीकडेच त्यांना अमेरिकन स्कॉलर्शिप मिळून त्यांनीं जगभर प्रवास केला असल्यामुळें, त्यांच्या भाषणास विशेष महत्त्व होतें. ते आपल्या कर्कश्श आवाजांत म्हणाले, "जंगली साहित्यावर आत्तांच असा आक्षेप घेण्यांत आला कीं तें विकृत आहे. पण या व्यर्थ आरोपाचा नसता बाऊ करण्याचें कांहींच कारण नाहीं. त्या दृष्टीनें सरकारनें 'वाइल्ड लाइफ प्रिझर्व्हेशन ॲक्ट' जारी करून जनावरांचें रक्षण करण्याची जी उपाययोजना आंखली आहे तिकडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. (यांतील 'जनावरांकडे' या शब्दाबाबत सभामंडपांत फार मोठी खळबळ माजली.) आजची जंगलकथा म्हणजे जंगली अंतर्मनाचें जीवनसंशोधन. टार्झनची चित्रपटमाला किंवा आजकालच्या माणसांच्या वाङ्मयांतील शिकारकथा म्हणजे जंगलची शुद्ध बदनामी आहे. या मानवी शिकारकथाकारांच्या अनेक शिकारी मीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. यांतल्या एकालाहि बंदूक उचलतां येत नाहीं. घरासमोरील तुळशीवृन्दावनाखेरीज या बेट्यांना आयुष्यांत दुसरें झाड माहीत नाहीं. पण आपल्या कल्पनाशक्तीनें आम्हां निर्भय वनवासीयांची बदनामी करणाऱ्या असल्या कथा छापल्या जातात. म्हणजे जंगलाची शुद्ध बदनामी आहे. या दृष्टीनें, 'टार्झन' आणि 'जिंबो' सारखे बदनामीकारक चित्रपट काढणाऱ्या सिनेमावाल्यांनीं अस्सल जंगलकथा घ्यावी."

डॉ. काक यांच्यानंतर तर्कतीर्थ गिधाडस्वामी हे बोलायला उभे राहिले. गिधाडस्वामी हे पक्षी गटांतील असूनहि अस्सल मांसाहारी आणि चैनी वृत्तीचे. तथापि प्राचीन वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग फारच सूक्ष्म होता.

ते आपल्या भाषणांत म्हणाले, “जंगली कथेवरचें डॉ. काक यांचें भाषण त्यांच्यासारख्या उथळ व्यक्तीला साजेमेंच होतें. मला त्यांना एवढेंच सांगावयाचें आहे कीं, या संदर्भात मला रामायणासारख्या महान् काव्याला जन्म देणाऱ्या त्या क्रौंच पक्ष्याची आठवण येते. या प्राण्यानें (नव्हे, पक्ष्यानें) आपले प्राण खर्ची घालून एका मानवी महाकाव्याला जन्म दिला. हा प्रकार न स्मरतां आमचें प्रदर्शन करण्यासाठीं अनेक संग्रहालयांत आमच्या बांधवांना पिंजऱ्यांतून कोंडण्याचा अधमपणा मानवानें चालवला आहे. (‘शेम् शेम्’ च्या आरोळ्या) भारतसरकार तर आपल्या अध्यक्षांच्या जातींतील हजारों वीरपुरुषांचा अमेरिकेच्या पैशासाठीं—परकी चलनासाठीं—दरवर्षी बळी देत आहे. मानवी प्राण्यानें आपले जुने बांधव, —गाय, घोडा, पोपट, बैल वगैरे मंडळींना पूर्ण बाटवून आपलेंसें केलें आणि आपल्या सेवेला लावलें, याचा मला खेद होतो. या सर्व घटनांचे पडसाद आमच्या वाङ्मयांत उमटले पाहिजेत. आमच्या अंतर्मनांतील चारकावे विचित्र करण्यापेक्षां नव्या कथाकारांनीं आमच्या जिवावर उठलेल्या बंदुकधारी मानवाच्या मनांत डोकावून तेथें काय खळबळ चालली आहे, याचें चित्रण केलें तर तें आम्हांला अधिक हितकारी होईल.”

यानंतर मैना उडवे, मिठू पोपट, कवि विठा (वट) वधूळ, प्रा. वसंत कोकीळ, चंडोल आडगांवकर या मंडळीचें काव्यगायन झालें. या काव्य-गायनाला १६ मिरच्या, ४ डाळिंबें आणि २ पेरू एवढाच खर्च आला आणि त्या मानानें करमणूक बरीच झाली.

त्यानंतर जेवणाचा कार्यक्रम झाला. स्वागतसभेनें संमेलनप्रसंगीं मधुपानाचा कार्यक्रम ठेवलाच होता. पण जेवतांना शाकाहारी आणि बिनशाकाहारी असे भाग पाडले होते. डॉ. काक, गिधाड ही मंडळी सोडल्यास सर्व पक्षिगण शाकाहारी जेवणांत सामील होता. त्यांतल्या नवसांप्रदायिकांनीं मात्र मांसाहारावरच शेवटीं ताव मारला. अध्यक्षांनीं प्रत्येक वस्तूचा समाचार मुक्तपणें घेतला.

प्रा. वा. २१९५
3-2-67

रात्रौ बालवाङ्मयाच्या संशोधिका डॉ. चिऊताई चिवचिवे यांचें पाडसांसाठीं खास व्याख्यान झालें. संमेलनांत एक जंगली नाटकहि झालें. पण त्यांत सर्हा मानवी प्राण्यांची नक्कल असल्यामुळें प्रतिनिधींना विशेष मौज वाटली नाहीं. स्थानिक नट श्री. माकडे आणि गाढवे यांचीं कामें लोकांना फार आवडलीं.

या संमेलनाचें अतिविस्तृत असें समीक्षण 'रानसत्ता' या पत्रांत आलें होतें. त्यांत काव्यगायनावर सडकून टीका आली. साप्ताहिक 'हुल्लड' मध्यें मराठी लिपींत (भाषेंत नव्हे) मोठें 'रोचक' परीक्षण प्रसिद्ध झालें. एकंदर संमेलनासंबंधीं आपले विचार प्रकट करतांना 'हुल्लड' नें म्हटलें,—

"महाबळेश्वरच्या शीतल हवेंतील जंगली साहित्यसंमेलन अगदींच बेचव होतें. अध्यक्षांच्या भाषणांत इतर फापटपसारा बराच होता आणि जाणीवपूर्वक तळमळ नसल्यामुळें भाषण आकारहीन वाटलें. त्या मानानें प्रा. रानघुबड यांचें भाषण सर्वांत उजवें वाटावें. त्यात गवसणारा घन आशय इतरांच्या भाषणांत अभावानें आढळला. काव्यगायनाचा कार्यक्रम हृद्य आणि आकर्षक वठला. त्या मानानें इतर करमणूक सपक आणि फिकी वाटली. हेंच या संमेलनाचें यश आणि अपयश."

# कौटुंबिक आरिष्टें आणि आसवें

बायकोचा आजार ही आजकालच्या नवऱ्यांची कायमचीच डोकेदुखी होऊन बसली आहे. आणि इतकं असूनहि 'यांच्या स्वभावाला बाई औषधच नाहीं' असा शेरा मारायला बायका नेहमींच तयार असतात ही गोष्ट वेगळी.

त्यामुळें आज अनेक पीडित नवऱ्यांच्या सूचनेला मान देऊन बायकांच्या निरनिराळ्या घरगुती रोगांवरील कांहीं अचूक गुणकारी आणि सुलभ अशा घरगुती औषधांची थोडक्यांत माहिती देण्याचें मी योजिलें आहे. बायकोचा आजार हा आधुनिक संसारांतील अवघड कूट प्रश्न आहे. सकाळीं चांगलं स्वच्छ ऊन पडलेलं असतांना संध्याकाळीं अवचित सोसाट्याचा पाऊस यावा त्याप्रमाणें सकाळीं कचेरींत जातां प्रफुल्लित आणि नटव्या गुलाबकळीप्रमाणें, हंसतमुख असणारी पतिव्रता संध्याकाळीं ऑफिसांतून दमूनभागून आल्यावर आपण पहावं तर अंथरुणांत बसून मुसमुसतेय, शेजारीं मोसंब्यांची करंडी, औषधाच्या पांच सहा बाटल्या, पाव मण बर्फ, आदि रुग्णशुश्रुषेचीं आयुधें पडलेलीं. अशा भयंकर अवस्थेंत आपल्या प्रियतमेला पाहून आपण धांवाधांव–डॉक्टरांची पायधरणी, अमृतांजन चोळणें, भाताला टाकणें, इत्यादि कवायती केल्या नाहींत तर 'मी मेल्यें म्हणजे सुटाल—' 'असे निर्दय काळजाचे कसे!'–वगैरे भ्रममूलक बडबड सुरू होणार हें ठरल्यासारखंच असतं. वास्तविक त्या दिवशीं एखादं पिक्चर–रमीचा–डाव असा कांहींतरी खास पुरुषी कार्यक्रम आंखलेला असतांना बायकोनें असं आजाराचं निमित्त करून तडफडावं याचा आपल्याला राग येतो. आज जेवणाचं खोबरं होणार हें ठरल्यासारखं

असल्यामुळें आपली अवस्था त्या डेन्मार्कच्या राजपुत्राप्रमाणें ' जगूं कीं मरूं' अशी होते.

जुन्या जमान्यांत आजीबाईचा बटवा घरोघर असल्यामुळें तत्कालीन पुरुषमंडळींना घरगुती औषधोपचाराच्या माहितीची गरज नसे. पण सांप्रत बायकांच्या आजारावर कोणतेंहि ॲलोपाथी, युनानी अगर आयुर्वेदी औषध लागू पडत नसल्यामुळें त्यांना वेगळीच ' जंगली जडीबुट्टी ' ची गरज आहे. पुढील जडीबुट्टीचें प्रत्येक विवाहित पुरुषानें अवश्य पारायण करावें आणि वेळोवेळीं त्याचा उपयोग करावा अशी नम्र सूचना आहे.

## डोकेदुखी

बायकांची डोकेदुखी हा एक अजब रोग आहे, कुमारिका आणि अविवाहित तरुणी यांची डोकेदुखी म्हणजे एक गोड काव्य आहे. या डोकेदुखीवर ' इलाज ' करायला प्रत्येक पुरुष धडपडत असतो. पण स्वतःच्या बायकोची डोकेदुखी म्हणजे एक रौद्र कादंबरी आहे. या घरगुती आजारामुळें तमाम नवरे हैराण झालेले असतात. लग्ना-नंतर सुरुवातीचे सहा ते आठ महिने कोणत्याहि विवाहित स्त्रीला या रोगाची बाधा होत नाही. पण आठदहा महिन्यांनंतर बायकोचं डोकं इतकं हलकं झालेलं असतं कीं तें केव्हां, कुठें अन् कसं दुखेल हें कुणालाच सांगतां यायचं नाहीं. सकाळीं ९ वाजतां म्हणजे ऑफिसांत जायच्या वेळेला अगर संध्याकाळीं साडेसहा वाजतां म्हणजे आपण ऑफिसांतून परतायच्या वेळेला बायकांचं मेलं डोकं दुखूं लागतं. या डोकेदुखीवर बाम, अमृतांजन, सुंठ, ॲस्प्रो, हातोडा—कश्शा कश्शाचाच उपयोग नाहीं. अशा आजारांत बायकोचा चेहरा उतरतो—साधारण रुसल्यासारखा दिसतो. वस्त्रप्रावरणाचें भान राहात नाहीं. रोगी वेड्यासारखे चाळे करूं लागतो. उदाहरणार्थ चहांत साखरेऐवजीं मीठ. चहाच्या पुडीऐवजीं मसाला, बाथरूममध्यें आंघोळीनंतर बदलायला धोतराऐवजीं

पातळ असे प्रकार घडूं लागतात. रोगी फारच हळवा असल्यास ‘ मूक रुदन’ करूं लागतो—

अशा प्रसंगीं रोग्यास प्रेमानें थोपटावें. विसकटलेले केंस विंचरण्यासाठीं कंगवा आणून द्यावा—कॉटच्या बिछान्याखालीं इस्तरीसाठीं ठेवलेलं पातळ हातीं द्यावं—रोग्याचा चेहरा किंचित् प्रफुल्लित दिसूं लागला कीं जरा सावधगिरीनें गालावर टिचकी मारावी. अशा वेळीं एक हात तिच्या गालावर आणि दुसरा हात आपल्या कोटांतील आंतल्या खिशांत चामड्याच्या पाकिटाकडे न्यावा. रोग्याला साधारण २५ ते ३० रुपयांच्या नोटा पाहून बरें वाटूं लागेल. या नोटांची परिणति पातळांत होणार आहे हें रोग्याच्या कानांत सुचवावें. रोग्याचें मन हलकें झालें असल्यामुळें रोग्यास गडबड धांदल सोसत नाहीं. त्यामुळें पातळ आणण्यासाठीं रोग्याला नेण्यासाठीं वाऱ्यापासून बचाव – कारण त्यामुळें न्यूमोनिया होण्याचा संभव असल्यामुळें टॅक्सीसारखें वाहन करावें. आपण इतक्या क्रिया करीपर्यंत रोग्याचा आजार नष्ट होण्याच्या मार्गाला लागतो. रोग्याची मुद्रा पुनरपि प्रफुल्लित होऊं लागते. तो पदर सावरतो. विसकटलेलें कुंकू नीट करतो आणि खुदकन् हंसून गळ्यांत पडतो.

आजकाल वातावरण बिघडलेलें असल्यामुळें साधारण महिन्याच्या पहिल्या सप्ताहांतच बायकांना हा डोकेदुखीचा आजार महिन्यांतून एकदां होण्याचा दाट संभव आहे. करितां या रोगनिवारणार्थ दरमहा पंचवीस रुपये अवश्य राखून ठेवावे.

## डोकें तापणें

या स्त्रैण रोगाची आजकाल प्रत्येक नवऱ्याला फारच काळजी वाटते असें अनुभवांतीं आढळून आलें आहे. विवाहानंतर वर्षाच्या आंतच प्रत्येक विवाहित स्त्रीस या भयंकर रोगाची बाधा होते असें आढळलें. हा रोग रात्रौ ११ नंतर स्त्रीच्या शरीरावर आक्रमण करतो. नवरा ऑफिसांतून

परस्पर सिनेमाला गेला—'संध्याकाळीं सिनेमाला जाऊंया तयारी कर' असें सांगून गेला तो आलाच नाहीं—शनिवारीं रात्रीं रमी खेळायला बसला तो रविवारीं सकाळीं उठला—अशा क्षुद्र कारणांनीं विवाहित स्त्रियांना या भयंकर रोगाची बाधा होते. युरोप अमेरिकेंतील प्रयोगशाळांतून या रोगावर फारच मोठें संशोधन चाललें आहे पण अजूनपर्यंत परिणामकारक इंजेक्शन सांपडलेलें नाहीं. या रोगांत रोग्याची अवस्था फारच भयकारक होते. रोगाची बाधा झाल्याचें पहिलें लक्षण म्हणजे अविश्रांत बडबड. अशावेळीं आजूबाजूच्या लोकांनीं विशेषतः नवऱ्यांनीं रोग्याच्या तोंडीं लागण्याचा व्यर्थ प्रयत्न करण्याच्या भानगडींत पडूं नये. रोग्याचें भान नाहींसें होऊन घरांतील कांचपात्रांवर संक्रांत येते—रोग्याची केस फारच हाताबाहेर गेल्यास रोगी वेडेवांकडे हातवारे करायला लागतो. रोग्यास प्रत्यक्ष आपल्या मुलांचेंहि भान नाहींसें होऊन त्यांनाहि या हातवाऱ्यांचा प्रसाद मिळतो. रोगी फारच हळव्या मनाचा असल्यास मुसमुसत गॅलरींत, गच्चींत किंवा व्हरांड्यांत वाट पाहात उभा राहातो. मध्यरात्रीं दीड वाजेपर्यंत वाट पाहून 'आपल्या संसाराचा सत्यानाश' झाला अशा वेडगळ कल्पनेनें आरडा-ओरडा करूं लागतो. थोड्या वेळानें रोग्यास झोंप लागते व तो सकाळीं जागा होतो. जागा होऊन पाहातो तों आपल्या शेजारचें अंथरूण रिकामें. त्याबरोबर पूर्ववत काल संध्याकाळचीं लक्षणें दिसूं लागतात. साधारण नऊच्या सुमारास "आई—बाबा आले—" अशी मुलांची हांक कानीं येतांच रोगाचें उग्र स्वरूप प्रकट होतें. पुनरपि कांचपात्रांचा सत्यानाश—आणि परत तीच बडबडीची रेकॉर्ड सुरू होते.

अशा प्रसंगीं नवऱ्यानें काळजीनें चित्ताची शांति ढळूं देऊं नये. मुकाट घरांत येऊन एका मुलास कडेवर घ्यावें—'बाजारांत जाऊन काय आणूं' असें विचारावें. रोगी अशा प्रश्नांना उत्तरें देणारच नाहीं याची खात्री बाळगावी. मुकाट बाजारांत जाऊन भाजीपाला–दोन आण्याचे पेरू–शेंगा या वस्तु आणाव्या. नंतर शांतचित्तानें मोरी साफ करावी. फळीवरची घाण साफ करावी, कॉटमधील ढेंकूण मोजून मारावे आणि मुलांचा

गणितांचा अभ्यास घेत बसावं. आपल्यांतील ही आश्चर्यजनक सुधारणा पाहून हलुहळू रोग्याच्याहि प्रकृतींत सुधारणा होते–आणि संध्याकाळपर्यंत रोगी पूर्ववत खडखडीत बरा होतो. मात्र अशा वेळीं रोग्याला पेशवेपार्कांत फिरायला नेण्याखेरीज रोगी पूर्ण सुधारणें शक्य नाहीं हें ध्यानीं ठेवावें.

## पोटदुखी

स्त्रियांच्या आजारांत पोटदुखीला फारच महत्त्व आहे. पुरुषांच्या 'मूर्खपणामुळें' लग्नानंतर कांहीं महिन्यांनीं ही पोटदुखी उमटायचीच. या वर्षा दीडवर्षांतून एकदा उमटणाऱ्या अल्पकाल पोटदुखीपेक्षां बायकांची दैनंदिन पोटदुखी पुरुषांना फारच हैराण करते. शेजारपाजारच्या घरांतील जंतूमुळें हा रोग स्त्रियांना नेहमीं होतो असें शास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. फार पिकलेलीं फळें, शिळ्या भाज्या यामुळें टॉयफाईड, कॉलरा सारखे रोग पसरतात. तर शेजारीपाजारीं सोन्याच्या बांगड्या, मोत्याचीं कुडीं, बनारसी शालू, मर्फी रेडिओ, स्टीलचें कपाट, आंब्याची करंडी इत्यादि वस्तु आणल्या कीं आपल्या घरीं वाईट जंतूंचा संचार होऊन पोटदुखी उद्‌भवली म्हणून समजाच. अशावेळीं 'रोगोत्पादक वस्तु' घरांत आणणाऱ्या शेजाऱ्यांपासून सावध राहावें. कांहीं अडाणी स्त्रियांना असल्या रोगकारक वस्तु घेऊन आपल्या शेजारणींना दाखविण्याची फार वाईट संवय असते. विशेषतः सोन्याचीं कुडीं, सोन्याच्या बांगड्या आणि स्टीलचें कपाट या धातुजन्य वस्तु फारच संसर्गकारक आहेत. रोगाची तात्काळ बाधा करतात. रोगी अस्वस्थ होतो. निंदा करूं लागतो. "आमचें नशीब खोटं त्याला काय करणार?" असें तावडतोब जळफळतो. त्याला कांहीं सुचत ना हीं. 'गडे आपणहि तसलं कपाट घेऊं या.' असा प्रेमळ आग्रह करूं लागतो. कांट्यानें कांटा काढावा या न्यायानें पोटदुखीच्या या रोगाला होमिओपाथिक पद्धतीनें औषधोपचार करावा. हा रोग चटकन् दुरुस्त होण्यास पांचशें ते सहाशें रुपयांचा सहज भुर्दंड पडेल. अशा वेळीं रोग्यावर फारच प्रीति असल्यास आणि अंमळ आपल्यालाहि थोडी बाधा झाली असल्यास पांचशें रुपये कर्ज काढून अवश्य स्टीलचें कपाट आणावें. रोगी तात्काळ दुरुस्त होईल. मात्र अशी चटक

लागल्यामुळें रोगजंतूंचा वारंवार प्रादुर्भाव होणें शक्य आहे त्यामुळें अशा प्रकारचा घातक उपचार करण्यापूर्वी काळजी घ्यावी. रोग प्रथमावस्थेंत असला आणि रोगी अशक्त आणि आज्ञाधारक प्रकृतीचा असला तर "आपण पुढल्या एक तारखेस घेऊंया" या पोकळ आणि प्रेमळ आश्वासनावरच रोगी दुरुस्त होईल. मात्र हें औषध वारंवार वापरलें तर रोगजंतु प्रतिकार-क्षम होऊन एखाद दिवशीं रोगाचा भडका होण्याचा संभव असतो.

## डोकें फिरणं

अल्लड अशा बायकांना हा रोग फार लवकर होतो. कुठलीहि खटपट न करतां छानदार नवरा मिळाला तर कोणत्याही स्त्रीचं चटकन डोकं फिरतं. लग्नानंतर 'नवऱ्याचं प्रमोशन' हें एक किंचित् काळ डोकं फिरण्याला निमित्त होतं. पण रोगाचा हा प्रकार बराच सुसह्य आहे. या रोगाची आणखी एक उलट बाजू आहे आणि ती दैनंदिन संसारांत वारंवार उद्भवते. नवरा ऑफिसांतील कारकून बाईशीं फार बोलतो, हें कानांवर आलं किंवा शेजारच्या मालतीबाईशीं उगाच कांहीं कारण काढून गप्पा मारतो किंवा बायकोच्या माहेरची निंदा करतो—एवढ्या अगदीं क्षुल्लक गोष्टींनीं आजकाल बायकोचं डोकं केव्हांहि फिरतं. घरांत आपण मित्रांना बोलावून पत्त्याचा डाव मांडला आणि बायकोला सात कप चहा तीन वेळा करण्याची आज्ञा फरमावली, न सांगतां रात्रीं ९ वाजतां एखादा पाहुणा जेवायला आणला—सिनेमा ऐन रंगांत आला असतांना आपलं लाडकं अपत्य बोंबलूं लागलं कीं कोणत्याहि समंजस, विचारी आणि करुण स्त्रीला या रोगाची बाधा चटकन होते.

कोणत्याहि रोगाबाबतची बायकांची प्रतिक्रिया तोंडावाटें व्यक्त होते. त्यामुळें जसजसं डोकं फिरूं लागतं तसतसं तोंडहि फिरायला लागतं. सुरुवातीला नवऱ्याचा संपूर्ण संगीत उद्धार होतो आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून माहेरीं जाण्याची धमकी दिली जाते. रोगाच्या प्रथमावस्थेंत फक्त अशा धमक्याच दिल्या जातात. प्रत्यक्ष कृति कधींच होत नाहीं हें लक्षांत ठेवावें.

या रोगावर अचूक असें औषध सांपडलेलें नाहीं: वाटल्यास रामरक्षा म्हणून पहावी. अगर गीतेचा दुसरा अध्याय वाचावा. धाडशी नवऱ्यांनीं रोगाचा जोर जास्तच वाढल्यास सरळ कोटटोपी घालून चौपाटीवर अगर अक्षरशः 'माणसांत' हिंडायला जावं. 'मी हिमालयांत जातों' 'बैरागी होतों' अशा धमक्या कांहीं नवरे देतात. पण या जालीम मात्रा नव्हेत हें लक्षांत ठेवावें. कारण आपल्याला नकाशांत सुद्धां हिमालय दाखवितां येणार नाहीं अशी रोग्याची पूर्ण खात्री असते.

## कंबर धरणें

हा एक अति विचित्र रोग आहे. रोगांतील नवकाव्यच म्हणा ना! 'कंबर धरते' म्हणजे काय होतें हें अजून कोणत्याच डॉक्टरला कळलेलें नाहीं. बायकांच्या लचकण्या मुरडण्याच्या हौसेमुळें कंबर धरण्याचा रोग होत असावा. 'कृशकटी' च्या हव्यासामुळेंहि कंबर मोडण्याची पाळी येत असावी असा कांहीं शास्त्रज्ञांचा कयास आहे. यांत रोग्याला कामाचा भारी कंटाळा येतो. स्वयंपाक करण्याची फारशी आवड नसलेल्या उनाड महिलांच्या कंबरा नेहमीं लचकतात असा जाणकारांचा अनुभव.

अशा प्रसंगी पूर्वींच्या काळीं कांहीं तामसी पण शूर पुरुषोत्तम चौदाव्या रत्नाचा यथेच्छ उपयोग करीत. आपल्या पूर्वजांचा या औषधावर फारच विश्वास होता. स्त्रियांचीं सारीं दुखणीं या जालीम औषधानें चटकन पळ काढतात अशी त्यांची बालंबाल खात्री होती. पण आज तशा धाडशी पुरुषांची संख्या रोडावली असल्यामुळें या जालीम मात्रेचा उपयोग करणारे पुरुष सांप्रत दुर्मिळ झाले आहेत.

तथापि कामगार वर्गांत आणि शेतकरी बंधूंत आमच्या पूर्वजांचें पाणी झळकत आहे. याचा आनंद होतो. या रोगापासून बचाव करण्यासाठीं पुरुषांनीं स्वयंपाक करण्याची कला शिकून घेणें हें उत्तम. मात्र ही कला आपल्याला अवगत आहे. हें रोग्याला कळलें तर वारंवार या रोगाचा

प्रादुर्भाव होण्याचा संभव आहे. विशेषतः अशक्त आणि दुबळ्या प्रकृतीच्या, नरम आणि गुळगुळीत स्वभावाच्या पुरुषांच्या स्त्रियांना हा रोग चटकन होतो. या रोगावर परिणामकारक औषध नाहीं.

स्त्रियांच्या रोगांतील कांहीं महत्त्वाच्या रोगांची चिकित्सा या ठिकाणीं केली आहे. विशेषतः दहाबारा वर्षें संसार केल्यावर यांतील बरेचसे रोग आपल्या अंगवळणीं पडतात. आणि नंतर त्याचें कांहींच वाटेनासें होतें. उलट असे रोग झाले नाहींत तर कसेसें वाटूं लागतें. पण विवाहाच्या प्रारंभींच्या काळांत तरुण पुरुष असल्या रोगप्रादुर्भावामुळें बावरतो, घाबरतो. आपल्या सोन्यासारख्या संसारांत हें काय विघ्न आलें यामुळें तो हैराण होतो. पण त्यामुळें घाबरून जाण्याचें कारण नाहीं. उलट नेटानें रोगप्रतिबंधक औषधाचा मारा केला पाहिजे. रंकापासून रावापर्यंत, शिपायापासून साहेबा-पर्यंत सर्वांना हे रोग छळत असतात. या रोगाशिवाय हृदयविकार, डोळे फिरणें, डोळे मोडणें, छाती धडधडणें, पोटांत गोळा येणें इत्यादि अनेक रोग आहेत. त्या सर्वांचें स्थलाभावीं वर्णन करणें अशक्य आहे तस्मात् होतकरू वक्त्यांसाठीं एक ‘ घरगुती औषधसंग्रह ’ मी प्रसिद्ध करणार आहें. लग्नप्रसंगीं भेट देण्यास या पुस्तकाचा खासच उपयोग होईल याची खात्री आहे.

# स्त्रिया आणि वाचन

परवां मी एक गंमतीदार बातमी वाचली—
—' भारतांत म्हणे माणसाच्या आठपट उंदीर आहेत. '

यावर भाष्य करतांना एक मंत्री महाशय म्हणाले, " माझ्याहि घरांत आठपट उंदीर आहेत. " ही बातमी मी बायकोला वाचून दाखविली आणि म्हटलं " आपण म्युनिसिपालिटीचा एक सांपळा आणूयां. " माझ्या सूचनेचं स्वागत होत नाहीं असं पाहून मी आणखी एक विधायक सूचना मांडली. " आपण मांजर पाळूंया. "

मांजराचं नांव काढल्यावर ती चवताळली. अगदीं फिसकारून म्हणाली " कशाला हवीय मांजरांची अडगळ ? "

" अग, त्या उंदिरांनीं माझ्या पुस्तकांचा सत्यानाश चालवला आहे. " मी म्हटलं.

पुस्तकं म्हटल्यावर तिची तळपायाची आग मस्तकाला गेली. ती चिडून म्हणाली. " होऊं दे त्या [मेल्या] पुस्तकांचा सत्यानाश. घरांत बसायला जागा नाहीं, नुसतं रद्दीचं दुकान झालंय. "

पुस्तकांची तुलना रद्दीशीं करण्याची माझ्या बायकोची कल्पना मंजूर नसल्यामुळें मी हें मूषकपुराण आवरतं घेतलं. पुस्तकाचं नांव काढलं कीं साऱ्याच बायका अशा चवताळतात कीं काय नकळे. अनेक पुस्तकांचं अंतरंग आणि बहिरंग स्त्रियांशिवायं पूर्ण होत नसलं तरी स्त्रियांचं अंतरंग काबिज करण्याचं तंत्र बिचाऱ्या पुस्तकांना साधलेलं नाहीं हें खरंच.

आमच्या घरीं पुस्तकांना तोटा नाहीं तसा वर्तमानपत्रांना आणि मासिकांना तोटा नाहीं, रद्दीच्या दृष्टीनें माझ्या बायकोला कोणत्याहि खास अंकाबद्दल प्रेम वाटतं. मराठींत आजकाल वजनदार मासिकच नाहीं अशी तिची रोजचीच तक्रार आहे. त्या मानानें मराठी वर्तमानपत्रापेक्षां टाईम्स सारखीं भार-दस्त वर्तमानपत्रें तिला फार आवडतात. टाईम्सच्या या वृत्त-विषयक अथवा 'तौलनिक' मोठेपणामुळें ती मुलांना टाईम्सला हात लावायला देत नाहीं. टाईम्सचे एकावर एक ठेवलेले महिन्याचे अंक पाहून तिचं भान हरपतं. त्यामानानें मराठी वृत्तपत्रांचा दर्जा सर्वच दृष्ट्या 'हलक्या' प्रतीचा आहे. असें तिचें अनुभवजन्य मत झालें आहे. कांहीं झालं तरी मराठी वृत्तपत्रें इंग्रजी वृत्तपत्राशीं बरोबरी करूं शकणारच नाहींत अशी तिची बालंबाल खात्री आहे. निरनिराळ्या वकिलातीं मार्फत येणारे 'वार्ताहर', प्रेसनोटस् या वाङ्मयाबद्दलहि तिला मुळींच अनादर नाहीं. या साहित्याबरोबर येणाऱ्या पिशव्या अनेक वेळां बाजारहाटाला उपयोगी पडतात असें पाहून अमेरिका आणि रशिया या राष्ट्रांच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल तिचें फार अनुकूल मत झालें आहे.

मराठी वृत्तपत्रें 'हलक्या' प्रतींचीं असलीं तरी त्यांतील अग्रलेखादि गंभीर मजकुराबाबत तिचें फार प्रतिकूल मत आहे. वृत्तपत्रांत मजकुरापेक्षां जाहिरातीच अधिक वाचनीय असतात आणि अधिक वाङ्मयीन असतात असा तिचा दावा आहे. विशेषतः सिनेमाच्या जाहिरातीवर तिचें अधिक प्रेम आहे. नवरा दमूनभागून घरीं परत आला कीं त्याला सिनेमाच्या जाहिराती वाचून दाखविण्याचा तिचा नेहमींचाच क्रम आहे. नटनटींची नामावली ऐकून माझं डोकं उठलं कीं मी नक्कीच सिनेमाला यायला कबूली देणार असा तिचा यशस्वी तर्क असतो. तो सिनेमा परवडला पण जाहिराती आवर, अशी विनवणी करीत दिलीपकुमार अणि मधुबाला यांच्या दर्शनाला मला जावंच लागतं.

बायकांना वाचायचा कंटाळा असला तरी आपल्याला खूप वाचायची आवड आहे. असं प्रदर्शन करायची हौस असते कीं काय नकळे. कारण

आमच्या चाळींतल्या सगळ्या बायका आमच्या घरांतले महिन्यांचे अंक हातोहात पळवीत असतात. मात्र परत येतांना त्यांचीं कव्हरं फाटलेलीं असतात. अणि तेलहळदीचे डाग आणि हिंगमिऱ्याची फोडणी घेऊन हे अंक घरीं साभार परत येतात. सकाळीं ऑफिसांत जाणाऱ्या प्रत्येक विदुषीकडे पर्स-प्रमाणें एक मराठी मासिक असलंच पाहिजे. असा एक नवा संकेत आजकाल रूढ होऊं लागला आहे. ज्या भगिनींना मासिकं चाळगायची आवड नाहीं त्या भगिनी लायब्ररीचं एखादं पुस्तक चाळगत असतात.

अलीकडे लग्नाच्या प्रसंगीं पुस्तकें भेट देण्याची टूम निघाली आहे. काटकसरीच्या आणि वाङ्मयप्रसाराच्या दृष्टीनें पुस्तकाची भेट देणें आमच्या बायकोला नेहमींच पसंत असतें. मात्र यांत थोडासा पक्षपात केल्याशिवाय तिला राहावत नाहीं. तिच्या माहेरच्या माणसाचं कुणाचं तरी लग्न असलं तर स्टेनलेस स्टीलचं वजनदार भांडं हा अहेर आणि माझ्या माहेरचं असलं अगर माझा एखादा साहित्यिकमित्र असला कीं त्याला दीड रुपयापर्यंत एखादं पुस्तक. अहेराच्या या संदर्भात तिला कदंबरीसारख्या थिल्लर आणि फार किंमतीच्या वाङ्मयावर तिचा फार कटाक्ष आहे. त्यापेक्षां एखादा नवकवि चक्क दीड रुपयांत खरेदी करतां येतो आणि अहेरप्रसंगीं आपल्या उच्च काव्याभिरुचीची विनासायास जाहिरात होते. यामुळें मराठींतील नवकाव्याच्या एकूण श्रेष्ठ दर्जाबद्दल तिचें फार चांगलें मत झालें आहे.

मला वाटतं अघळपघळ वाङ्मयापेक्षां बायकांना सूत्रबद्ध वाङ्मय फार आवडत असावं. कारण लांबलचक कादंबऱ्यांपेक्षां छोट्या लघुकथांवर त्यांचा अधिक जीव असतो. मात्र याला अपवाद नवऱ्याचीं पत्रं. आपण माहेरीं गेल्यावर नवऱ्यानें दर दिवसाआड एक पत्र पाठवावं अशी प्रत्येक बायकोची इच्छा असते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपण काय काय केलं, फडताळावरच्या डब्यांतील चिवडा संपवला कीं नाहीं, दूधवाल्याला दूध अदपावच दे म्हणून सांगितलं कीं नाहीं, पाववाल्याचा पाव बंद केला कीं नाहीं, ऑफिसांत जातांना दाराखिडक्यांच्या कड्या नीट लावल्या कीं नाहीं.

या सर्वांचं उत्तर त्यांत रोज हवं असतं. मात्र आपलं स्वतःचं पत्र नेहमींच घाईत लिहिल्यामुळें मोजकंच असतं आणि त्याला एक ताजा कलम असा कीं वाईट अक्षरास हंसूं नये.

मला वाटतं बायकांना वाचनाचं वाकडं असण्याचं मुख्य कारण म्हणजे वाचनापेक्षां बडबडण्याचीच त्यांना फार आवड असावी. आमच्या घराशेजारीं एक मुलगी अलीकडे व्हरांड्यांत अभ्यासाला बसते. तिच्याबरोबर अभ्यासाला म्हणून तिची एक मैत्रिणही येते. आणि या दोघीजणी अभ्यासाऐवजीं सारख्या बोलत बसतात. बायकांच्या बडबडण्याचा उत्कर्ष लग्नसमारंभांत, मुंजीच्या वेळीं, ट्रीपच्या वेळीं, अगर मुलींच्या शाळेंत नेहमीं आढळतो. मासळीबाजाराचा लौकिक आरडाओरड्याबाबत जो पसरला आहे. याचं कारण तिथं कोळणीचीच दादागिरी जास्त असते म्हणून. त्यामुळें बायकांच्या तोंडाला कुलूप घालण्याची युक्ति पुरुषाजवळ नसती तर जगांत फार अनर्थ ओढवला असता.

... ग्रंथ संग्रह
अनुक्रमांक २००२५
वा. ना. २१९५
-८-६१

# घरगुती अर्थशास्त्र

परवां बायकोचं अन् माझं मोठं कडाक्याचं भांडण झालं. भांडणाचा विषय अगदींच क्षुल्लक होता. त्या दिवशीं मी कधीं नव्हतों तो भाजीमार्केटांत गेलों. आणि बऱ्याच दिवसांचा सूड म्हणून चांगली सहा रत्तल भाजी, पेरू, शेंगा, एक भलं मोठं कलिंगड, शेवग्याच्या शेंगांच्या पांच जुड्या आणि दोन रत्तल कच्च्या कैऱ्या हें सामान 'पाटीवालीच्या' डोकीवर देऊन मी घरीं आलों तर दारांत पाऊल टाकतांच रौद्रावतार !

"साधी रत्तलभर भाजी आणायला सांगितली तर गांव खरेदी करून आले–अशानें संसार कसा होणार ?– काडीइतकंहि व्यवहारज्ञान नाहीं !"

बायकोचं हें साभिनय व्याख्यान ऐकून घेतल्याखेरीज आजकाल कोणत्याच पुरुषाला गत्यंतर नसतें. कारण बायकांची जात ही भारी काटकसरी असा खोटा प्रवाद कुणीतरी पसरवलाय ना ?

मला वाटतं बायकांना काटकसरी म्हणणं म्हणजे काटकसर या शब्दाची मस्करी आहे. आम्हा पुरुषांच्या संसाराचे तीनतेरा वाजविणाऱ्या या स्त्रीजातीला काटकसरी हा किताब देऊन कांहीं चोंबड्या पुरुषांनीं बायकांना उधळेपणाची जणूं सनदच बहाल केली आहे. आजकाल नवऱ्यापेक्षां नवऱ्याच्या पगारावर बायकांचा जास्त डोळा असतो. या पगाराच्या दिवशीं बायका मोठ्या प्रेमांत येतात–लाडांत येतात, नखरा करतात. आपल्या सर्व गुन्ह्यांना माफी देतात. उत्तम गाळलेला चहा, बटाटेपोह्यांसह येतो, त्या दिवशीं आमटी उत्कृष्ट होते, भाजींत मीठ बेताचंच

पडतं, भाताचा गिच्च गोळा झालेला नसतो आणि कांचेच्या ग्लासांतून थंड ताक आणि वर सौभाग्यवतीनें आपल्या हातानें तयार केलेला विडा.

संसाराच्या सुरुवातीच्या रम्य उषःकालाची आठवण देणारा हा दिवस अलीकडे महिन्यांतून एकदांच पहिल्या तारखेस अवतीर्ण होतो. आणि त्यानंतर मात्र सारे दिवस– "भयाण अंधाराचे–रौद्र वादळाचे !"

जगांतल्या प्रत्येक बायकोची अशी प्रामाणिक समजूत कीं आपण महान् काटकसरी आहोंत. आपलं वागणं कसं हात राखून असतं येऊन जाऊन सारा बुडवेपणा यांच्याकडेच. हे जरा आटोक्यांत असते–त्यांचं पानतंबाखूचं, सिगारेटीचं आणि रमी खेळण्याचं वाईट व्यसन त्यांना नसतं, तर आपला संसार सोन्याहून पिवळा झाला असता. असं प्रत्येक बायकोला प्रामाणिकपणें वाटत असतं.

दर महिन्याला आपण अंदाजपत्रकाप्रमाणें खर्च करावयाचा असं आमची बायको ठरविते. अगदीं भारत सरकारच्या बजेटप्रमाणें एका वहीवर सर्व खर्चांचीं कोष्टकें तयार; पण आतांपर्यंत या कोष्टकांप्रमाणें एकदांहि आमची मंडळी वागलेली नाहीं. करमणुकीवर आपण [ आपण म्हणजे मी ] फारच खर्च करतों असं म्हणून ती दर महिन्यास पांच रुपये मंजूर करते. पण तिच्या उच्च तत्त्वामुळें या पांचाचे पंचवीस होऊन माझी पांचावर धारण बसेत. कारण तिचें उच्च तत्त्व म्हणजे उच्च वर्गांतच बसून सिनेमा पाहावयाचा. माझ्या दुर्दैवानें सगळीं थेटरं आमच्या घरापासून फार लांब असून त्यामुळें टॅक्सीपायीं माझा सत्यानाश. त्यानंतर "मेलं जवळ बसल्यानं डोळे दुखतात बाई" या सबबीखालीं बालकनीचा भुर्दंड. शिवाय हल्लीं सगळे सिनेमा हाऊस फुल्ल होत असल्यामुळं केव्हां आमची या थेटरापासून त्या थेटरापर्यंत अशी वरात निघतेच.

आतां खर्चाचा दुसरा आयटेम म्हणजे कपडे. कपडा या विषयांत आपल्या नवऱ्याला कांहींच कळत नाहीं आणि पातळें व ब्लाऊज पिसीस

या नाजूक बाबींत त्याला मुळींच डोकं नाहीं असं सर्व बायकांचं लाडकं मत असतं. आतां पंचवीस रुपयांच्या ऐवजीं वीस रुपयांचं पातळ घेऊंया अशी मी काटकसरीची सूचना केली–तर "अलीकडे मला मेलीला असलं कांहीं घ्यायला कुठं सवड होतेय" असं म्हणून पंचविसाचे तीस होतात. अलीकडे हे दुकानदारहि महाभयंकर चावट आणि आगाऊ झाले आहेत. ते या बायकांना भलतंच उत्तेजन देतात. बाईसाहेब ताईसाहेब–अशा पदव्यांचा मारा करून तो बायकांना साफ बनवतो आणि आम्हा नवऱ्यांच्या पगाराचं वाटोळं करतो.

यामुळं या कपड्यांपायीं आमचं अंदाजपत्रक कायमचं तुटीच्या अर्थसंकल्पावर आधारावं लागतं. अर्थात् सासऱ्याकडच्या परकी चलनाचा पुरवठा न होता तर आम्ही केव्हांच कोलमडलों असतों हें निर्विवाद !

या नैमित्तिक भानगडींत केव्हां केव्हां फार तापदायक 'आयटेम' अचानक आ करून उभे राहातात. त्यांतला एक तापदायक भाग म्हणजे सौभाग्यवतीचें मंगळसूत्र. या मंगळसूत्राच्या अलीकडे रोज नवनवीन आवृत्त्या निघत असतात. याशिवाय –"माझ्या बांगड्या झिजवट वाटतात नाहीं–किंवा परवां सुलभावहिनींनीं छान बऱ्या नव्या तासाच्या घसघशीत बांगड्या केल्या आहेत." अशी पुस्ती जोडून परत आमच्या घरगुती अर्थशास्त्राचें दिवाळें वाजायला लागतें.

मासिक खरेदींतील महत्त्वाचा भाग म्हणजे पावडर, तेलें, स्नो आणि मंडळी. आपण फार सुंदर आहोंत (आपल्या नवऱ्यापेक्षां खात्रीनें) अशी प्रत्येक बायकोची भोळीभाबडी समजूत असते. हें सौंदर्य टिकविण्यासाठीं आणि वाढविण्यासाठीं सौंदर्यप्रसाधनाचा हा पसारा हवाच ! पण यांतहि सूक्ष्म भेदाभेद आहेतच. पोरांना घरभर करायला म्हणून हिमालय बोके –तर आपल्याला ऐंजल फेस. तेलाची बाटली आणल्यावर आठवड्याच्या आंत फुटलीच पाहिजे. शिवाय माझा मुलगा तैलबुद्धीचा व्हावा म्हणून त्याच्या डोकीवर थापण्यासाठीं अस्सल खोबरेल तेल शिवाय निराळेंच.

याशिवाय आमच्याकडे महिन्याला किती डझन डोकीच्या पिना आणि किती ग्रोस केंसांचे आंकडे याची आंकडेमोड करायला एक अकाऊंटंट नेमावा लागेल.

खर्चांच्या या झपाट्यामुळें आमचें घरगुती अर्थशास्त्र केव्हांच कोलमडतें आणि एकाच आठवड्यांत आमचा स्त्रीअर्थमंत्री राजीनाम्याची भाषा बोलायला लागतो. पण ही विरक्ति पुढील महिन्याच्या पहिल्या तारखेपर्यंतच टिकते.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
ना. क्र. ७८९१ नों. दि
दि. ७१।·८१

# नसता उपद्व्याप

भारंभार प्रकाशन संस्था असतांना हा 'नसता उपद्व्याप' कशाला असा वाचकांना आणि प्रकाशक मित्रांना वाटण्याचा संभव. पण कांहींतरी नवें आणि चांगलें करण्याची नेहमींची धडपड आणि त्याला माझे लेखक मित्र श्री. बाळ सामंत यांचें मनापासूनचें साहाय्य मिळालें म्हणूनच हा प्रकाशनाचा नसता उपद्व्याप करण्याच्या भानगडींत पडलों. महाराष्ट्राचे अग्रगण्य आणि अखिल भारती कीर्तीचे चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांनीं अल्पावधींत एक सुरेख चित्र काढून देऊन या संग्रहाचें मोल वाढविलें आहे.

मला खात्री आहे कीं वाचकांना हा 'नसता उपद्व्याप' आवडेल. वाचकांचें सहकार्य मिळाल्यास मुरली प्रकाशनतर्फे उत्तमोत्तम साहित्य प्रकाशित करण्याचा मनोदय आहे.

**अनिलकुमार हजारे**
**प्रकाशक**
मुरली पब्लिशिंग कंपनी

# मस्करी

## सुखद् गुदगुल्या करणारी

## बाळ सामंत यांची ' मस्करी '

### श्री. बाळ सामंत यांच्या पहिल्याच गाजलेल्या विनोदी लेखसंग्रहावरील एक मार्मिक अभिप्राय

हल्लीं कुठेंच हंसायला मिळत नाहीं.– पण कधींतरी अचानकपणें एखाद्या दिवशीं कचेरींतून लवकर जायला मिळतें. स्टेशनांत गाडी येण्यापूर्वी आपण येतों. गाडींत बसायलाहि जागा मिळते. तसेंच बाळ सामंत यांचा मस्करी हा लेखसंग्रह मध्येंच हातांत येतो. अगदीं खळखळाटानें नाहीं परंतु खुदकन् हंसायला मिळतें. एक वेगळा संग्रह वाचायला मिळाल्याचा आनंद होतो. मस्करी म्हणजे मस्करी त्यांत कुस्करी नाहीं. कुणाला व्यक्तिगत बोचकारे नाहींत. शब्दांची उगाच ओढाताण नाहीं. गुळवलेले ' इनोदी ' प्रसंग नाहींत. अशी सुखद् मस्करी कीं चेहेऱ्यावरल्या नेहमींच्या रेषांना वळण बदलायलाच हवें.

कुठलेंहि पान उघडून वाचायला सुरुवात करावी कुणाला त्यांतली एखादी गोष्ट अवास्तव खोटी वाटली तर तो जन्मजातच खोटें बोलणारा असावा! बारकावे निवडायचे तर हे सगळेच लेख पुन्हा लिहून काढायला हवेत. वानगीदाखल अनुक्रमें ' आमचा कौटुंबिक सिनेमा ', ' आमचा पहिला पाळणा ', ' लग्नाला जातों मी ' आणि ,माझ्या कौटुंबिक आपत्ति' हे चार लेख वाचलेच पाहिजेत.

अशी सुखद् गुदगुल्या करणारी मस्करी सादर केल्याबद्दल बाळ सामंत यांचें अभिनंदन. त्यांनीं पुन्हा मस्करी करायला कांहींच हरकत नाहीं असेंच कुणीहि रसिक वाचक म्हणेल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
दा. क्र. ७.५२७९ ... वि. ...
वि. ... ... ...
IRBK-0116919
IRBK-0116919

–६०